॥ हिंदुबोध ॥ ॥ इदं शास्त्रं, इदं शस्त्रम् ॥

# हिंदुबोध

संपादक : रविकांत कळंबकर

विश्व हिन्दू परिषद धर्मो रक्षति रक्षितः

■ शके १९४३ ■ वर्ष २१ वे ■ अंक ११ वा ■ एप्रिल २०२२ (मासिक) ■ मूल्य ₹ २०/- ■ पृष्ठ संख्या ४४ ■

■ HINDUBODH ■ PUNE ■ VOL. 21 ■ ISSUE NO. 11 ■ APRIL 2022 (MONTHLY) ■ PRICE ₹ 20/- ■ PAGES 44

ॐ विश्व हिंदू परिषद ॐ

पश्चिम महाराष्ट्र प्रांत

## भक्तीशक्ती ११ मारुती परीक्रमा



अंक www.vhp.org वर उपलब्ध

E-mail : hindubodh.pmp@gmail.com

# अडचणींवर करण्या मात
# आहे जनता बँकेची साथ

व्यवसाय वाढीसाठी अथवा विविध आर्थिक गरजांसाठी
स्थावर मिळकतीचे तारणावर मुदत कर्ज योजना

## उद्योग संजीवनी

कर्ज मर्यादा : कमाल रु. ७५ लाख
मुदत : कमाल १२० महिने
परतफेड : मासिक हप्त्याने
व्याजदर : द.सा.द.शे. ९.००
मार्जीन : २०%

कोरोनाच्या आव्हानाला तोंड देत असताना 'कोविड-१९'मुळे उद्भवलेल्या
आर्थिक अडचणींवर मात करण्यासाठी

## जन आधार कर्ज योजना - कोविड १९(२)

### व्यक्तिश: कर्ज (नोकरदारांसाठी)

कर्ज मर्यादा : रु. २ लाख
मुदत : ३६ महिने
परतफेड : मासिक हप्त्याने
व्याजदर : विद्यमान खातेदार - १०%
नवीन खातेदार - ११%

### व्यक्तिश: कर्ज (व्यावसायिकांसाठी)

कर्ज मर्यादा : रु. ५ लाख (विनातारणी)
रु. ५ ते १० लाख (तारणी)
मुदत : ३६ महिने
परतफेड : मासिक हप्त्याने
व्याजदर : विद्यमान खातेदार - १०%
नवीन खातेदार - ११%

अटी लागू

सहकार्यम् यशोधनम्
स्थापना - १९४९

## जनता सहकारी बँक लि., पुणे
(मल्टीस्टेट शेड्युल्ड बँक)

टोल फ्री क्रमांक : 1800 233 3258 (बँकेच्या सुट्टीचे दिवस सोडून) www.janatabankpune.com

मुख्य कार्यालय : १४४४, शुक्रवार पेठ, थोरले बाजीराव मार्ग, पुणे ४११००२. फोन : ०२०-२४४५३२५८ / ५९

मासिक

**हिंदुबोध**

**वर्ष – एकविसावे : अंक ११ वा.**

शके १९४३

**एप्रिल २०२२**

**संपादक**

**श्री. रविकांत कळंबकर**

**९८२२२६१६६२**

ravi.kalambkar@gmail.com

**निवास : एबीसी जंक्शन,**
**ए बिल्डिंग, फ्लॅट नं. ६,**
**आकुर्डी रेल्वेस्टेशन जवळ,**
**निगडी प्राधिकरण,**
**पुणे ४११०४४.**

अंक www.vhp.org संकेतस्थळावर उपलब्ध.

**संपादक मंडळ सदस्य**

**श्री. संजय मुरदाळे – प्रांत मंत्री**
**श्री. महेंद्र देवी – प्रांत कोषाध्यक्ष**
**श्री. विवेक सोनक – प्रांत प्रचार प्रमुख**
**श्री. मुकुंद चव्हाण – प्रांत प्रचार सह प्रमुख**

**कार्यालयीन मंडळ**

**श्री. ग. रा. महामुनी – व्यवस्थापक**
**श्री. मिलिंद देवळे – व्यवस्थापक**
**श्री. विजय पोरे, श्री.दिलीप पाठक**
**प्रांत जाहिरात व वर्गणीदार प्रतिनिधी**

**पत्र व्यवहार**

**द्वारा : संपादक, 'हिंदुबोध',**
**विश्व हिंदू परिषद कार्यालय १३६०, शुक्रवार पेठ,**
**भारतभवन, नातूबाग, पुणे – ४११ ००२.**
**श्री. मिलींद देवळे : ९०४९३९६३६३**

**अंक मूल्य रु. २०/–**
**वार्षिक वर्गणी रु. २००/–**

**मुद्रण स्थळ**

**संवाद ट्रेडप्रिंटस्**
**५९५, शनिवार पेठ, पुणे – ३०.**
**दूरभाष : २४४८ ५६ ३२**
sanwadpvt@gmail.com

या अंकात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व संपादक मंडळ सहमत असतातच असे नाही. (केवळ व्यक्तिगत उपयोगासाठी)

# अनुक्रमणिका

१. संपादकीय ...
परिक्रमा, भक्तीची अन् शक्तीची — रविकांत कळंबकर ..................५

२. विहिंप प्रांत वृत्त ........................................६

३. सरस्वती – सिंधुची कला
आणि अभिरुची — विनिता हिरेमठ......................१०

४. गुढीपाडव्याची महती — प्रा.शैलजा सांगळे...................१३

५. गीताबोध १२
अनन्य–भक्तियोग. — श्री नारायण देशपांडे................१६

६. श्री राम — उल्का खळदकर....................१९

७. ।। सावरकरी विचाररत्ने ।। — श्री. प्रविण दत्तात्रय जाधव .......... २१

८. श्रीमद् दासबोध परिचय
(भाग बारावा) — सुहास वसंत कुलकर्णी.............२४

९. ज्ञानेश्वरीतील योग चिंतन
भक्ति योग — ह.भ.प. किसन महाराज चौधरी....२६

१०. भारतातील मुस्लीम
दंगलींचा भस्मासूर — डॉ. गिरीश आफळे .................२८

११. भारताने आपला आंतरराष्ट्रीय
दर्जा कसा वाढवला — तन्मय आबाजी गांगुर्डे ...............३२

१२. विज्ञान म्हणजे काय?
अज्ञान मान्य करते ते विज्ञान — डॉ. शंतनु अभ्यंकर .................३५

१३. जाऊ संतांचिया गावा
संत नामदेव महाराज — गोविंद केशव जेस्ते..................३७

१४. तब आप क्या कर रहे थे..? — प्रशांत पोळ...........................४०

१५. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ,
प्रतिनिधी सभा पत्रकार परिषद ........................................४२

हिंदुबोध मासिक मालक, विश्व हिंदू परिषद, महाराष्ट्र प्रदेश यांचेकरिता मुद्रक व प्रकाशक विवेक सोनक यांनी संवाद ट्रेडप्रिंटस्, बी – ७, गोवईकर बिल्डिंग, ५९५ शनिवार पेठ, पुणे ४११०३० येथे छापून, भारत भवन, १३६० शुक्रवार पेठ, पुणे – ४११००२ येथे प्रकाशित केले. संपादक : रविकांत कळंबकर (पीआरबी ॲक्टनुसार संपादकीय जबाबदारी)

"Hindu Bodh" Monthly publication is owned by Vishva Hindu Parishad, Maharashtra Pradesh, Printed and Published by Vivek Sonak, Printed at Sanwad TradePrints, B-7, Gowaikar Bldg. 595 Shaniwar Peth, Pune - 411030 and Published at Bharat Bhavan, 1360 Shukrawar Peth, Pune - 411002. Editor - Ravikant Kalambkar

# हिंदुत्व विश्वमंत्र देऊ नव्या युगाला

हिंदुत्व विश्वमंत्र देऊ नव्या युगाला
हिंदू अजिंक्य, सांगू गर्जुनिया जगाला ।।धृ।।

हिंदुत्व हाच प्राण, हिंदुत्व हे निधान
शिवसत्यसुंदराचे हाती असे निशाण
पुरुषार्थ भारताचा त्यागात रंगलेला ।।१।।

समता समन्वयाचे, अभिमान अस्मितेचे
संपन्न हिंदूराष्ट्र हे दिव्य स्वप्न अमुचे
साफल्य जीवनाचे सन्मान त्यात सगळा ।।२।।

भाषा अनेक पंथ असती अनेक जाती
सर्वाहुनी पवित्र इथली महान माती
भारुनी टाकू धरती भारुनिया नभाला ।।३।।

अपमान सोसण्याचा झाला असे युगान्त
घेऊ न पाय मागे आला जरी कृतान्त
हिंदुत्व-अश्व विजयी जग जिंकण्या निघाला ।।४।।

उत्तुंग झेप घेऊ गरुडासमान गगनी
एकात्मगीत गाऊ मतभेद संपवोनी
सामर्थ्य सर्व आता लावू चला पणाला ।।५।।

## वृत्तपत्राच्या मालकीहक्कासंबंधीचे निवेदन (दर मार्च माहिन्यात प्रसिध्द करावयाचे)


१) नियतकालिकाचे नाव : हिंदुबोध

२) प्रकाशन स्थळ : भारत भवन, १३६० शुक्रवार पेठ, पुणे - ४११००२

३) प्रकाशन काळ : मासिक

४) मुद्रकाचे नाव : विवेक सोनक राष्ट्रीयत्व : भारतीय
पत्ता : पिंपरी चिंचवड, पुणे ४११०४४

५) प्रकाशकाचे नाव : विवेक सोनक राष्ट्रीयत्व : भारतीय
पत्ता : पिंपरी चिंचवड, पुणे ४११०४४

६) संपादक : रविकांत कळंबकर राष्ट्रीयत्व : भारतीय
पत्ता : एबीसी जंक्शन, ए बिल्डिंग, फ्लॅट नं. ६, आकुर्डी रेल्वेस्टेशन जवळ, निगडी प्राधिकरण, पुणे ४११०४४.

७) मुद्रण स्थळ : संवाद ट्रेडप्रिंटस्, बी - ७, गोवईकर बिल्डिंग, ५९५ शनिवार पेठ, पुणे ४११०३०

८) वृत्तपत्राची मालकी हक्क/ स्वामित्व इ. चे नांवः विश्व हिंदू परिषद, महाराष्ट्र प्रदेश (ट्रस्ट)

९) कार्यालयाचा पत्त : 'हिंदुबोध', विश्व हिंदू परिषद कार्यालय १३६०, शुक्रवार पेठ,
भारतभवन, नातूबाग, पुणे - ४११ ००२.

मी विवेक सोनक घोषित करतो की वरील तपशील माझ्या माहिती व समजुतीप्रमाणे विश्वासपात्र व स्त्य आहे.

दिनांक : १ मार्च २०२२ प्रकाशक



# संपादकीय ...
# परिक्रमा, भक्तीची अन् शक्तीची

करोनाची तिसरी लाट आता संपुष्टात आली असे म्हणण्यासारखी समाजात स्थिती झाली आहे. दैनंदिन व्यवहार पण आता संपूर्णपणे सक्रीय झाले आहेत. दुकाने, बाजारपेठा, कारखाने पूर्ण क्षमतेने कार्यरत झाले आहेत. आर्थिक वर्ष संपताना या सर्व बाबी महत्त्वाच्याच मानल्या पाहिजेत. होळी, धुलिवंदन हे सण गेल्या दोन वर्षांनंतर प्रथमच संपूर्ण आनंद देवून गेले. एका अर्थी करोनाचे संकट होळीत नष्ट केले गेले आणि म्हणुनच आता आपण नवीन वर्षाचे स्वागतासाठी तयार झालो आहोत.

शालिवाहन शके १९४४ अर्थात वर्ष प्रतिपदा. चैत्र महिन्याचा पहिला दिवस, दोन एप्रिल रोजी आहे. हिंदूंचा वर्षारंभ. आपण गेल्या दोन वर्षांनंतरचा हा सण मोठ्या प्रमाणात खऱ्या अर्थाने गुढ्या, तोरणे उभी करुन, मिरवणूका काढुन उत्साहात, जल्लोषात, आनंदात साजरा करुयात. या वर्षारंभानंतरचा प्रत्येक दिवस आपला आनंदाचाच रहावा या आपल्या सर्व हिंदू बंधू–भगिनींना विश्वहिंदू परिषदेच्या मनापासून हार्दिक शुभेच्छा.

याच दिवशी म्हणजे, चैत्र शुद्ध प्रतिपदेलाच डॉक्टर केशव बळिराम हेडगेवारांचा जन्म झाला. हिंदूस्थानात हिंदूंनाच अनेक गोष्टींसाठी संघर्ष करावा लागतो हे एक दूदैवच म्हणावे लागेल. देशाला स्वातंत्र्य मिळवून देणे व हा देश पुन्हा पारतंत्र्यात जाणार नाही यासाठी हिंदू समाजाचे संघटन करुन आपल्या धर्माचे, समाजाचे, संस्कृतीचे संरक्षण करण्यासाठीच डॉक्टरांचा जन्म झाला. एका अर्थी भगवंताचेच पुन्हा आगमन झाले. हेडगेवारांनी 'संघ' स्थापन केला. छत्रपती शिवराय झाले नसते तर जे झाले असते तसेच आज आपण हेही म्हणू शकतो कि 'संघ' स्थापन झाला नसता तर! कदाचित हा लेख ही लिहीला गेला नसता. हिंदू नववर्षाच्या व नवीन आर्थिक वर्षाच्या आपणांस पुन्हा एकदा शुभेच्छा. हे वर्ष आरोग्य व आर्थिकदृष्ट्या संपन्न राहावे ही प्रभू चरणी प्रार्थना.

वर्षाचा प्रारंभच श्रीरामनवमीचे नवरात्राने होत असतो. श्रीराम नवमीचा उत्सव आणि चैत्र पौर्णिमेचा श्री हनुमान जन्मोत्सव, मर्यादा पुरुषोत्तम, एक वचनी, एक पत्नी, एक बाणी हा आदर्श तर, अश्या आदर्शरुपी जीवनासाठी सर्वस्व समर्पण ते सुद्धा श्रद्धेने, भक्तीने व सर्व सामर्थ्याने करणारे श्री हनुमान. आपल्यापैकी प्रत्येकानेच हेच दोन आदर्श व्यक्तीगत जीवनात जरी उतरवले तरी आपले जीवन कृतार्थ होईल.

आपल्या देशावर अनेक आक्रमणे येवुन गेली. प्रत्येक वेळी हा समाज एक संघ होवुन त्याविरुद्ध लढला. परंतु ब्रिटीश राजवटीत या समाजाला ब्रिटीशांविरुद्ध व अंतर्गत समाजातील अनेक समस्यांविरुद्ध लढावे लागले. किंबहुना आजही काही प्रमाणात तो समाजातील समरसतेचा संघर्ष चालूच आहे. थोर समाजसुधारक महात्मा जोतीराव फुले व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान यासाठी फार मोलाचे ठरते आहे, याच महिन्यात त्यांचीही जयंती आहे. या दोन महान व्यक्तींना पण, विनम्र अभिवादन.

दोन वर्षांच्या कोरोना काळातील सर्व बंदीचे पाश आता तुटले आहेत. त्यामुळेच भक्तीशक्ती परिक्रमेचे आयोजन केले गेले आहे, सामर्थ्य आहे चळवळीचे, जो जे करील तयांचे परंतु तेथे धर्माचे अनुष्ठान पाहिजे आणि म्हणून समर्थ रामदास स्वामींनी शिवकाळात अकरा वीर मारुती स्थापन केले. या मंदिरांचे माध्यमातून त्या काळी आवश्यक असलेल्या अनेक गोष्टी सहज साध्य करता आल्या.

देशातील सद्यस्थिती पाहता तरुणांना पुन्हा हाच आदर्श डोळ्यापुढे ठेवणे आवश्यक आहे, तसे संस्कार या तरुणांना आताचे परिस्थितीनुसार व्हावे म्हणून अकरा मारुती परिक्रमेचे आयोजन केले आहे. आपणांस जे जे शक्य आहे ते यासाठी करुया. शिवकाळात मावळे जसे प्रेरणा घेवून शिवाजी महाराजांसाठी म्हणजेच हिंदवी स्वराज्यासाठी तयार झाले तसे आता देशासाठी बजरंगींची आवश्यकता आहे, भावी काळात देव, देश अन् धर्मासाठी बजरंगीच महत्त्वाचे असतील. जय श्रीराम.

**रविकांय कळंबकर, हिंदुबोध संपादक**

**संपर्क : ९८२२२६१६६२**

**(टीप – पान क्र. २२ व २३ पहा.)**

# केंद्रीय स्तर पर लागू हो धर्मांतरण रोकने के लिए कानून : मिलिंद

## विहिप के आंतरराष्ट्रीय महामंत्री ने कहा कि मथुरा व काशी का संकल्प भी पूर्ण करेगा हिंदू समाज



**कारसेवपुरम में पत्रकारों से वार्ता करते विश्व हिंदू परिषद के अंतरराष्ट्रीय महामंत्री मिलिंस परांडे व मुजूद बजरंग दल के राष्ट्रीय संयोजक सोहन सिंह, विहिप के शरदशर्मा**

अयोध्या।

कारसेवकपुरम में संचालित बजरंग दल के अभ्यास वर्ग में पहुंचे विश्व हिंदू परिषद के आंतरराष्ट्रीय महामंत्री मिलिंद परांडे ने पत्रकारों से वार्ता करते हुए कहा कि धर्मांतरण को रोकने के लिए विहिप के प्रयत्न से देश के छह, सात राज्यों ने 'धर्मांतरण कानून' बनाया है । अभी बजट सत्र से पूर्व देश के समस्त सांसदों से संपर्क किया गया । प्रयास है केंद्र सरकार भी धर्मांतरण पर केंद्रीय कानून बनाए ।

उन्होंने कहा कि हिंदू समाज के सम्मुख आतंकवाद, धर्मांतरण, लव जिहाद, गौ हत्या जैसी गंभीर समस्या है । इससे निपटने व रोक लगाने के लिए लगातार संगठन सक्रिय है । दो वर्षों में इस गंभीर राष्ट्रीय समस्या पर रोक लगाने हेतु व्यापक कार्य योजना बनेगी । उन्होंने एक प्रश्न के उत्तर में कहा कोई घोषणा करने की आवश्यकता नहीं कि भारत हिंदू राष्ट्र है । यह राष्ट्र अनंत काल से (सनातनी) हिंदू राष्ट्र है और भविष्य में भी रहेगा । कहा कि जैसे हिंदू समाज ने अयोध्या के संकल्प को पूर्ण किया वैसे ही मथुरा, काशी के संकल्प को भी पूर्ण करेगा ।

उत्तर प्रदेश में छुट्टे गौवंश पर किए गए प्रश्न पर उन्होंने कहा गौवंश हमारी श्रद्धा और आस्था का विषय है । इसका संरक्षण संवर्धन हम कर रहे हैं । विश्व हिंदू परिषद ऐसे देश भर में दो लाख गौवंश को कसाइयों से प्रतिवर्ष मुक्त कराती है । जिसमें हमारे युवा संगठन बजरंग दल की अहम भूमिका है । गोवंश संरक्षण संवर्धन के लिए किसानों को प्रशिक्षित करना होगा । हमें गोवंश आधारित कृषि की ओर लौटना होगा तभी हम ऐसी समस्याओं से समाधान निकाल पाएंगे ।

उन्होंने कहा जनसंख्या असंतुलन एक गंभीर समस्या है, बाकी लोग इस पर कानून बनाते रहेंगे । विहिप हिंदू समाज का आह्वान करती है कि इस समस्या से निपटने के लिए कम से कम दो बच्चों का निर्माण करना ही चाहिए । पत्रकार वार्ता के दौरान बजरंग दल के राष्ट्रीय संयोजक सोहन सिंह सोलंकी, विहिप के क्षेत्रीय संगठन मंत्री गजेंद्र सिंह, शरद शर्मा आदि मौजूद रहे ।

- **द कश्मीर फाइल्स का विरोध करने वाले भारत विरोधी**

मिलिंद परांडे ने कहा कि कश्मीरी पंडितों पर आतंकियों द्वारा किए गए सत्य घटना और अत्याचार पर बनी फिल्म द कश्मीर फाइल का विरोध करने वालों को भारत विरोधी बताया। उन्होंने कहा कश्मीर में हुए अत्याचार को भुलाया नहीं जा सकता है । जिस प्रकार से हिंदू बहन बेटियों और भाइयों पर हिंसक अत्याचार हुआ वह काला अध्याय है । इस सत्य का विरोध करने वाले भारत के दुश्मन है ।

- **बजरंगियों ने किया पथ संचलन**

मिलिंद परांडे ने बताया कि कारसेवकपुरम में ११ से १६ मार्च तक बजरंग दल का अखिल भारतीय शारीरिक प्रशिक्षण वर्ग चल रहा है । जिसमें देश भर के ४४ प्रांतों से युवा कार्यकर्ता प्रशिक्षण प्राप्त कर रहे है । अप्रैल, मई माह में देशभर में आयोजित होने वाले प्रांतों के शौर्य प्रशिक्षण वर्गों में ये सभी प्रशिक्षण देंगे । साथ ही बताया कि बजरंगियों ने अयोध्या की सड़कों पर पथ संचलन किया है । कार्यकर्ता कारसेवपुरम से निकलकर मणिरामदास छावनी, प्रमोदवन हुए मुख्य मार्ग से नयाघाट से हनुमान गुफा होते हुए कारसेवकपुरम पहुंचे ।

- **राममंदिर का ३० प्रतिशत कार्य पूरा**

विश्व हिंदू परिषद के आंतरराष्ट्रीय महामंत्री मिलिंद परांडे ने आज यहां कहां की श्रीराम जन्म भूमि मंदिर निर्माण में नीव का का कार्य हो चुका है । प्लिंथ का कार्य अपनी गति से चल रहा है । मंदिर निर्माण का ३० प्रतिशत कार्य हो चुका है । दिसंबर २३ तक गर्भगृह में श्री रामलला विराजमान हो जायेंगे ऐसा सभी का मानना है ।

# श्री राम जन्मभूमि मंदिर निर्माण प्रगति विवरण

१. मंदिर की नींव का निर्माण पूरा हो चुका हे हम कह सकते हे कि मंदिर निर्माण का प्रथम चरण पूरा हो गया हे। इस कार्य को करने में लगभग १८ महीने लगे । प्रारम्भ में ६ महीने तक आपास की चर्चा और शोध कार्य हुआ । अंतिम निर्णय होने के बाद इस कार्य को पूरा करने में लगभग एक वर्ष लगा। इस कार्य को सम्पन्न करने के लिए आई.आई.टी. दिल्ली के भूतपूर्व निर्देशक, आई.आई.टी. गुवाहाटी के वर्तमान निदेशक, एन.आई.टी. सूरत के वर्तमान निदेशक, सी.बी.आर. आई. रूड़की के वर्तमान निदेशक और उनकी टीम, लारसन टुबरो तथा टाटा के इंजीनियर, आई.आई.टी. दिल्ली, आई. आई.टी. मद्रास, आई.आई.टी. मुबंई के सिविल इंजीनियरिंग के प्रोफेसर, हैदारबाद स्थित भारतीय भूगर्भ अनुसंधान संस्थान के वैज्ञानिक सामूहिक रूप से इस कार्य में लगे ।

२.. भूखंड में नीचे मिट्टी नही मिली, अपितु मलबा अथवा नदी की बालू प्राप्त हुई यह मजबूत नींव के लिए उपयुक्त नहीं मानी गयी अतः सम्पूर्ण मलबे को हटाया गया लगभग ६ एकड भूमि में गर्भगृह निर्माण होने वाले स्थान पर लगभग १४ मीटर गहराई तक तथा शेष भूमि में १२ मीटर गहराई तक मलबा और बालू को हटाया गया, एक बडे समुद्र जैसा दृश्य बन गया ।

३. इस विशाल गडडे को भरने के लिए आई.आई.टी. मद्रास ने एक विशेष प्रकार का काँक्रीट मिश्रण का सुझाव दिया। इस मिश्रण की १२ इंच मोटी सतह बिछाई गई इस सतह को सड़क निर्माण में उपयोग आने वाले रोलर से दबाया गया, दबाकर काँक्रीट की सतह को १० इंच तक लाया गया तत पश्चात काँक्रीट का घनत्व नापा गया । सही परिणाम मिलने पर आगे बढे, प्रार्भ एक सतह ५से ६ दिन पूरी हुई, इस प्रकार एक के ऊपर एक ४८ सतह बिछाई गई, और गर्भगृह पर ५६ सतह बिछाई गई । इस संपूर्ण कार्य में लोहे का प्रयोग बिल्कुल नहीं किया, इस कार्य को भूमि का विकास कहा गया । हम कह सकते हे कि जमीन के नीचे १४ मीटर मोटी एक मनुष्य निर्मित चटटान ढाली गयी है । इसे ११९९ – रोलर कोमपेक्टेड काँक्रीट कहा गया हे ।

४. भूमि विकास का कार्य पूरा होने के पश्चात केवल गर्भगृह के चारों और उतने क्षेत्र मे, (जितने क्षेत्र पर मंदिर का निर्माण होना है,) १.५ मीटर मोटी अधिक शक्तिशाली चटटान ढाली गयी हे, इसे राफ्ट कहा गया हे ।

५. Rcc: – रोलर कोमपेक्टेड कॉक्रीट तथा राफ्ट दोनों मिलकर नींव तैयार हुई, जिसे तैयार करने में १८ महीने लगे । अर्थात मंदिर निर्माण का प्रथम चरण जनवरी, २०२२ में पूर्ण हो गया ।

६. अब राफ्ट के ऊपर फर्श/ कुर्सी /?।।११।। ऊंचा करने का काम प्रारंभ हो गया है, यह कार्य ग्रेनाईट के पत्थरों से किया जा रहा हे । ५ फोट लंबा, ३ फीट चौड़ा तथा २.५ फीट मोटा ग्रेनाईट का ब्लॉक एक के ऊपर एक रखा जायेगा, लगभग १७००० ब्लॉक रखे जायेगें इसके कारण २१ फीट ऊंची ०१११९ तैयार होगी यह कार्य भी आगामी ६ महीने में पूरा कर लेने का अनुमान है यह कार्य होने पर मंदिर निर्माण का दूसरा चरण पूर्ण हो जायेगा ।

७. ०११११९ बन जाने के बाद मंदिर के नक्काशीदार पत्थरों को जोड़ने का कार्य प्रारम्भ होगा ।

८. मिट्टी का कटान रोकने के लिए तथा सरयू नदी के इसी सम्भावित आक्रमण को राकने के लिए मंदिर के पश्चिम दिशा में बहुत गहराई तक १९११११२ ४५८१ निर्माण का कार्य भी प्रारम्भ हो चुका है, यह रक्षा दीवार भी लगभग १२ मीटर चोडी है, और जमीन की सतहसे १२ मीटर गइराई तक डाली गयी है। इसमें लोहे के सरियों का उपयोग किया गया हे, यह कार्य साथ–साथ चल रहा हे ।

९. मंदिर में लगने वाले पत्थर (राजस्थान के भरतपुर जिला के बंशी पहाडपुर क्षेत्र तथा मंदिर में लगने वाली चौखट तथा फर्श में लगने वाले पत्थर मकराना के सफेद उच्च कोटी के संगमरमर के होगें । इनकी नक्काशी का कार्य संबंधित कुशल व्यक्तियों को सौंप दिया गया हे । सभी स्थानों पर भ्रमण भी हो गया है, विश्वास जगा है कि सम्पूर्ण नक्काशी का कार्य समय पर प्रा हो जायेगा । १० मंदिर के चारों और लगभग ८ एकड क्षेत्र को घेरते हुए एक परकोटा (परिक्रमा पथ) बनेगा । यह भी पत्थरों से बनेगा, इस कार्य में जोधपुर के पत्थर लगाने का निर्णय हुआ है । इन पत्थरों की भी नक्काशी होगी, जोधपुर का पत्थर जिन व्यक्तियों से खरीदा जाना है, उनका चयन हो गया हे । ११ मंदिर निर्माण पूरा होने के साथ–साथ तीर्थ यात्रियों की सुविधाआं के लिए न्यूनतम आवश्यक भवन भी तेयार हो जायेगें, इस संबंध में तैयारी ठीक प्रकार चल रही हे ।

१२ मंदिर परिसर में संग्रहालय बनेगा, इस संबंध में समानान्तर विचार चल रहा हे, स्वतंत्र टोली बनी हे । १३ हम लक्ष्य लेकर चल रहे हे कि दिसंबर २०२३ तक गर्भगृह, गर्भगृह के सामने गृहमंडप तथा रंगमंडप तैयार करके गर्भगृह में भगवान को प्रतिष्ठित करा देगे । शेष निर्माण कार्य चलता रहेगा, और गर्भगृह में भगवान का दर्शन भी साथ–साथ चलता रहेगा ।

**प्रस्तोता : (चम्पतराय)**

## विश्व हिंदू परिषद कात्रज जिल्ह्याच्या वतीने १९ फेब्रुवारी २०२२ रोजी शिवजयंती सोहळा साजरा करण्यात आला.

१. **धनकवडी** मध्ये बाळासाहेब जाधव यांच्या माध्यमातून शिवजयंती सोहळा साजरा केला. धनकवडी येथे नगर कार्यवाह किरण जोशी हे प्रमुख म्हणून उपस्थित होते, त्यांच्या हस्ते पूजन व आरती चा कार्यक्रम झाला.

२. तसेच **कात्रज** मध्ये शिवजयंती सोहळा साजरा केला. या सोहळ्यामध्ये ज्ञानेश्वर इंगळे जिल्हा मंत्री, विशाल शिंदे सहमंत्री, सुनील करजगी मठ मंदिर प्रमुख, सचिन काळे आणि इतर कार्यकर्ते उपस्थित होते. विशाल शिंदे यांच्या मुलीच्या हस्ते आरती करण्यात आली.




## कर्नाटकात बजरंगदलाच्या कार्यकर्ताची हत्या



दिनांक २४/०२/२२ रोजी सायंकाळी ५ वाजता कात्रज चोक येथे विश्व हिंदू परिषद कात्रज जिल्हा च्या वतीने कर्नाटकातील बजरंग दलाचा कार्यकर्ता हर्षा याची जिहादी प्रवृत्तीच्या इस्लामिक संघटनेच्या व्यक्तींनी निर्घृण हत्या केली. त्या बद्दल निषेध व निदर्शने करण्यात आली. यावेळी विश्व हिंदू परिषद चे कात्रज जिल्हा मंत्री ज्ञानेश्वर इंगळे, कात्रज भाग कार्यवाह सुभाष रायचुरकर, आशुतोष काळे, आनंद देव, सह मंत्री विशाल शिंदे, मठ मंदिर प्रमुख सुनील करजगी, बजरंग दल प्रमुख शार्दुल ठाकूर, सचिन काळे, महेश गंभिरे, दिनेश आलुरे, विशेष संपर्क प्रमुख दत्ता तिखोळे, मंगेश जाधव, योगेश गिरी, रवी बोडके, पंडित अतिवाडकर, हनुमंत देशमुख, सुरज लोंढे, कुमार जाधव, राहुल पाखरे, ऋषिकेश भणगे, राकेश शेटे, व इतर हिंदुत्ववादी संघटना उपस्तीत होते.

ज्ञानेश्वर इंगळे यांनी निषेध व्यक्त करताना असे म्हंटले कि, हिजाबची संस्कृती शालेय शिक्षणात आणू नये. यासंदर्भत भगव्या शालीचे आंदोलन हर्षाने उभे केले होते. कर्नाटकातील बजरंग दलाचा कार्यकर्ता हर्षा याची जिहादी प्रवृत्तीच्या इस्लामिक संघटनेच्या व्यक्तींनी निर्घृण हत्या केली. ही घटना मानवतेच्या दृष्टिकोनातून निषेधार्थ आहे. जिहादी प्रवृत्तीला आळा बसण्यासाठी सिमी प्रमाणे पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडिया, कॅम्पस फ्रंट ऑफ इंडिया, डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडिया या संघटनेवर बंदी घालावी अशी मागणी विश्व हिंदू परिषद करीत आहे. हिंदुत्ववादी कार्यकर्त्याची हत्या करणाऱ्याना फाशीची कठोर शिक्षा द्यावी. जिहादी ना जी भाषा समजते त्या भाषेत हिंदुत्ववादी कार्यकत्यांना उत्तर देता येते. पण हिंदू शांतपणे यांना निषेध व्यक्त करून उत्तर देत आहे. पण याला पण मर्यादा आहेत. आम्हाला आमच्या मर्यादा कळतात. आम्हाला आमच्या मर्यादेचे उल्लंघन करायला लावू नका. आम्ही प्रशासनाला सांगू इच्छितो कि, ह्या जिहादिना त्यांची जागा दाखवून द्या, नाहीतर बजरंग दल हिंदुत्ववादी कार्यकर्ते यावर तोडगा काढतील.

## विश्व हिंदू परिषद , कात्रज भाग यांच्या तर्फे सेवा सुरक्षा संस्कार या त्रिसुत्री अंतर्गत श्री गजानन महाराज पारायण सोहळा आयोजित केला होता.

या कार्यक्रमात सौ. कल्पना नामजोशी ताई यांच्या मार्गदर्शनाखाली आज २७ फेब्रुवारी २०२२ रोजी दत्तनगर कात्रज येतील सिद्धिविनायक गणपती मंदिर येथे श्री गजानन महाराज यांचा पारायण सोहळा पार पडला. या कार्यक्रमात मोठ्या प्रमाणात नागरिक उपस्थित होते. तसेच कार्यक्रमात तरुण तरुणींची उपस्थिती लक्षणीय होती हे विशेष. या कार्यक्रमात कात्रज जिल्हा मंत्री श्री. ज्ञानेश्वर इंगळे, सह मंत्री श्री विशाल शिंदे, मठ मंदिर प्रमुख श्री सुनील करजगी,बजरंग दल प्रमुख श्री शार्दुल ठाकूर आदरणीय श्री देव काका, मंदिराचे पुजारी देशपांडे गुरुजी उपस्थित होते. तसेच पारायण वाचक व्यासपीठ म्हणून सौ. हेमा प्रमोद कराळे ( अमरावती ) आणि सौ शुक्रे, सौ जडे, सौ रेश्मा चौधरी, सौ स्न्हेहल होनराव, सौ नामजोशी , सौ उमाताई भांदरकुमाठे स्थानिक नागरिक म्हणून पारायणाला बसले होते. धर्म प्रसार, पश्चिम विभाग प्रमुख अमर सातपुते आले, होते, त्यांनी धर्म प्रसार ची गरज, महत्त्व सांगितले. असे धार्मिक कार्यक्रम प्रत्येक सोसायटी मध्ये होतील असे प्रयत्न करा. असे ही म्हणले या कार्यक्रम साठी सौ. कल्पना नामजोशी ताई, व त्यांच्या मैत्रिणी परिवार, सिद्धिविनायक मंदिराचे पालक व मार्गदर्शक देवबाबा, काकडे सर, सौ. भोसले ताई, सुनील करजगी, विशाल शिंदे, योगेश गिरी, ज्ञानेश्वर इंगळे, यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

## पुण्येश्वर मंदिर, पुणे येथे रूद्राभिषेक

पुण्येश्वर महादेवाचं मंदीर, पवळे चौक, कसबा पेठ येथील पुण्येश्वराच्या प्रतिकात्मक शिवलिंगावर ७२९ वर्षानंतर रुद्राभिषेक अन् महाशिवरात्र दि १/३/२२ रोजी मोठ्या संख्येने साजरी करण्यात आली.

परंतु कार्यक्रामाचे वेळी तणावपूर्ण वातावरण झाल्यामुळे आपल्या २० कार्यकर्त्यांचेवर फरासखाना पोलीस स्टेशन मध्ये काल खोट्या स्वरूपाचा गुन्हा दाखल करण्यात आला. त्यातील १५ कार्यकर्त्यांना त्यात विभाग मंत्री मा धनंजयराव गायकवाड, विभाग सह मंत्री मा संतोषजी अनगोळकर इ आज पुणे येथील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी मे बाफना साहेब Court No 2 मध्ये हजर करण्यात आले, त्यांचे जमिनाचे काम ॲड्प्रशांत यादव, ॲड मृणालिनी पडवळ, ॲड संगिता कुलकर्णी, ॲड अनिल शिंदे, ॲड मंगेश नढे, ॲड सोहम यादव, ॲड कृष्णा वाघमारे, ॲड आनघा नाखवा ॲड जयश्री बिडकर,ॲड नरेंद्र कुलकर्णी,ॲड अलोक गायकवाड, ॲड विनोद रासकर, ॲड श्याम चव्हाण, ॲड माधुरी पाटोळे, ॲड सागर सातपुते व इतर अधिवक्तानी विशेष सहभाग घेतला व सर्वांचे जामीन केले.

यावेळी कालरात्री पासून आपणांस सहकार्य करणारे मा महेश जी करपे (महानगर कार्यवाह) आमदार सुनिल जी कांबळे, नगरसेवक धिरज घाटे, नगरसेवक योगेश समेल, प्रांत मंत्री संजयराव, विशेष संपर्क प्रमुख किशोर जी चव्हाण, मठ मंदिर समिती प्रमुख मनोहर जी ओक, सेवाकार्य प्रमुख तुषार जी कुलकर्णी, श्रीकांतजी चिल्लाळ, नितीनजी महाजन तसेच प्रांत, विभाग व जिल्हा, भाग पदाधिकारी, बजरंगी, व हिंदू संघटना कार्यकर्ते व स्वताहून जामीन राहिलेले सर्वाचे मनः पूर्वक आभार !!

।।जय श्रीराम।।

।।जय पुण्येश्वर।।

।।आई भवानी शक्ती दे, पुण्येश्वराला मुक्ती दे ।।

**ॲड सतिश गोरडे.**

प्रांत सह मंत्री विश्व हिंदू परिषद..



# सरस्वती - सिंधुची कला आणि अभिरुची

कला ही मोठी मनोरंजक गोष्ट आहे. अदृश्य असणाऱ्या तरीही जाणवणाऱ्या अनुभूतीला दृश्य स्वरुपात साकारणे म्हणजे कला. मग ते ऋग्वेदामधून येणारे उषस सूक्त असेल किंवा ऋग्वेदाचे अग्नीला उद्देशून असणारे सूक्त असेल किंवा ऋग्वेदाचे अग्नीला उद्देशून असणारे सूक्त असेल. निसर्गाच्या या विविध रूपांमध्ये जाणवणारी परमेश्वरी अनुभूती ऋचा बनून समोर येणे ही एक कलाच नाही का! अमूर्त आणि अविनाशी अशा ईश तत्वाचे पूजन आणि त्यांना मानव्य रूप देऊन त्यांच्या रौद्र तरीही सुंदर रूपाचे वर्णन ऋग्वेदामध्ये अनेक ठिकाणी येते. ऋग्वेदाची सुरुवात अग्नीच्या पूजनाने होते. यातील पहिल्या ऋचेमध्ये अग्नी देवतेचे आवाहन आहे. या अग्नीची पाठ, त्याचे मुख, केस इत्यादी घृताचे म्हणजे तुपाचे आहेत. त्याचे केस अतिशय सुंदर आहेत. त्याला दाढी आहे. त्याच्या दाढा तीक्ष्ण आहेत. दात चमकदार आहेत. तो यज्ञाचा पुरोहित आहे. वेदांमधून यासारखीच स्तुतीपर वर्णने उषा, इंद्र, वरूण अशा अनेक देवतांबद्द्लही आहेत. वैदिक कालखंडामधील काव्याच्या कलेचे सर्वोच्च रूप आपल्याला वेदांमधून दिसते.



आता या कलेची अजून एक खासियत आहे बरं का! या कलेचे विविध आयाम आपल्याला कलाकाराच्या नजरेतून अनुभवता येतात. ही कला भीमबेटकाच्या गुहांमधून प्राथमिक स्वरुपात आणि आदिम शैलीच्या स्वरुपात व्यक्त होते. या आदिम कलेमध्ये रोजच्या जगण्यातले चैतन्य दिसते. तर मानवी विकासाच्या पुढच्या प्रवासात या कलेला कलासक्त आणि त्याही पुढे जाऊन एक अध्यात्मिक बैठक मिळालेली दिसते. अर्थात कलेच्या आदिम रूपापासून ते अध्यात्मिक दृष्ट्या उन्नत मूर्तीकला,चित्रकला,साहित्य अशा नानाविध कलांपर्यंतचा मानवाचा प्रवास अद्भुत आहे.


जगभरामध्ये विविध संस्कृतींबरोबर त्यातल्या कलाही बहरल्या. आर्थिक आणि राजकीय स्थैर्य, सुबत्ता, मानवी जीवनातील सहजता आणि या सर्वातून उमलत जाणारी सौंदर्यदृष्टी कोणत्याही कलेच्या माध्यमाची बैठक घडवतात. सरस्वती-सिंधु संस्कृतीमध्ये या सर्व घटकांमुळे कलेला आश्रय मिळाला. भारतीय दृश्य कलांची सुरुवात सरस्वती सिंधू संस्कृतीतील अनेक कलात्मक गोष्टींपासून सुमारे ५००० वर्षांपूर्वी झाली. या संस्कृतीमधील लोकांना दैनंदिन गरजांसाठी आवश्यक असणाऱ्या कला तर अवगत होत्याच पण रोजचे जीवन देखणे करणाऱ्या रंगकाम, मातीकामासारख्या कलाही चांगल्याच माहिती होत्या.

हडप्पा संस्कृतीमधील शेतकरी हे जगातील सर्वात प्रथम कापसाची शेती करणारे आणि त्यापासून धाग्यांची निर्मिती आणि वस्त्र तयार करणारे जगातील पहिले कारागीर होते. सन १९२९ मध्ये मोहेंजो दारो येथे झालेल्या उत्खननात सुती धाग्यांचे अवशेष मिळाले आहेत. सिंधू सरस्वती संस्कृतीमधील कापूस आणि त्यापासून बनणारे सुती कापड यांना तत्कालीन परदेशी व्यापारामध्ये मोठी मागणी होती. मेहेरगड ( बलुचिस्तान- पाकिस्तान) येथे याच काळातील कापसाच्या बिया मिळाल्या आहेत.

कापसापासून सूत काढणे आणि कापड विणणे याचे उल्लेख वेदांमधूनही आढळतात. इ. स. पू. पाचव्या शतकात हेरोटोडस या ग्रीक इतिहासकाराने भारताला भेट दिली होती. त्याच्या लिखाणातही अत्यंत उत्तम प्रतीच्या भारतीय कापडाचा उल्लेख

येतो. कापसापासून बनविलेल्या सुती कापडाचा भारतातील इतिहास अत्यंत प्राचीन आहे. आज ''पांढरे सोने'' (white gold) म्हणून प्रसिद्ध असणाऱ्या कापसाचे संदर्भ सरस्वती सिंधू संस्कृती पर्यंत मागे जातात. या संस्कृतीचा कालखंड हा अनेक अर्थानी आणि अनेक क्षेत्रात प्रगतीचा होता. त्याचबरोबर हा कालखंड ''ताम्र पाषाण'' युगाचाही (chalocholithic age) होता. त्यामुळ या कालखंडात पाषाण, मृदा यांच्याबरोबर तांब्यापासून बनवलेल्या अनेक गोष्टी आणि आभूषणे दिसतात.

हडप्पा येथे उत्खननात मिळालेली ब्राँझ धातूची नर्तिकेची मूर्ती जगभरात dancing girl of Harappa म्हणून प्रसिद्ध आहे. याच काळात बनलेल्या धातूंच्या अनेक वस्तू या कालखंडाच्या प्रगतीची साक्ष देतात. हडप्पा आणि मोहेंजोदडो येथे शुद्ध तांब्यापासून बनविलेल्या अनेक वस्तू उत्खननात मिळाल्या आहेत. धातू शुद्ध करण्यासाठी आणि या वस्तू बनवण्यासाठीचे तंत्रज्ञान सुमारे ५००० वर्षांपूर्वी विकसित झाले होते हे आश्चर्यकारक आहे. तांब्याबरोबरच सोन्याची आभूषणे देखील या कालखंडात वापरात होती. बांगड्या, गळ्यात घालण्याची आभूषणे, पदके, केसांत माळण्याची सोन्याची आभूषणे ही देखील सापडली आहेत. शुद्ध प्रतीचे तांबे आणि सोने या धातूंचा सरस्वती सिंधू संस्कृतीतील वापर हा तत्कालीन लोकाचे उच्च राहणीमान आणि सुबत्ता दर्शवितो.



कलेची अभिव्यक्ती जशी तांबे सोने अशा विविध धातुंमधून व्यक्त होत होती तशीच ती विविध प्रकारच्या मृण्मय मुद्रा, मूर्ती आणि सुबक भांड्यांमधूनही होत होता. मोहेंजोदडो येथे मिळालेली एक मूर्ती जी तत्कालीन समाजाच्या धर्मगुरूची आहे असे म्हटले जाते. या पाषाण मूर्तीवरील बारकावे आज इतक्या वर्षांनंतरही थक्क करणारे आहेत.हडप्पा संस्कृतीमधील मृण्मय मुद्रा (earthen seals) ज्या प्रामुख्याने व्यापारातील व्यवहारासाठी वापरल्या जात. या मुद्रांवरील रेखांकने या संस्कृतीमधील नागरीकांच्या कलेच्या अभिरुचीची साक्ष देतात. या नगरांमधील नागरिक आपल्या घरांचे सुशोभीकरण करत असत. घरांच्या भिंतींवर गेरूचा गिलावा करून त्यावर नक्षी काढत असत.

या आणि अशा अनेक मृण्मय मूर्तींमधून तत्कालीन कलावंतांचे नैपुण्य नजरेस येते. या संस्कृतीमधील आभूषणांबरोबर कारागिरांनी घडविलेल्या सुंदर मण्यांना, शंखाच्या बांगड्याना दूरवरच्या देशांमध्ये मागणी होती. आर्थिक सुबत्ता होती म्हणूनही असेल पण दागिन्यांची हौस स्त्रियांबरोबर पुरुषांनाही होती. साहजिकच विविध प्रकारचे दागिने बनवण्याची उत्तम कलाही या काळात विकसित झाली होती. आर्थिक सुबत्ता होती म्हणूनही असेल पण दागिन्यांची हौस स्त्रियांबरोबर पुरुषांनाही होती दागिने आणि स्त्रियांची नटण्याची आवड ही आजची नसून याचे ५००० वर्षांपूर्वीचे पुरावे सापडले आहेत. सोन्याचांदीचे दागिने, किंमती दगडाचे मणी एवढेच नव्हे तर कज्जल शलाका अर्थात eye pencil, ब्राँझ चे आरसे, हस्तिदंती कंगवे या गोष्टी तत्कालीन स्त्रियांची नटण्याची आवड समजण्यासाठी पुरेशा आहेत, नाही का!

अनेक ठिकाणच्या उत्खननात सोने, चांदी,तांबे,हस्तिदंत या पासून घडविलेली आभूषणे मिळाली आहेत. त्याचबरोबर विविध प्रकारचे सुंदर मणी देखील मिळाले आहेत. सरस्वती सिंधु संस्कृतीमधील कारागीर हे देखणे आणि आकर्षक दागिने घडविणारे जगातील प्रथम कारागीर होत. दागिने घडविण्याची ही ५००० वर्षांपूर्वीची कला आणि कलाकारांचे कौशल्य आजही जगभरात नावाजले जाते. उत्खननात मिळालेले हे दागिने लापिस लाझुली सारखे देखणे मौल्यवान खडे, ब्राँझ, आणि टेराकोटा अशा लोकप्रिय आणि नेहमीच मागणी असणाऱ्या गोष्टींपासून बनविले गेले आहेत. चाहुन्दारो (सिंध प्रांत – पाकिस्तान) येथे वेगवेगळे मणी बनविण्याचा कारखाना होता हे उत्खननातील संशोधनाने सिद्ध झाले आहे. त्याचबरोबर हडप्पा पूर्व किंवा या नागरी संस्कृतीच्या अगदी आरंभी देखील अशा प्रकारचे सुंदर मणी बनवत असत हे सिद्ध झाले आहे. या संस्कृतीच्या अगदी आरंभी असणारा असे मणी घडविण्याचा कारखाना (workshop) हरियाणा मधील कुनाल या ठिकाणच्या उत्खननात सापडला आहे.

सरस्वती सिंधू संस्कृतीमधील मातीची भांडी देखील कलाकुसर केलेली आणि वैशिष्ट्यपूर्ण आहेत. येथील उत्खननात सापडलेल्या मृत्पात्रांचा कालावधी हडप्पा पूर्व काळात घेऊन जातो. यावरून या प्रदेशातील मानवाला अशी मृण्मय पात्रे बनविण्याची कला नागरी संस्कृतीचा आरंभ होण्याआधीपासून अवगत होती असे दिसते. अशा प्रकारची भांडी कोटदिजी (सिंध प्रांत पाकिस्तान) येथे मिळाली आहेत. सिंधु संस्कृतीमधील

मृत्पात्रे अतिशय शुद्ध मातीपासून बनविलेली तांबूस रंगाची आणि त्यावर काळ्या रंगाने नक्षी काढलेली अशी दिसतात. ही भांडी वैविध्यपूर्ण आकारांत सापडतात. भांड्यांचे हे आकारही वैशिष्ट्यपूर्ण आहेत. स्टँडवरील थाळ्या, मोठमोठाले रांजण, मोठी भांडी ठेवण्याकरिता बनविलेल्या गोल बैठका, उंच, सरळ बाजू असलेली भोकाभोकाची भांडी, थाळ्या, पणत्या व पेले आणि इतर अनेक प्रकार वापरात होते. विविध आकारांबरोबरच त्यांवर काळ्या रंगात रंगविलेली नक्षीही वैशिष्ट्यपूर्ण आढळते. पिवळसर अथवा गुलाबी, काळ्या अथवालाल रंगामध्ये ही नक्षी काढलेली आहे. ही नक्षी प्रामुख्याने चित्रचौकटीच्या स्वरुपात काढली जाई. जाळ्या, सोंगट्याच्या पटातल्यासारख्या चौकटी, फुले, ताडाची आणि पिंपळाची पाने, खवले, मोर, मासे इ. विविध प्रकारया नक्षीत आढळतात. मानवी आकृतींची चित्रे फार थोडी आहेत.मृत्पात्रांची घडण आणि त्यांवरील चित्रांची सुबकता सिंधू संस्कृतीच्याआधीच्या काळामध्ये जितकी नजरेत भरते, तितकी नंतरच्या काळामध्ये आढळत नाही. अगदी रोजच्या जीवनातही अभिरुची आणि सौन्दर्यदृष्टी जोपासणे हे या प्रगत नागरी संस्कृतीचे मोठेच वैशिष्ट्य आहे. जगभरातील अनेक नागरी संस्कृतीमध्ये अशा छोट्या परंतु उल्लेखनीय संदर्भांमुळे सरस्वती सिंधू संस्कृती एकमेवाद्वितीय ठरते!

हडप्पा संस्कृती मधील मृण्मय मुद्रा ही अतिशय वैशिष्ट्यपूर्ण आहेत. विशिष्ट चौकोनी आकारात असणाऱ्या या मुद्रा (earthen seals) अनेक प्रकारच्या चिन्हांनी अंकित केलेल्या आहेत. या चिन्हांमध्ये भारतीय संस्कृतीमध्ये आजही शुभ चिन्ह (motif) म्हणून वापरले जाणारे स्वस्तिक या मुद्रांवर दिसते. त्याचबरोबर एकशिंगी प्राणी, बैल, काळवीट, वाघ, हत्ती अशी नानाविध प्राण्यांची चिन्हे देखील या मुद्रावर आढळतात. व्यवहारासाठी वापरल्या जाणाऱ्या या मुद्रा विशिष्ट प्रकारच्या मातीने बनविलेल्या असत आणि त्या चांगल्या खरपूस भाजलेल्या असत. त्याचबरोबर त्यांना या सगळ्या प्रक्रियेमध्ये त्यांना एक चकाकी सुद्धा येत असे. या प्रतिकातून तत्कालीन धार्मिक भावना आणि समजूती काही प्रमाणात समजण्यास मदत होते. काही रुपके महत्त्वपूर्ण आहेत. उदा., एका मुद्रेवर एक व्यक्ती बसलेल्या अवस्थेत दर्शविलेली आहे. या व्यक्तीला तीन मुखे असून शिरोभूषण शृंगाकृती आहे. व्यक्तीच्या एका बाजूला हत्ती आणि वाघ, दुसऱ्याबाजूला गेंडा आणि महिष आणि समोर काळवीट अथवा बकरी दाखविलेली आहे. अभ्यासकांच्या मते शिव अथवा पशुपतीचे पहिले चित्रण हेच असावे. त्याचबरोबर एका मुद्रेवर सात स्त्रियांचे अंकन आहे. आणि त्याच्या पायाशी काही जण उभे आहेत. या मुद्रेच्या अभ्यासावरून हे सप्त मातृकांचे चित्रण असावे असे वाटते.

सरस्वती सिंधू संस्कृतीमध्ये सापडणाऱ्या या विविध घातांवरून त्या काळातील समाज जीवन, त्यांचे राहणीमान, सुबत्ता, स्थैर्य त्याच बरोबर काही अंशी धार्मिक समजुती, पूजनीय गोष्टी यांचा अंदाज येतो.

हडप्पा संस्कृतीचा कालखंड हा ताम्र पाषाण युगाचा असल्याने अनेक तांब्याच्या वस्तू आढळतात तसेच, सोन्यापासून घडविलेले विविध प्रकारचे दागिने जसे कडे, हार, बांगड्या, कर्णभूषणे, अंगठ्या, हे ही दिसून येतात. सिंधू संस्कृतीचा काळ हा मौल्यवान खडे आणि रत्ने यांच्यासाठी ओळखला जातो. परंतु इतिहासाचा इतक्या प्राचीन कालखंडातील कारागिरांचे हे कौशल्य आजही संशोधकांमधील अभ्यासाचा आणि विवादाचा विषय आहे.

सरस्वती सिंधू नागरी संस्कृतीचा (urban civilization) अभ्यास अव्याहत सुरु आहे. या अभ्यासातून आजही अनेक विलक्षण आणि अनाकलनीय गोष्टी पुढे येत आहेत. ५००० वर्षांपूर्वी एका प्रबळ आणि स्थिर संस्कृतीचा पाया रचून ती परम वैभवाप्रत नेणाऱ्या आपल्या पूर्वजांची क्षमता आणि बुद्धिमत्ता पाहून मन थक्क होते. पण इतक्या भरभराटीला आलेल्या या संस्कृतीच्या अंताचा प्रवास अज्ञात आहे. सुबत्ता, संपन्नता, स्थैर्याच्या उच्चतम अवस्थेला असणाऱ्या या संस्कृतीचा अंत आजही आपल्यासमोर अनेक प्रश्न उभे करतो.

(क्रमशः)

**लेखांकन : विनिता हिरेमठ**

**संपर्क : ८३०८९०८८९९**

**Dhanashree Hospital**
Accident, Industrial Injuries, I.C.U.

**Dr. Rajeev N. Patwardhan, M.S. (Ortho)**
Consultant Orthopedic Surgeon
**Dr. Apoorva R. Patwardhan, M. S. (Ortho), A.F.A.O.A.**
Shoulder & Joint Replacement Sureon

Thermax Chowk, Opp. K. Bajaj School, Chinchwad, Pune - 411 019.
Ph. : 020-27370540, 27370583, 72760032/34
E-mail : dhanashreehospital@gmail.com




# गुढीपाडव्याची महती

गुढीपाडवा म्हणजे हिंदू कालगणनेनुसार येणारा वर्षाचा पहिला दिवस. हिंदू धर्मानुसार वर्षाचे जे ५० सण येतात, त्यातील पहिल्या सणाचा मान गुढीपाडव्याला. चैत्र शुद्ध प्रतिपदेला चंद्र आपली कक्षा बदलतो. असे म्हणतात की चैत्र शुद्ध प्रतिपदेला सृष्टीची निर्मिती झाली म्हणजे हा सृष्टीचा जन्मदिवस. शिशिर ऋतूत झालेल्या पानगळीमुळे झाडे ओकी बोकी वाटतात. त्या झाडांकडे बघायला पण डोळ्यांना त्रास होतो पण वसंत ऋतूच्या आगमनाने झाडांना नवी पालवी फुटते, फुले फुलायला लागतात, वातावरणात फुलांचा, आंब्याच्या मोहराचा, सुंगधी मोगऱ्याचा सुगंध दरवळत असतो. वसंत ऋतूत निसर्गाचे दर्शन अलौकिक असते. वर्षातील कोणत्याच ऋतूत नसते अशी रंगरूप व गंधाची लयलूट असते. अबोली, चाफा,मधुमालती, अनंत, मोगरा आपला फुलोरा व सुगंध मिरवू लागतात. अननस पिकून झाडावर तयार झालेले असतात. त्याचा सुवास हवेत भरलेला असतो. जाईचा सुगंध आस म्हंणतात दरवळत असतो. बोगनवेल घोसाघोसात रंगाची उधळण करू लागते. बहाव्यात रंग भरतो, पळस फुलतो आणि गुलमोहरावर रक्तिमा चढायला लागतो. अशा सुंगधीत व रंगबेरंगी वातावरणात पाखरे आनंदाने भरारी घेत असतात तर फुलपाखरे आपल्या तलम व दिमाखदार रंगीबेरंगी पंखाची लयबद्ध उघडझाप करीत फुलांच्या ताटव्यावर मिरवत असतात.

मानवी जीवनातील मरगळ झटकण्याचे हे चित्रांकीत दिवस असल्याचे दस्तुरखुद्द निसर्गच सांगत असतो. निसर्गात चैतन्य भरलेले असते, सृष्टीचे हे अनाघ्रात रूप पाहून माणसाला त्याचा उत्सव साजरा करावासा वाटला तर त्यात नवल ते काय ? असा या प्रसन्न नैसर्गिक वातावरणात उत्सव चैतन्याचा साजरा करण्याची प्रथा सुरु झाली.

भारत हा शेतीप्रधान देश असल्याने आपल्याकडे बरेचसे सण हे शेतीच्या कामाशी निगडीत असतात.गुढीपाडव्याच्या सुमारास शेतकरी कापणीची कामे करून जरा मोकळे झालेले असतात, रबी पिके सुद्धा हाती आलेली असतात आणि सर्वत्र आनंदाचे वातावरण असते.



गुढीपाडवा साजरा करण्यामागे धार्मिक कारणे ही आहेतच. रामाने रावणाचा म्हणजे दुष्ट प्रवृतीचा वध म्हणजे नाश केल्यानंतर, याच दिवशी तो अयोध्याला आला. त्यामुळे लोकांनी रामाच्या विजयाचे प्रतिक व आनंद साजरा करण्यासाठी घरोघरी गुढ्या उभारल्या. गुढी हे रामाच्या विजयाचे प्रतिक व विजयाचा झेंडा हा नेहमीच उंच असतो म्हणून झेंड्यासारखी उंचीवर गुढी उभारण्यासाठी प्रथा पडली. पैठणच्या शालिवाहन राजाने सुद्धा शाकाचा नाश केला व तो विजयी होऊन पैठणला आल्यावर लोकांनी घरोघरी गुढ्या उभारल्या.

लोक अस मानतात की ब्रम्हदेवाने याच दिवशी विश्वाची निर्माती केली व सत्ययुग सुरु झाले, म्हणून ब्रह्मदेवाचा झेंडा म्हणजे गुढी उभारण्याची प्रथा पडली. गुढी हे विजयाचे, भरभराटीचे प्रतिक आहे. गुढी उभारल्यावर घरातील सर्व दुष्ट प्रवृतीचा नाश होऊन समृद्धी प्राप्त होते व चांगला काळ येतो अशी समजूत असल्याने आजही लोक गुढी उभारतात.गुढीची उंच काठी प्रतीकात्मक असून ती आपल्याला उच्च विचार व उच्च ध्येयासाठी प्रेरित करते, त्यावर लावण्यात आलेल्या गोड गाठी स्वत:चा अहंम बाजूला ठेवून गोड बोलायला शिकवतात. गुढीवर पालथा घातलेला गडवा आपल्याला तर्कशुध्दपणे विचार करण्याची शिकवण देतो. अशी ही गुढीची महती असल्याने गुढीपाडवा भारतातच नव्हे तर परदेशातील भारतीय सुद्धा उत्साहाने साजरा करतात. खरं म्हणजे या दिवशी लोकांनी नुसती गुढी उभारून चालणार नाही. पूर्वी ती उभारत कारण खरोखरच दुष्ट प्रवृतींचा समूळ नाश झाला होता पण आता लोकांनी गुढीपाडव्याच्या दिवशी स्वत:मधील वाईट गुणांचा त्याग करून चांगल्या गुणाचा स्विकार करण्याचा व आपली जीवनपद्धती सुधारण्याचा संकल्प करायला हवा, तरच त्या उभारलेल्या गुढीला अर्थ प्राप्त होईल.

कोकणात सुद्धा हा सण उत्साहाने साजरा करतात त्याला कोकणात 'संवत्सर पाडवो' म्हणतात. आंध्रप्रदेशात व कर्नाटकात सुद्धा गुढीपाडव्याला 'उगडी'(ीसवळ) म्हणतात, सिंधी लोक गुढीपाडवा 'चेनी चांद' या नावाने साजरा करतात.

आंध्रप्रदेश व कर्नाटकात लोक दिवाळीप्रमाणेच पहाटे उठून स्नान करतात व देवाची प्रार्थना करतात. नवीन वर्षाच्या सणाचे स्वागत म्हणून ते घर स्वच्छ करतात. दारात शेणाचा सडा टाकतात, घरांना सजावट करतात. प्रत्येकाच्या दारात विविध रंगाची उधळण करणारी मोठी रांगोळी असते. जणू निसर्गातील विविध रंगाचे प्रतिनिधित्व ती रांगोळीच करत असते. आपण जसे आंब्याच्या पानांचे तोरण दारात लावतो तसेच दक्षिणेकडेही लावतात. ते असे मानतात की शंकर पार्वतीचे दोन्ही पुत्र– गणेश व कार्तिक, या दोघांना आंब्याच्या झाडांची पाने खुप आवडत. त्यामुळे त्यांच्यासाठी म्हणून लोक आंब्याच्या झाडाच्या पानाचे तोरण दाराला लावतात. आंब्याची पाने भारतीय संस्कृतीत शुभ मानली जातात. प्रत्येक धार्मिक कार्याला आपण कलश व आंब्याची पाने ठेवतोच. पुढील पिक चांगले येवो, भरभराट होवो, समृद्धी येवो हीच भावना तोरण लावण्यामागे असते. या दिवशीची प्रार्थना व गुढीची पूजा सुद्धा याच भावनेने केली जाते.

आपल्या हिंदू धर्मात प्रत्येक सणाला काही प्रथा आहेत, त्या पूर्ण विचारांनी ठरवलेल्या आहेत. गुढीपाडव्याला गुळ आणि कुटलेली कडूलिंबाची पाने यांचे मिश्रण थोडेतरी खावे असे शास्त्र मानते. त्याच प्रमाणे आंध्रप्रदेशात या दिवशी 'उदगी पिचडी' (णवरसळ झळलहरवळ) बनवतात, त्यालाच कर्नाटकात 'बेवू बेला' (इर्शीी इशश्रश्र) म्हणतात. उदगी पिचडी मध्ये गुळ, कडूनिंबाच्या झाडांची फळे किवा फुले, कैरीचे बारीक बारीक तुकडे व चिंचेचा कोळ यांचे मिश्रण असते. उसापासून तयार आलेला ताजा गुळ वापरून बनवलेल्या या पिचडीला एक वेगळाच स्वाद असतो. या उदगी खिचडीत वापरलेला प्रत्येक घटक महत्वाचा असतो. आयुष्य हे गोड,कडू, आंबट अशा सगळ्या प्रकारचे घटनांनी भरलेले आहे हे त्यातून प्रतीत होते.त्यातून असेही सूचित होते की आयुष्यात चांगले, वाईट, आनंदाचे, दुःखाचे, यशाचे, अपयशाचे सर्व प्रकार प्रसंग येतच असतात. पण दुःखाच्या प्रसंगी डगमगून आत्मविश्वास न घालवता त्याचाही आनंदाप्रमाणे स्विकार करायचा असतो. या वर्षी येणाऱ्या आपत्तीचा सामना करण्यासाठी प्रत्येकाने मनाचा निर्धार करावा हा संदेश त्यातून मिळतो. गोंदवलेकर महाराज म्हणतात 'जीवनात सुख व दुःख या एकाच नाण्याच्या दोन बाजू एकमेकांना चिकटून आहेतच, त्यातील एकच बाजू उचलण्याची अनाठायी धडपड कशाला ?' जीवनात सुख हव असेल तर त्यापाठोपाठ सावलीसारखे येणारे दुःखही स्वीकारावे लागते. यश हवे असेल तर अपयश स्वीकारावेच लागते, हीच शिकवण या दिवशी आपण जे गुळ व कडूनिंबाचे सेवन करतो त्यातून आपल्याला मिळते.

किंबुहना भारतापेक्षा जास्त उत्साहाने गुढीपाडवा युरोप, अमेरिका, ऑस्ट्रेलिया इ. देशातील भारतीय साजरे करतात. त्याचे महत्वाचे कारण म्हणजे मायभूमीपासून आप्तइष्टांपासून दूर असणाऱ्या भारतीयांना तेथे मायभूमीची, तेथील संस्कृतीची प्रकर्षाने आठवण येते. लहानपणापासून घराघरात साजऱ्या केलेल्या सणाच्या सुखद स्मृती बरोबर असतात. आपल्या नातेवाईकांना जरी भेटू शकलो नाही तरी मित्रमैत्रीणींना, विशेषतः भारतीयांना भेटण्याचे एक निमित्त तेथे भारतीय शोधतच असतात व अशा सणांच्या निमित्ताने एकत्र येतात. भारतीय संस्कृतीशी निगडीत सणवार, समारंभ यांची ओळख परदेशातील व्यक्तींना करून देण्यातही भारतीयांना अभिमान वाटतो. खास भारतीय पद्धतीची पारंपारिक वेशभूषा करण्याची संधी सुद्धा परदेशात क्वचितच मिळते त्यामुळे स्त्रिया ठेवणीतल्या पैठण्या, जरतारी साड्या, नऊवारी साड्या, नथी, दागिने, तर पुरुष शेरवानी, झब्बा पायजमा, मोजडी इ. घालून मिरवण्याचा चान्स या सणानिमित्ताने घेतात. परदेशात स्थायिक झालेल्या अनेकांची मुले आता मोठी झाली आहेत, त्यांना भारतीय संस्कृतीशी तोडओळख तरी असावी हाही एक सणवार साजरीकरणाचा तेथील हेतू असतो. हल्ली भारतातील बऱ्याच मुली लग्न होऊन युरोप–अमेरिकेत जातात पण तेथे त्यांना लगेच वर्क परमिट मिळत नाही, त्यामुळे अशा तरुण मुली होमसिक होतात, त्यांना मैत्रिणीना भेटायचे असते, या तरुण मुली पुढाकार घेऊन सण साजरे करण्यासाठी कार्यक्रमांचे आयोजन करतात. लोकांना इ–मेल करणे, त्यांचा प्रतिसाद घेणे, जेवणाचे कॉन्ट्रॅक्ट देणे, सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित इ.करणे त्यांना शक्य असते व त्यासाठी उत्साहही भरपूर असतो. त्यामुळे परदेशात सणांचे साजरीकरण जितक्या उत्साहाने केले जाते तेवढ्या उत्साहाने व मोठ्या प्रमाणावर भारतातही सर्वत्र होतेच असे नाही. उलट भारतातच आपण आता फार बिझी झाल्याने सणाच्या म्हणजे सुट्टीच्या दिवशी आराम करण्याचा प्रयत्न करतो. परदेशात मात्र शनिवार–

रविवार दोन दिवस साप्ताहिक सुट्टी असल्याने, लोक शनिवारी एन्जॉय करतात व रविवारी आराम करतात.

परदेशातील गुढीपाडवा, होळी गणेशोत्सव इ.सण अगदी त्याच दिवशी साजरी होत नाहीत कारण तेथे आपल्या सणांसाठी सुट्टी नसते, परंतु आपला सण झाल्यावर येणाऱ्या शनिवारी किंवा रविवारी ते सण साजरा करतात. परदेशातील सर्वच सणवार साजरीकरणात महाराष्ट्र मंडळे पुढाकार घेतात. अमेरिकेतील न्यूयॉर्क, शिकागो, डेट्रायट, सिनसिनाटी, टेनसी इ.तर इंग्लडमध्ये सुद्धा मोठ्या शहरात महाराष्ट्र मंडळातर्फे गुढीपाडवा साजरा केला जातो. साजरीकरणाचे स्वरूप सारखेच असते. सर्व लोक आपापल्या घरी गुढी उभारतात परंतु महाराष्ट्र मंडळातर्फे चित्रपट दाखवणे, नाटकाच्या स्पर्धा घेणे, संगीताच्या कार्यक्रमाचे आयोजन, नृत्यगायनाचे सभासदांचे कार्यक्रम, अगदी रामलीला सुद्धा सादर करणे इ. संपूर्ण दिवसभर विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करून अगदी श्रीखंड, पुरीच्या जेवणाचाही आस्वाद घेतात. नऊवारी साड्या किंवा पैठणी, नथ, भरपूर पारंपारिक दागिने, केसांचा अंबाडा त्यावर गजरे,सुवासिक अत्तर किंवा स्प्रेचा घमघमाट इ.मुळे सर्व वातावरण आनंद व चैतन्यानी भरलेले असते. परदेशी नागरिक सुद्धा हा आनंद सोहळा बघण्यासाठी कौतुकाने येतात. हल्ली परदेशातील अनेक सणांना भारतीयांचे परदेशी मित्रमैत्रीणी, कार्यालयीन सहकारी आवर्जून येतात व सहभागी होतात. त्यामुळे आपल्या संस्कृतीची, सणांची, त्यामागील उद्देशांची भारतीय नव्या पिढीला व परदेशी जनतेला जवळून ओळख होते. भारतीय संस्कृतीच्या प्रचाराचे फार मोलाचे कार्य आपल्या परदेशी भारतीयांकडून होत आहे. लंडनला तर गुढीपाडव्याच्या दिवशी अनेक ठिकणी लोक एकत्र जमा होतात, रांगोळ्या घालतात, गुढ्या उभारतात, घरांची दारे तोरणाने सजवतात, आनंद मेळावा आयोजित करतात व आनंद व्यक्त करतात.

हल्ली बरेचशी भारतीय मुले, मुली, परदेशी विद्यापीठात, शैक्षणिक संस्थांमध्ये उच्चशिक्षणासाठी जातात, त्यामुळे आता कॅम्पसवर सण साजरे करण्याची नवीन पद्धती रूढ झाली आहे. अमेरिकेच्या बोस्टन विद्यापीठात, लंडनच्या, न्यूझीलंडच्या, ऑस्ट्रोलियाच्या शैक्षणिक संस्थांमध्ये सुद्धा नऊवारी साडी, नथ इ.वेशभूषेत वावरणारी मुले गुढीपाडव्याची महती परदेशी मित्रांना सांगतात, गुढी उभारतात. त्या निमित्ताने भारतीय भोजनाचे आयोजन करतात तेव्हा ते भारतीय संस्कृतीच्या प्रचारासाठी असलेले ब्रॅन्ड अम्बॅसडरच वाटतात. भारतात राहून भारतीय संस्कृतीचे फारसे कौतुक नसलेले आमचे विद्यार्थी परदेशात जातात तेव्हा भारतीय परंपरा, संस्कृती, सण, उत्सव यांचा अभिमान बाळगून परदेशीयांना त्यांची ओळख करून देतात ही बाब भारताच्या दृष्टीने भूषणावह आहे.

एकुण काय तर माणूस हा उत्सवप्रिय आहे आपल्या कंटाळवाण्या जीवनात पुन्हा उत्साह निर्माण करण्यासाठी जगभर माणसे उत्सव, सण साजरे करतातच. पण भारतीयांचा पाडवा हा पाश्चात्यांच्या नव वर्षापेक्षा अधिक सरस ठरतो कारण पाश्चात्यांच्या नववर्षाची सुरुवात सूर्यास्तानंतर (रात्री बारानंतर ) होते पण आपल्या गुढीपाडव्याची सुरुवात तर सूर्योदयानंतर होते. पाश्चात्य नववर्ष साजरे करतात तेव्हा एकूणच निसर्गात फारसा बदल झालेला नसतो, पण आपल्या गुढीपाडव्याच्या नववर्षाच्या वेळेस निसर्गात अनुकूल बदल झालेले असतात, निसर्गाचे रूप बदलून प्रेक्षणीय होते व लोकांच्या मनाची मरगळ झटकली जाते व उत्साहाने सण साजरा केला जातो.पाश्चात्यांच्या नववर्षाच्या साजरीकरणाला धार्मिक किंवा अध्यात्मिक अधिष्ठान नसते. पाश्चात्यांचे नववर्षाचे साजरीकरण म्हणजे नाच,गाणे, खाणे, दारू पिणे इ. भोगवादी वृत्तीशी निगडीत असते. पण भारतीय संस्कृतीत प्रत्येक सण आपणास काहीतरी संदेश देत असतो म्हणूनच आपला गुढीपाडवा पाश्चात्यांच्या नववर्षापेक्षा केव्हाही सरसच.

**लेखांकन : प्रा.शैलजा सांगळे**
**स्वातंत्र्यवीर सावरकर मंडळ, कार्यकारिणी सदस्य**
**संपर्क : ९८५०५०७१५५**

**विश्व हिंदू परिषद व हिंदुबोधच्या कार्यास हार्दिक शुभेच्छा - सौ. जास्वंदी पिंपुटकर**

**विश्व हिंदू परिषद व हिंदुबोधच्या कार्यास हार्दिक शुभेच्छा - श्री कौस्तुभ अरविंद मराठे**



# गीताबोध १२
# अनन्य-भक्तियोग.

**ज्यामुळे न उद्वेग कोणास,कोणाचाही उद्वेग न ज्यास।**
**हर्ष-निराशा-भय-उद्वेगाने, मुक्त जो तोच मला प्रिय।।**

परमेश्वर भक्तीचं सार्थक काय ? त्याचा आवडता होणे. अश्या प्रिय-भक्ताचे लक्षण भगवान या अध्यायात सांगतात. जो प्रिय (आवडे) सर्वांना आणि सर्वही प्रिय जयाला. विश्वरुपाचे दिव्य दर्शन दिल्यानंतर भगवान अर्जुनाला केवळ अनन्य भक्तीनेच मला जाणणे, पाहणे आणि माझ्याशी एकरूप होणे शक्य आहे असे सांगितले आणि ती कशी करावी हेही सांगितले. मग अर्जुन विचारतो अशी भक्ती करणारे आणि जे अव्यक्त निराकार अशा स्वरूपाची श्रेष्ठ भावाने उपासना करणारे या दोघांमधील उत्तम योगी किंवा श्रेष्ठ कोण आहेत.? भगवान लगेच सांगतात, माझ्यामध्ये मन लावून जे नित्ययुक्त परम श्रद्धेने मला उपासतात, ते माझ्यामते श्रेष्ठ आहेत, परंतु.... जे इंद्रिय समूहांना संयमित करून , अचिंत्य, सर्वव्यापी, अनंत, अनिर्देश , कूटस्थ, नित्य ,अचल , अव्यक्त , अक्षर स्वरूपाची उपासना करणारे, ते संपूर्ण भूतांच्या हितामध्ये रत असलेले आणि सर्व ठिकाणी समान भाव असणारे योगीही मलाच प्राप्त करून घेतात. प्रश्न तुलनात्मक आहे. जेंव्हा मी हे करू की ते ? या मार्गाने जावू की त्या ? असा संभ्रम असतो तेंव्हा असे तुलनात्मक प्रश्न मनामध्ये येतात. म्हणजे मी कोणती शाखा निवडली तर बरे राहील ? अभियांत्रिकी वा वैद्यकीय वा वाणिज्य? असा एखादया विद्यार्थ्याने प्रश्न विचारण्यासारखा आहे. या प्रश्नाचे उत्तर हे विद्यार्थी सापेक्ष आहे, सरधोपट आणि सर्वांना समान नाही. तज्ञ मार्गदर्शक विद्यार्थ्याची योग्यता, क्षमता, आवड आणि कल पाहून त्याला सांगेल की कोणता मार्ग श्रेष्ठ आहे. भगवंतानी गीतेत अध्यात्म साधनेचे सर्व मार्ग सांगितले आहेत. आणि ज्या ज्या वेळी योग्य आणि श्रेष्ठ काय असा निवाडा करण्याचा प्रसंग आला त्यावेळी सर्वश्रेष्ठ मार्गदर्शक भगवंतानी अर्जुनाची योग्यता, क्षमता, पार्श्वभूमी, आवड, कल पाहून उत्तर दिले आहे व त्याच वेळी इतर मार्गही यशकर आहेत हे ही आवर्जून सांगितले आहेत आणि त्यामुळेच भगवद्गीता सर्व संप्रदायांना सर्वमान्य आहे आणि प्रत्येक जण तिच्या आधारे आपल्या मार्गाचे श्रेष्ठत्व सिद्ध करताना दिसतो. अर्थात अर्जुन बहुजनांचे (सध्याच्या राजकीय अर्थाने नव्हे) प्रतिनिधित्व करतो. त्यामुळे अर्जुनासाठी दिलेले उत्तर हे बहुतेक संसारी जनांना उपयोगाचे आहे असे म्हणता येईल. ज्याने त्याने आपला मार्ग तज्ञ, अनुभवी मार्गदर्शकाच्या( गुरूच्या) सल्ल्याने स्विकारायचा आहे आणि म्हणूनच हिंदू संस्कृतीमध्ये गुरूंना अत्यंत महत्त्व आहे. असो. पुढे भगवान सांगतात .. अव्यक्ताची उपासना ही कष्टदायक आहे, कारण देहधारीला अव्यक्ताची धारणा करणे अत्यंत अवघड आणि दुःखदायक आहे. (खरोखर याचा अंदाज जर घ्यायचा असेल तर अव्यक्त आकाशाचे ध्यान कोणत्याही दृश्यवस्तूशिवाय करून पहावे) परंतु जे मत्परायण असणारे संपूर्ण कर्मे माझ्या ठायी अर्पण करून, मलाच अनन्य अशा योगाने निरंतर चिंतन करीत असतात त्यांचा मी शीघ्रतेने मृत्यू संसाररुपी सागरातून उद्धार करतो आणि म्हणून अर्जुना तू ..

१) माझ्या ठिकाणी मन लाव,माझ्यात बुद्धी गुंतव आणि म्हणून माझ्याच ठिकाणी तू निवास करशील यात संशय नाही.

२) असे माझ्यात चित्त लावणे तुला शक्य नसेल तर स्थिर अभ्यासयोगाने मला प्राप्त करून घेण्याची इच्छा धर. सोप्या भाषेत अभ्यास म्हणजे सातत्याने सराव करून प्रयत्नपूर्वक इच्छित ध्येय प्राप्त करून घेणे. गुरू वसिष्ठ श्रीरामांना अभ्यास म्हणजे नक्की काय हे सांगतात.

**तच्चिन्तनं तत्कथनम् अन्योन्यं तत्प्रबोधनम् ।**
**एतदेकपरत्वं च तदभ्यासं विदुर्बुधाः।।**

योगवासिष्ठ-३.२२.२४

३) हा अभ्यास करण्यास तू असमर्थ असशील तर केवळ माझ्याकरता कर्म करण्यामध्ये तत्पर हो. माझ्यासाठी कर्मे

करणारा होऊन सुद्धा सिद्धी मिळवशील.

४) आणि हेही सर्वही करण्यास जर तू अशक्त (असमर्थ) असशील तर मग स्वतःला जिंकून योग-आश्रय सर्व कर्मफळांचा त्याग कर. कारण..

**श्रेयो हि ज्ञानमभ्यासाज्ज्ञानाद्ध्यानं विशिष्यते।**

**ध्यानात्कर्मफलत्यागस्त्यागाच्छान्तिरनन्तरम् ।।१२.१२।।**

१) ज्ञानरहित अभ्यासापेक्षा (यांत्रिक सरावापेक्षा) ज्ञानयुक्त अभ्यास श्रेयस्कर आहे.

२) केवळ ज्ञानाभ्यासापेक्षा ज्ञानाभ्यासयुक्त-ध्यान अधिक श्रेयस्कर आहे.

३) ज्ञानाभ्यासयुक्त-ध्यानापेक्षा सर्व ज्ञानाभ्यासयुक्त-ध्यानाने कर्मफळांचा त्याग अधिक श्रेयस्कर आहे कारण त्यागानेच तात्काळ शांती प्राप्त होते. याठिकाणी पुढील तीन मुद्दे लक्षात घेणे खूप महत्वाचे आहे. अ) हा उपदेश अर्जुनासाठी (त्याची योग्यता, क्षमता आणि पार्श्वभूमी पाहून ) भगवंताने केला आहे. अर्थात संसारमग्न बहुजनांसाठीही उपयुक्त आहे. ब) याठिकाणी भगवंताने खरेतर त्याला साधनेसाठी पर्याय दिले नसून साधनेच्या इयत्ता क्रमाने वर्णन केल्या आहेत. एका इयत्तेतून वरच्या इयत्तेत जात क्रमाने अंतिम लक्ष्य 'सर्व कामनांच्या त्यागाने प्रशांती ' हे साधायचे आहे. ज्याची (स्थितप्रज्ञ)लक्षणे दुसऱ्या अध्यायात भगवंतानी वर्णन केली आहेत. क) कोणत्याही प्रकारच्या साधनेची मग ती सगुण-साकाराची उपासना असो किंवा सगुण- निराकाराची उपासना असो किंवा निर्गुण-निराकाराची उपासना असो किंवा अगदी ईश्वर व वेद न मानणाऱ्यांची निर्वाण साधना असो (या ठिकाणी फक्त हिन्दूभूमीत उदय पावलेले अवैदिक परंतु हिंदू उपासनापंथ अभिप्रेत आहेत), सर्वांची अंतिम सिद्धी हीच होय. कामनारहित स्थिरप्रज्ञेने प्रशांती. यानंतर भगवान अनन्य भक्ताची लक्षणे सांगतात व असा भक्त मला प्रिय आहे. सातव्या अध्यायातील १६ व १७ श्लोकांचा या ठिकाणी पुन्हा संदर्भ आवश्यक आहे. त्याठिकाणी भगवंतानी चार प्रकारचे भक्तांचे वर्णन केले होते. अर्थार्थी, आर्त, जिज्ञासू आणि ज्ञानी भक्त.

**तेषां ज्ञानी नित्ययुक्त एकभक्तिर्विशिष्यते।**

**प्रियो हि ज्ञानिनोऽत्यर्थमहं स च मम प्रियः ।।७.१७।।**

यापैकी ज्ञानी भक्त मला प्रिय आहे . ज्ञानी भक्त म्हणजे बुधाः भावसमन्विताः (११ वा अध्याय ) किंवा साधनेच्या सर्व इयत्ता पार करून सर्व कर्मफळे पूर्णपणे अर्पण केलेला स्थितप्रज्ञ कर्मयोगी. पुन्हा पुन्हा हे लक्षात घेणे आवश्यक आहे की अनन्य भक्ती, ज्ञान आणि कर्म हे वेगळे मार्ग किंवा योग नसून गीतेने प्रतिपादिलेला तिंहिंचा एकत्रित अविभाज्य असा 'गीतायोग ' आहे. याचे तुकडे करून आम्ही अनंतयोगाला सान्त करीत असतो. भगवान सांगतात - जो सर्व भूतांच्या ठिकाणी द्वेषभावाने रहित, सर्वांचा मित्र, करुणामय, तसेच मी-माझेरहित , अहंकाररहित, सुखदुःखामध्ये सम, क्षमावान, सतत संतुष्ट, स्वतःला जिंकलेला, दृढनिश्चय माझ्यामध्ये बुद्धी अर्पित केलेला, असा योगी माझा भक्त तो मला प्रिय असतो.

**यस्मान्नोद्विजते लोको लोकान्नोद्विजते च यः।**

**हर्षामर्षभयोद्वेगैर्मुक्तो यः स च मे प्रियः ।।१२.१५।।**

हा फारच सारगर्भ सुंदर श्लोक आहे. ज्याच्यामुळे कोणालाही उद्वेग वाटत नाही आणि जो कोणामुळे ही उद्विग्न होत नाही. तसेच जो हर्ष, मत्सर, भय आणि उद्वेग इत्यादींनी मुक्त आहे तो मला प्रिय आहे. जो अपेक्षारहित, आतबाहेर शुद्ध, दक्ष, उदासीन, दुःखातून मुक्त, सर्व संकल्पांचा त्याग करणारा तो भक्त मला प्रिय आहे. जो कधी हर्षयुक्त होत नाही, द्वेष करीत नाही शोक करीत नाही, कामना करीत नाही, जो शुभ आणि अशुभ अशा संपूर्ण कर्मांचा त्याग करणार आहे, तो भक्तिमान मला प्रिय आहे. शत्रू आणि मित्र यांच्या ठिकाणी तसेच मानापमानाच्या प्रसंगी तसेच थंडी उष्णता सुखदुःख इत्यादी मध्ये सम असतो. तसेच आसक्ती रहित असतो. निंदा स्तुती ज्याला समान आहेत. मौनी, जे मिळेल त्यामध्ये संतुष्ट, अनिकेत, स्थिर बुद्धी असा भक्तिमान मला प्रिय आहे. 'स्थिरमतिः'असे भक्ताचे शेवटचे विशेषण भगवंतानी वापरले आहे. स्थिरमतिः म्हणजेच स्थितप्रज्ञ. दुसऱ्या अध्यायात शेवटी वर्णन केलेल्या स्थितप्रज्ञ लक्षणांचा येथे वर्णिलेली भक्तलक्षणे हा उत्तरार्ध किंवा विस्तार आहे असेच म्हणता येईल. तेथें अंतरंग लक्षणांवर म्हणजे मनाच्या स्थितीवर भर होता. येथे बहिरंग लक्षणांवर म्हणजे वर्तनावर भर आहे असे दिसते. परंतु आणखी एक लक्षात घेणे अत्यंत महत्वाचे आहे की येथे (किंवा गीतेत कुठेही ) दुय्यम बहिरंग गोष्टींचे प्रतिपादन

नाही. विशिष्ट अंगभूषा, वेशभूषा, विशिष्ट कर्मानुष्ठान, विशिष्ट आचार, विशिष्ट भाषा आणि फक्त विशिष्ट विभूतिचीच शरणता / उपासना इत्यादि. तसेच हे ज्ञान फक्त विशिष्ट वर्गालाच, समाजाला, पंथाला लागू आहे असेही कुठे म्हटलें नाही. संपूर्ण मानवजात मग तो कुणीही असो त्याच्यासाठी हा गीतायोग आहे. एखादया मातेने आपल्या सर्व पुत्रांसाठी सर्व प्रकारचे आरोग्यदायक खाद्यपदार्थ भोजनास समोर मांडावे आणि यातील रुचेल व पचेल ते घेण्याचा पर्याय द्यावा. याप्रमाणे भगवान गीतेत अर्जुनापुढे (त्यानिमित्ताने सर्व मानवाला)साधनेचे सर्व पर्याय मांडतात व यातील हे तुला श्रेयस्कर आहे असे मला वाटते असेही सांगतात. परंतु शेवटी निर्णय अर्जुनालाच घ्यायला सांगतात.(पुढे येईल) . हीच गीतेची थोरवी तथा सर्वश्रेष्ठत्व आहे .

ये तु धर्म्यामृतमिदं यथोक्तं पर्युपासते।

श्रद्धधाना मत्परमा भक्तास्तेऽतीव मे प्रियाः।।१२.२०।।

हे धर्मामृत जसे सांगितले त्याप्रमाणे जे श्रद्धावान मत्परायण होवून उपासना करतील ते भक्त मला अतीव प्रिय आहेत. असे अर्जुनाच्या निमित्ताने भगवान आम्हा सर्वांना , संपूर्ण मानवजातीला सांगत आहेत.

**क्रमश:**

**लेखांकन - श्री नारायण देशपांडे**

**संपर्क : ९८२२६५५८६०**


**।। श्रीनाथ म्हस्कोबा साखर कारखाना लि. श्रीनाथनगर ।।**

**पाटेठाण, पो. राहु, ता. दौंड, जि. पुणे - ४१२२०७ , हडपसर (पुणे) टेलिफॅक्स (०२०) २६९११२४२, २६९९२८९८**

**कारखाना साईट : EPABX NO. ९९२३००२९२४/८५५१८६८८९९, फॅक्स नं. ०११.४३८५०२६१**

**कारखान्याची ठळक वैशिष्ट्ये**

○ पुणे जिल्ह्यातील खाजगी क्षेत्रातील पहिला साखर कारखाना. ○ पांढ्या शुभ्र दाणेदार व निर्यातक्षम साखर /रॉ. शुगर/रॉ शुगर प्रक्रिया/ सर्व पर्याय उपलब्ध. ○ १० मेगॅ वॅट क्षमतेचा सहविद्युत निर्मिती प्रकल्प सुरू. ○ डिस्टीलरी प्रकल्प सुरू. ○ सामाजिक बांधिलकी म्हणून कारखाना अनेक उपक्रम राबवतो. ○ कारखान्याचे ऊस पुरवठादार शेतकऱ्यांबरोबर जिव्हाळ्याचे व आपुलकीचे नाते. ○ महाराष्ट्र शासनाच्या कृषि विभागाच्या सहकार्याने शेतकऱ्यांना मार्गदर्शन व मोफत खत वाटप. कार्यक्षेत्रातील ठिबक सिंचनसाठी कंपन्यांशी करार, योजना राबविण्याचे काम सुरू. कुटुंबातील सर्वांसाठी कारखाना साईटवर अल्पदरांत संगणक प्रशिक्षण योजना सुरू. ○ कुटुंबातील सर्वांसाठी कारखाना साईटवर अल्पदरात संगणक प्रशिक्षण योजना सुरू. ○ कारखाना साईट व देशी गाई संगोपन केंद्र सुरू.

**ॲड. श्री. विकास रामचंद्र रासकर**
उपाध्यक्ष

**श्री. पांडुरंग आबाजी राऊत**
संस्थापक अध्यक्ष

**नामदार श्री. विनोदजी श्रीधर तावडे**
(अध्यक्ष, मा. कॅबिनेट मंत्री, शालेय शिक्षण, उच्च आणि तंत्र शिक्षण, मराठी भाषा आणि सांस्कृतिक कार्य इ. खाते, महाराष्ट्र राज्य)

**संचालक मंडळ**

**श्री. बबनराव सोपानराव गायकवाड**
**श्री. हेमंत संभाजीराव करंजे**
**श्री. अनिल लक्ष्मण बधे**
**श्री. दत्ताराम मारुती रासकर**
**(मुख्य कार्यकारी अधिकारी)**

**श्री. महेश संभाजीराव करपे**
**श्री. अनिल जयवंतराव भुजबळ**
**श्री. माधव पांडुरंग राऊत**
**व प्रवर्तक मंडळ**

**श्री. योगेश दत्तात्रय ससाणे**
**श्री. पांडुरंग तुकाराम कदम**
**श्री. किसन दिनकर शिंदे**

संवाद

**संवाद ट्रेंडप्रिंट्स**

**छपाई क्षेत्रातील एक दर्जेदार सचोटीपूर्ण व्यवहार**

**बी-७, गोवईकर इमारत, शनिवार पेठ, पुणे - ३० दूरध्वनी : (०२०) २४४८५६३२**

Email : sanwadpvt@gmail.com



# श्री राम

श्रीराम हा दशाअवतारांपैकी सातवा अवतार मानला जातो. त्रैलोक्याला पीडा देणारा **रावण** या राक्षसाच्या वधासाठी रामाने अवतार घेतला. दशरथ राजाची भार्या कौसल्या हिच्या पोटी चैत्र शुद्ध नवमीला, म्हणजे दिवसाचा आठवा मुहूर्त, म्हणजेच मध्यान्याच्यापूर्वी चोवीस मिनिटे व मध्यान्यानंतर चोवीस मिनिटे असा रामाचा जन्म झाला. आपण दुपारी बारा वाजता राम जन्म साजरा करतो.




वाल्मिकी रामायणाच्या पहिल्या सर्गात नारदमुनींनी रामाचे वर्णन वाल्मिकींना सांगितले आहे, राम कसा आहे? तो विवेकी, शूर,कांतिमान,धैर्यशील व जितेंद्रिय आहे. तो बुद्धिमान, नीतिमान, उत्तम वक्ता, वैभवशाली व शत्रूंचा नाश करणारा आहे. त्याचे खांदे रुंद, हात मोठे व लांब आहेत. कंठ शंखासारखा, हनुवटी मांसल आहे. छाती रुंद, विशाल मस्तक, कपाळ भव्य असे आहे. डोळे मोठे व सुलक्षणी आहेत. राम धर्म जाणणारा, सत्यवचनी आणि प्रजेच्या हितासाठी झटणारा आहे. तो विद्यासंपन्न, दुष्ट शत्रूंचा नाश करणारा व धर्माचे रक्षण करणारा आहे. तो वेद,वेदांत व तत्त्वज्ञान जाणारा व धनुर्विद्येत प्रवीण असा आहे. समुद्राप्रमाणे धीरगंभीर व हिमालयाप्रमाणे धैर्यवान आहे. राम रक्षेत रामाचे वर्णन बुधकौशिक ऋषींनी–

**तरुणौ रुपसंपन्नौ सुकुमारौ महाबलौ।**

**पुंडरिक विशालाक्षौ चीर कृष्ण जिनाम्बरौ।।**

असे केले आहे. वाल्मीकी रामायणाप्रमाणेच प्रत्येक प्रादेशिक रामायणात रामाचे सुंदर वर्णन केले आहे. स्वतः दशरथाने रामाला ज्यावेळी राज्यपद द्यायचे मनात योजिले त्यावेळी त्याने ही रामाचे गुणगान केलेले आहे. अशा या सर्व गुणसंपन्न असलेल्या श्रीरामाच्या काही गुणांचा आपण विचार करणार आहोत.

**१) पितृभक्त राम** – पितृ वचनासाठी रामाने चौदा वर्षे वनवास पत्करला. लहान वयात पित्याच्या आज्ञेवरून तो यज्ञाच्या रक्षणासाठी विश्वामित्रमुनीं बरोबर वनात ही गेला होता.

**२) भातृप्रेमी राम** – आपली भावंडे लक्ष्मण, भरत व शत्रुघ्न यांच्यावर त्याचे निरतिशय प्रेम होते. लक्ष्मण हा तर त्याचा बहिश्चर प्राण होता. मर्यादापुरुषोत्तम राम, एक पत्नी राम, सत्यवचनी राम, धर्मशील राम! श्रीरामा मधल्या राजकारणी गुणांमुळेच त्याला **राष्ट्र पुरुष** म्हणून ओळखले जाते. गुरुकुलातून शिक्षण पूर्ण करून रामाने तीर्थाटन केले. राक्षसांमुळे उधवस्त झालेले आश्रम बघितले. राक्षसांनी उधळून नाश केलेले यज्ञही बघितले. दुःखी मनस्थितीत त्याने ही स्थिती सुधारण्याचा निश्चय केला. राम–भरत भेटीच्या वेळी रामाने भरताला राज्य शास्त्रातले अनेक प्रश्न विचारले व उपदेश करताना चौदा प्रकारचे दोषही सांगितले. तो उपजतच राजकारणी नेता व समाज सेवक होता. वनवासात असताना ठिकठिकाणी आश्रमांना भेट देऊन तेथील परिस्थिती समजून घेतली. अनेक राक्षसांपासून ऋषींमुनींचे चे संरक्षण केले. शापित राक्षसांना मुक्ती दिली. सीताहरण झाल्यावर तिच्यावि योगामुळे वेड्यापिशा झालेल्या रामाने सुग्रीव, हनुमानदिकांच्या मदतीने सीतेची सुटका केली. रावणाचा वध केला. पण प्रजेसाठी त्याने सीतेला

अग्निपरीक्षा देण्यास भाग पाडले .त्या वेळी राम म्हणाला, जर मी सीतेची शुद्धी न करता तिचा स्वीकार केला असता तर, लोकांनी मला विषयलोलुप व मूर्ख म्हंटले असते. अयोध्येत परतल्यावर सीतेच्या चारित्र्यावर प्रजेकडून पुन्हा आक्षेप घेण्यात आले. त्यावेळीही त्याला 'व्यक्ती की परिवार की राष्ट्र?'हा पेच पडला. रामाने सीतेचा म्हणजे वैवाहिक सुखाचा त्याग केला! संन्यस्त जीवन जगणारा,एक पत्नी व्रत घेणारा राम! आपल्या भावंडांवर आत्यंतिक प्रेम करणारा आदर्श बंधू राम! गुह, सुग्रीव आदिंचा आदर्श मित्र राम! प्रजेसाठी सीतेचा त्याग करणारा प्रजावत्सल राम! धर्मासाठी आपल्या पराक्रमाचा उपयोग करणारा धर्मविजयी राम! रामाचे पूर्ण गुणवर्णन करणे अशक्यच आहे!

**हनुमान**

आता रामदूत हनुमान विषयी. श्रीरामाचा दूत! रामायणात त्याचे महत्त्वाचे स्थान आहे. सात चिरंजीवापैकी एक! शक्तीची देवता असणारा मारुती.

**मनोजवं मारुततुल्य वैगम्।**
**जितेंद्रियं बुद्धिमतां वरिष्ठं।**
**वातात्मजं वानर यूथ मुख्यम्।**
**श्रीराम दूतम् शरणं प्रपद्ये।**

हनुमानाच्या जन्माच्या विषयी वेगवेगळ्या रामायणातून वेगवेगळ्या कथा प्रसिद्ध आहेत. त्याची माता अंजनी एक शापित अप्सरा,एका ऋषींचा अपमान केल्याने, तू वानरी होशील!. हा शाप तिला मिळाला. तिचा केसरी नावाच्या वानराशी विवाह झाला. त्यांचा पुत्र मारुती,हनुमान.! बालपणीच हनुमानाने सूर्याला एक फळ समजून ते खाण्यासाठी आकाशात उड्डाण केले. त्यावेळी सूर्याला वाचवण्यासाठी इंद्रानी अस्त्र फेकून मारले आणि हनुमान बेशुद्ध पडला. असे म्हणतात हनुमान हा वायूदेवाचा मानस पुत्र. इंद्राने हनुमानाला इजा केली हे बघताच त्याचा क्रोध अनावर झाला आणि त्याने प्राणीमात्रातील संचारच थांबवला, त्यामुळे सर्वत्र हाःहाकार उडाला. देव घाबरून गेले .त्यामुळे त्यांनी वायू देवाची समजूत काढून हनुमानाला अनेक शक्ती प्रदान केल्या. सूर्याने त्याला तेज,आरोग्य व शास्त्राचे ज्ञान दिले. वरुणाने अमरत्व, यमाने आरोग्य व अमरत्व, कुबेराने अजेयत्व व आपली गदा दिली. शंकराने सर्व शस्त्रांपासून अभय आणि समुद्र पार करण्याची शक्ती, विश्वकर्मा ने चिरंजीव पद, ब्रह्मदेवाने इच्छेला येईल या प्रमाणे शरीराचे रूप धारण करण्याचे वरदान दिले व महान गतीत्वही दिले. जलदेवतेने पाण्यापासून संरक्षण. या मिळालेल्या सर्व वरदानांमुळे हनुमान शक्ती संपन्न व बुद्धी संपन्न झाला. लहानपणी तो खूप खोडकर होता. ध्यानस्थ बसलेल्या ऋषीमुनींच्या तो खोड्या काढी त्यामुळे ऋषींनी त्याला शाप दिला– तुझ्या अंतरी फार मोठी शक्ती असल्या तरी या सर्वांचा तुला पूर्णपणे विसर पडेल.जेव्हा एखादी योग्य व्यक्ती तुझ्या आयुष्यात येईल व तुला त्याचे स्मरण करून देईल त्याच वेळी पुन्हा तुझ्या अंगात पुर्वीच्या शक्ती जागृत होतील. हनुमानाला **सुवर्णकौपिन** जन्मापासूनच प्राप्त झाले होते ते ब्रह्मचर्याचे प्रतीक आहे.

रामायणात हनुमानाचे आगमन किष्किंधा कांडात होते. सुग्रीवाच्या मंत्रिगणांपैकीच तो एक होता. त्याच वेळी त्याची रामाची भेट होते. रामायणातील अनेक प्रसंगातून त्याचे विविध गुण दिसून येतात. तो अत्यंत बुद्धिमान व मुत्सद्दी होता. क्रोधित लक्ष्मण सुग्रीवाला भेटायला आला असता राणी ताराची भेट घडवून दाखवलेली समयसूचकता! लंकेच्या दरबारात रावणाला त्याच्या चुकांची जाणीव करून देताना त्याच्या अंगी असलेले गुण, निर्भीड व्यक्तिमत्त्व व वक्तृत्व! परतल्यावर रामास लंकेचे तंतोतंत वर्णन सांगताना दिसून आलेली त्याची निरीक्षण शक्ती व स्मरणशक्ती! स्वतःला बद्ध करून घेताना दाखवलेला मुत्सद्दीपणा! लंका नगरी विध्वंस करताना दाखवलेला पराक्रम!

हनुमानाला उत्तम प्रतिभाशक्ती लाभलेली होती. त्याला उत्तम गायन कलाही अवगत होती. या क्षेत्रात त्याने ग्रंथांची निर्मिती केली आहे. यात **अंजनेय भारतम् अंजनंद संहिता हनुमत् संहिता संगीत पारिजात** या ग्रंथांचा समावेश होतो. संगीताने त्याने आपल्या दैवताला, रामाला वश करून घेतले होते. हनुमान वेगवेगळे ताल व त्याचे उच्चार यातही नि तो निपुण होता. तो नृत्यातही तरबेज होता. कर्दळीच्या पानावर त्याने पूर्ण रामायण लिहिले होते. या सर्व गुणांनी संपन्न असला तरी **दासमारुती** हे त्याचे मूळ स्वरूप! ज्या शक्तिमान हातांनी तो मुष्टी प्रहार करतो तेच हात रामा पुढे सदैव जोडलेले असतात. भक्ती आणि शक्ती यांचे प्रतिक म्हणजे हनुमान!

चैत्र शुद्ध पौर्णिमेला आपण सूर्योदयानंतर लागलीच मारुती जन्म साजरा करतो.

**लेखांकन : उल्का खळदकर**

**संपर्क : ९४२२९८७५६४**



# ।। सावरकरी विचाररत्ने ।।



अफझलखान नावाच्या एका मुस्लीम सेनानीचे मस्तक कापून 'बत्तीस दाताच्या बोकडाचे मुंडके' नैवेद्य म्हणून तुळजापुरच्या भवानीच्या मूर्तीस शिवाजी महाराजांनी अर्पिले

.....हिंदूंच्या भक्तीविषयी योग्य ते दुषणही देणे जरी अपरिहार्य असले तरीही ज्यांना त्या दूषणासाठी उपहास करावासा वाटतो. त्यांना हेही तेथेच बजावून सांगावयास पाहिजे की, आपल्या देवतेच्या जाज्वल्यतेविषयी आणि सामर्थ्याविषयी हिंदूंची जी श्रद्धा होती ती फार, फारतर भाबडी होती इतकेच काय ते म्हणता येईल.

पण दुसऱ्याच्या धर्मावर अत्याचारी शस्त्रबळाने आक्रमण करून निरागस स्त्री–पुरुष, बाल–वृद्धांना, माझ्या देवाची – अल्लाहची भक्ती करतोस, मुसलमान होतोस, की ठार मारू ? अशी प्रत्येकी धमकी देऊन जो जो मुसलमान होण्यास नकार देई, त्याचा त्याचा शिरच्छेद करीत पिसाळल्याप्रमाणे धावणाऱ्या मुसलामानांच्या अधर्मभक्तीसारखी, ती हिंदूंची त्यांच्या देवावरील भक्ती, राक्षसी, धर्मांध, रक्तपिपासू आणि आपल्या देवालाच दैत्य बनवणारी तर नव्हतीच नव्हती ! पण तसे ठणकाऊन सांगण्याचे धैर्य मात्र, केवळ हिंदूंच्याच भक्तीचा तेवढा उपहास करणाऱ्या उथळ नि भित्र्या लेखकांना झाले नाही ! (नि होत नाही !)

पुन्हा सोमनाथादि हिंदूंच्या मूर्तींचा नि देवालयांचा जेव्हा जेव्हा महंमदासारख्या मुस्लिम सेनानींनी विध्वंस केला तेव्हा तेव्हा ज्या मुसलमान तवारिखकारांनी नि मुल्ला मौलवींनी वल्गना केल्या आहेत की, पहा ! ह्या तुमच्या मूर्ती आम्ही फोडल्या, पण तुमच्या देवाची आमचा हात धरण्याची छाती झाली नाही ! म्हणून तुमचा देव खोटा ! आम्हा मूर्तिभंजक मुसलमानांचा देव, 'अल्लाह' हाच काय तो खरा !

पण ह्या वल्गनांचीच कसोटी खरी मानायची तर मुस्लिम धर्म न मानणाऱ्या नि अल्लाहला धिक्कारणाऱ्या चेंगीझखानाने नी त्याच्या उत्तराधिकारी पुरुषांनी जेव्हा प्रत्यक्ष खलिफाच्या राजधानीत घुसून, ती उद्ध्वस्त करून, त्याला ठार मारून, ज्याला 'अल्लाहचे घर' म्हणून मुसलमान समजतात, त्या त्यांच्या कित्येक मशिदींना जाळून टाकले, बायबलांची राख केली, इतरांना आपल्या घोडशाळा बनवून सोडले आणि कुराण ग्रंथांना तर घोड्याच्या पायाखाली तुडविले तेव्हा अल्लाहसुद्धा त्या चेंगीझखानाचा हात धरू शकला नाही ! अशा शेकडो प्रसंगावरून आपला अल्लाह सुद्धा दुबळा नि खोटा आहे, असे मानावयास त्या वल्गना करणारे ते मुसलमान सिद्ध आहेत काय ?

इतके लांब तरी कशाला जा ! सोमनाथसारख्या अनेक हिंदू देवतांच्या मूर्ती मुसलमानांनी फोडल्या आणि ते विजयी झाले म्हणून जर मूर्तिपूजक बुत परस्त धर्म खोटा नि मूर्तिभंजक बुत शिकन धर्म खरा, असे मानावयाचे तर बुत'शिकन असणाऱ्या अफ़झलखान नावाच्या एका मुस्लिम सेनानीचे मस्तक कापून ते तुळजापुरच्या भवानीच्या मूर्तीस 'बत्तीस दाताच्या बोकडाचे मुंडके' नैवेद्य म्हणून जेव्हा शिवाजीने अर्पिले तेव्हा त्याचाही हात अल्लाह धरू शकला नाही ! अशा अनेक प्रसंगांच्या आधारे मूर्तिपूजक धर्मच खरा असेही का म्हणू नये ?

– स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर


समग्र सावरकर वाङमय – खंड–३, २००१,

इतिहास (भाग–१), सहा सोनेरी पाने, पान–२९४

**संकलन – श्री.प्रविण दत्तात्रय जाधव,**

**कासारवाडी, पुणे.**

**भाषाट् – ९८५०१४४४८९.**


|| ॐ ||
ॐ
विश्व हिंदू परिषद
पश्चिम महाराष्ट्र प्रांत
भीम रूप धरि असुर संहारे।
रामचंद्र के काज संवारे।।
भक्तीशक्ती
११ मारुती परीक्रमा
-: दिनांक :-
०८,०९,१० एप्रिल २०२२
५०० दुचाकी वाहनांसोबत
तरूणांची
भक्तीशक्ती ११ मारुती परीक्रमा
सहभागी होण्यासाठी आजच नाव नोंदवा
आपल्या भागातील विश्वहिंदू परिषद
पदाधिकारी, कार्यकर्ते
यांच्याशी आजच संपर्क करा.
देव मस्तकी धरावा । अवघा हलकल्लोळ करावा ।
मुलुख बडवावा की बुडवावा । धर्मसंस्थापनेसाठी ।।

# भक्तीशक्ती ११ मारुती परिक्रमा

नुकत्याच झालेल्या शिवजयंती' उत्सवातून मिळालेली प्रेरणा घेऊन सारा महाराष्ट्र चैतन्यमय आहे. महाशिवरात्रीचा भक्तिमय सोहळा या ऊर्जेत सात्विकतेची जोड देत आहे . अशा भारलेल्या काळात आपल्या पश्चिम महाराष्ट्रातील तरूणाई एका पुरूषार्थी, आव्हानात्मक आणि श्रद्धापूर्ण अभियानाचे नियोजन करीत आहे.

महाराष्ट्र हे महान राष्ट्र! कारण इथल्या कणाकणातली राष्ट्रभक्ती. देव, देश आणि धर्मासाठी प्राण घेतले हाती ही भावना भूतकाळापासून महाराष्ट्राने अनुभवली आहे . एक प्रेरक शक्तीच्या हाकेला ओ' देऊन संघर्ष करणारे शिवराय आणि शिवबाचे मावळे हा असाच एक अविष्कार! ही शिवशक्ती' निमीण करण्यात मोठे योगदान समर्थ रामदासांचे. शक्तीला अधिष्ठान हवे ते धर्मांचे, भगवंतांचे! हे या राष्ट्रसंताने ओळखले होते. मग राममय झालेल्या रामदासांनी उपास्य दैवत ठरवले ते मारूतीराय तरुणांना शक्तीची उपासना करण्याचा मंत्र देण्यासाठी हनुमानाचे चरित्र उपयुक्त ठरेल म्हणून समर्थांनी ११ मारुतीची स्थापना केली. महा राष्ट्राच्या वेगवेळ्या भागात ही १० मंदिरे नव्हे शक्तिस्थाने निर्माण झाली. वीर, ब्रतधारी, बुद्धिमान, चारित्र्यसंपन्न, धर्मपरायण अशा असंख्य सद्गुणांनी युक्त अशा बजरंग बलीचा आदर्श घेऊन सारी तरूणांनी एकवटली. छत्रपति शिवरायांच्या नेतृत्वात रणसंग्रामात यशस्वी झाली. या वीर बजरंगी मराठमोळ्या तरूणांनी स्वराज्य स्थापले. आनंदवनभुवन निर्माण केले. ९५ मारुती स्थापन करण्याचा हेतू सफल झाला.

'वीर हनुमान' हे एक वेगळेच रसायन आहे जन्मतःच सूर्यावर झेप घेणारा आणि परम शक्तिशाली बनून सारी रावणाची लंका उध्वस्त करणारा हा महाबली, रामभक्तीत रंगून गेला. रामाचे आज्ञापालन हा वीर हनुमानाचा धर्म बनला. मग त्यासाठी काय वाट्टेल ते करणे अगदी द्रोणागिरी उचलून आणणे हे ही माऊतीरायाचे आवडते कर्म बनले. तन–मनात राम, जीवनात राम आणि जनाजनात राम असेच मारुतीरायाचे जीवन आहे. अपार शक्ती असणारा हा महापराक्रमी वीर दास बनून धन्य झाला. अशा मारूती रायाचे जीवन आजही आपल्याला प्रेरणा देत आहे. 'रावण' स्वभावाच्या अनेक शक्ती देशद्रोही, धर्मद्रोही, समाजद्रोही बनून तांडव करीत आहेत. अयोध्येत आता प्रभू श्रीरामचंद्रांचे मंदिर साकारले जात आहे. जणू या मंदिराच्या ख्याने पुन्हा एकदा रामराय समाजातील रावण प्रवृत्तीचा नाश करण्यासाठी अवतरले आहेत. समर्थानी स्थापलेले ११ मारुती हे शक्तीस्थान बनून या कार्यात सहभागी होण्यासाठी तरुणांना साकडे घालत आहेत. पुन्हा एकदा राष्ट्र धर्म जागृती करून आव्हानांना तोंड देण्यासाठी सज्ञ व्हावे लागणार आहे. पश्चिम महाराष्ट्रातील तरुणाईने पुन्हा एकदा वीर व्रताचे पालन करण्याचा निश्चय केला आहे. ११ मारुती मंदिरांचे दर्शन कख्न वीर बजरंगाचा आर्शिवाद घेऊन पुन्हा एकदा समाजात आणि मनामनात राष्ट्रधर्म जागा करण्यासाठी हे अभियान योजले आहे.

आपल्या महाराष्ट्रतून ७५० दुचाकी वाहनांवर स्वार होऊन सुमारे १५०० वीर ११ मारुतीच्या दर्शनासाठी निघणार आहेत. ८, ९, १० एप्रिल या तीन दिवसात ११ मारूती यात्रेच्या निमित्ताने सारा आसमंत समाजभक्ती, धर्मभक्ती, आणि राष्ट्भक्तीने दुमदुमून जाणार आहे. अनेक मान्यवर या यात्रेत सहभागी होणार आहेत. गावागावात स्वागत व्याख्याने, राम–हनुमानाचा जयजयकार आणि तरुणाचे संघटन असा या यात्रेचा उपक्रम असणार आहे. आपण स्वतःच्या मनात 'राम–स्मरण' करत असतोच. रामराज्य यावे आंनदवन भुवन निर्माण व्हावे, साऱ्या समस्या मिटून सारेजण सुखी समाधानी व्हावेत असे आपल्याला वाटतेच. आपली हीच इच्छा पूर्ण करण्याचा एक प्रयत्न म्हणजे ही ११ मारुती यात्रा आहे. या यात्रेतून मिळणारी प्रेरणा, निर्माण होणारी ऊर्जा आणि 'भक्ती–शक्तीचा' साकारणारा आविष्कार भविष्यातील साऱ्या प्रश्नांवर मार्ग काढणारा ठरणार आहे.

**आवाहन: सदर उपक्र मास मोठ्या प्रमाणात मनुष्य–बळ आणि आर्थिक बळ लागणार आहे.आपण तन–मन आणि धनाने यात सहभागी व्हावे ही विनंती.**


| धनंजय चंद्रात्रे | श्री अशोक येलमार | श्री विजय पाटील |
|---|---|---|
| संपर्क : ९१ ९९२३१ ७३७५३ | संपर्क : ९१ ९८२२० ५१०१५ | संपर्क : ९१ ९०११४ २४२२२ |



# श्रीमद् दासबोध परिचय (भाग बारावा)

मागील भागात आपण दासबोधाच्या दहाव्या दशकाची माहिती घेतली. आता अकरावा दशक पाहू.

या दशकाचे नांव आहे– 'भीमदशक'. साऱ्या जगताचा कारभारी असणाऱ्या वायूला 'भीम' असे म्हणतात. समर्थांनी या दशकाचे नाव 'भीम दशक' ठेवले आहे. दहा दशक म्हणजे निम्मा दासबोध पूर्ण होऊन आता हा अकरावा दशक म्हणजे उत्तरार्ध सुरु होत आहे, असे प.पू. बेलसरे यांनी म्हटले आहे. भीम हे रुद्राचेही नांव आहे. मारुतीराय हे महान रुद्राचे अवतार आहेत. महंताने त्या मारुतीरायासारखे असावे म्हणून महंताने करावयाच्या कार्यासंबंधीच्या या दशकाला समर्थांनी 'भीम दशक' असे नांव दिले आहे. महंत अति कर्मरत असावा, पण अहंकार रहित झालेला असावा. वृत्ती स्वस्वरुपी लीन असणारा तसेंच निःस्वार्थी प्रेम करणारा महंत सर्व काही करुन कशातच अडकत नाही. महंत आत्मज्ञानी हवा, पण किमान तो साधक मात्र असला पाहिजे. अशा महंताला या दशकात मार्गदर्शन केले आहे. आपण सगळेही समर्थांचे महंत बनण्याचा प्रयत्न करु या. त्यासाठी हा दशक अभ्यासणे आवश्यक आहे.

या दशकातील 'सिद्धांतनिरूपण' असा पहिला समास आहे. या समासात आपली ब्रह्माकार वृत्ति तशीच ठेवून लोकसंग्रहाचा व्यवहार कसा उत्तम करावा याचे मार्गदर्शन आहे. आत्मज्ञान झाल्यावर सर्व भूतांच्या ठायी एकच एक आत्मस्वरुप अनुभवाला येते. अभेदबुद्धि निर्माण झाल्याने सर्व प्राणीमात्रांत ब्रह्मदर्शन घडते. देहबुद्धीची माणसे स्वतःच्या देहाच्या नित्य क्रिया जितक्या अंतःप्रेरणेने आणि सहज करतात तितक्याच अंतःप्रेरणेने आणि सहजतेने आत्मबुद्धिची माणसे जगातील प्राणीमात्रांशी व्यवहार करतात. अंतःप्रेरणा ही प्रत्यक्ष ब्रह्माचीच शक्ति आहे. वासना व अहंकाराचा क्षय झाला व बुद्धी संपूर्ण निर्मम झाली की ब्रह्माकार वृत्ति स्थिर होते. अद्वैतभाव जागृत होतो. असा साधक अप्रतिम लोकसंग्रह करतो. यालाच सहजसमाधी म्हणतात.

दुसरा 'चत्वारदेवनिरूपण' समास आहे. शाश्वत आणि अशाश्वत अशा दोनच वस्तू या विश्वात आहेत. अशाश्वत ते सारे मायामय असल्यामुळे ते विलयास जाणारच आहे. नाना प्रकारचे प्राणी निर्माण झाल्यावर माणूस निर्माण झाला. माणसाने आपल्या कल्पनेप्रमाणे देव निर्माण केले. त्यामुळे नाना देव तयार झाले. यामुळे खोट्या देवदेवतांचे प्रस्थ माजले. खरा देव कोणता ते ओळखणे अवघड झाले. प्रतिमा, अवतार, अंतरात्मा व परमात्मा असे चार प्रकारचे देव आहेत. त्यापैकी शेवटचा परमात्मा हाच खरा देव होय. त्या देवाचा अनुभव घेणारा तो महानुभाव होय.

तिसरा 'शिकवण निरूपण' समास आहे. प्रपंच आणि परमार्थ अशी मानवी जीवनाची दोन अंगे आहेत. माणसाने या दोन्ही अंगांची समतोल वाढ केली पाहिजे. त्यासाठी जीवनात शिस्त असावी लागते. आळस टाकून, नियम पाळून शिस्त लावावी लागते. या समासात समर्थांनी यासाठी एक आदर्श दिनचर्या सांगितली आहे. माणसाने मनन, चिंतन करुन विचारांची वाढ करावी. इतरांसाठी आपले शरीर झिजवावे. तसेंचे भगवंतावर भरंवसा ठेवून जगात वागावे. असे वागले तर जीवन सर्वांगानी परिपूर्ण बनते.

चवथा 'सारविवेकनिरूपण' समास आहे. या समासात ज्ञान म्हणजे काय ते सविस्तर सांगितले आहे. कोणत्याही वस्तूची खरी किमत कळणे म्हणजे ज्ञान. जे जे दिसते ते टिकणारे नाही व अशाश्वत आहे, असा प्रत्यक्ष अनुभव येतो तरीही देहबुद्धिच्या सवयीने ते खरे वाटते. सार काय व असार काय याचा विवेक करावा व जे सार आहे त्याचाच स्वीकार करावा. असा विवेक करता करता पिंडाचे चार (सूक्ष्म, स्थूल, कारण व महाकारण) व ब्रह्मांडाचे चार (विराट, हिरण्यगर्भ, अव्याकृत, मूळमाया) अशा आठही देहांचा निरास करता येतो. असा निरास झाल्यानंतर येणाऱ्या शून्याच्याही पलीकडे निर्विकार ब्रह्म आहे असे अनुभवास येते. तिथपर्यंत पोचणे ही अखेरची अवस्था समजावी.

पाचवा 'राजकारण निरूपण' समास आहे. आपल्या देशात धर्माला व अध्यात्माला विशेष मान असल्यामुळे सामाजिक कार्य करुन लोकसंग्रह करणाऱ्या माणसाचा साधूसंत, धर्मसंस्था,

राज्यसंस्था आणि अर्थसंस्था यांच्याशी अधिक संबंध येतो. अशा माणसांनी कसे वागावे याला समर्थ 'राजकारण' म्हणतात. लोकसंग्रह करण्यास, समाजाचे पुढारीपण गाजविण्यास लागणारे व्यवहारचातुर्य म्हणजे राजकारण होय. समर्थानी या समासात अशा व्यवहारचातुर्याच्या अनेक गोष्टी सविस्तर व स्पष्टपणे सांगितल्या आहेत.

सहावा 'महंत लक्षण' समास आहे. संपूर्ण दासबोधातला अगदी छोटा, फक्त १९ ओव्यांचा हा समास आहे. परंतू तरीही अत्यंत महत्वाचा व खूप काही शिकवण देणारा आहे. प्रत्येक पुढाऱ्याचे लोकसंग्रह करण्याचे तंत्र वेगळे असते. समर्थांचा महंत हाही पुढारी आहे, पण तो अध्यात्मिक क्षेत्रातील पुढारी आहे. त्याचा आदर्श प्रभूश्रीरामचंद्र आहेत. महंताचे जीवन सर्व बाजूंनी विकसित झाले पाहिजे. यासाठी महंताचे बोलणे, चालणे, लेखन, वाचन कसे असावे हे समर्थ यात सांगतात. निःस्वार्थी प्रेमाने भरलेला महंत लोकांना मोठा आधार वाटतो. महंताने न्याय करावा व लोकांचे प्रेम संपादन करावे. त्याने लोकांना भक्तीमार्गाला लावावे.

सातवा 'चंचळ नदी' समास आहे. या समासात समर्थांनी मूळमायेवर एक छानसे रुपक रचिले आहे. चंचळ व वासनामय माया वाहत्या नदीसारखी आहे. ती परब्रह्माची एक शक्ती आहे. माया जगातल्या प्रत्येक जीवमात्रांत कार्य करते. तिच्यात विलक्षण सामर्थ्य आहे. मूळमाया ही सूक्ष्माकडून स्थूलाकडे, अतिंद्रिय ब्रह्मापासून दृश्य विश्वाकडे वाहणारी नदी आहे. नदी वाहू लागली की तिच्यात दगड गोटे व जमीन माती वाहत जाते. बरेचसे जीव या मायानदीत वाहत जातात व नाश पावतात. काही बलवान जीव मात्र प्रवाहाच्या उलट पोहत जाऊन उगमापाशी पोचतात. माया सूक्ष्माकडून स्थूलाकडे जात असते तर ब्रह्मदर्शनासाठी स्थूलाकडून सूक्ष्माकडे म्हणजे उलटा प्रवास करावा लागतो. मूळमाया ही चंचळ नदी स्वर्ग, मृत्यू व पाताळ या तीनही लोकांत पसरली असून ती सतत वाहते आहे. बरेच लोक तिलाच ईश्वरस्वरुप समजतात. ज्या गुणाशी अथवा अवगुणाशी तिचा संबंध येतो तिथे ती तो गुण अथवा अवगुण धारण करते.

आठवा 'अंतरात्माविवरण' समास आहे. परमात्मवस्तूचा विचार कसा करावा व त्यातून अंतरात्मा कसा ओळखावा हे या समासात सांगितले आहे. यासाठी समर्थ तीन पायऱ्या सांगतात.

१. आपल्या देहात वास करणारा आत्मा.


२. साऱ्या विश्वात व चराचरांत अंतर्यामीपणाने वास करणारा अंतरात्मा

३. विश्वाला पुरून उरणारा परमात्मा. या तीनही ठिकाणी असलेले स्वरुप एकच असून त्यांचे व्यापकत्व फक्त कमी जास्त आहे. सर्वाठायी असलेला अंतरात्मा ओळखला की माणूस विश्वव्यापी बनतो. माणूस अपूर्ण आहे तर अंतरात्मा पूर्ण आहे. दृश्य विश्वाचे विवरण केले की तत्वाचा निरास होऊन देहबुद्धि झडते. अशा अवस्थेत अंतरात्म्याचे अखंड चिंतन करावे. त्याने त्याच्याशी तादात्म्य होऊन विभक्तपणा जातो व भक्तपणा येतो. जीवन धन्य होते.

नववा 'उपदेश निरूपण' समास आहे. जन्म घेताच माणूस या कर्मभूमीत येतो. इथे कर्म करणे चुकत नाही. मग जर कर्म करावेच लागत असेल तर ते मनापासून करावे. कर्मात जिथे अडचण येईल तिथे भगवंताचे स्मरण करावे. भगवंत देहात आत्मा आहे तर जगात जगतात्मा आहे. म्हणून प्रतिमेची पूजा केली तरी ती परमात्म्यास पावते. जगात वावरणारी जाणीवच आपल्या अंत:करणात आहे. परंतू देहबुद्धिमुळे आपण देहाचा अभिमान धरतो आणि त्या परमात्म्यापासून वेगळेपणाने वागतो. अंतरात्मा मायेच्या कक्षेत आहे. परंतू त्याच्यापलीकडे असलेल्या परब्रह्मापर्यंत जाण्यासाठी सतत चिंतन करुन 'मी' नाहीसा करावा. वृत्तीची निर्वृत्ती करुन निर्विकार परब्रह्म अनुभवावे.

दहावा 'निस्पृह वर्तणूक' समास आहे. व्यक्ती, व्यक्तींचा समाज व त्या समाजाची संस्कृती अशी मानवी जीवनाची तीन अंगे आहेत. व्यक्ती स्वार्थी असते. त्याला निस्वार्थीपणा शिकवण्याचे काम संस्कृती करते. हा निस्वार्थीपणा प्रत्यक्षात उतरवण्याचे कार्य समाज करतो. निस्वार्थी लोकांमुळेच समाजाची पातळी उंचावते. समर्थ स्वत: अत्यंत निस्वार्थी होते. महंत हा आत्मसाक्षात्कारी तर असावाच पण अनासक्त असला पाहिजे असे समर्थ सांगतात. महंताने लोकसंग्रह करावा व त्यांनाभक्तीमार्ग शिकवण्यासाठी कथाकीर्तन करावे. कष्टावाचून कोणतेही कार्य साधत नाही. म्हणून महंताने योग्य व्यक्तींना योग्य कामाला लावावे. हे सर्व करीत असताना निस्वार्थीपणा अर्थात निःस्पृहता ठेवावी. आणि महंताने आपल्यासारखे महंत तयार करावे. पुढील लेखात आपण 'विवेकवैराग्य' हा बारावा दशक पाहू.

**सुहास वसंत कुलकर्णी.**
**डी २/६२३, म्हाडा मोरवाडी, पिंपरी, पुणे ४११०१८**
**मो. ७२७६०९८९२७**



# ज्ञानेश्वरीतील योग चिंतन
## भक्ति योग

संत विनोबांनी बाराव्या अध्यायाचे मोठे सुंदर वर्णन केले आहे. गंगेचा ओघ सर्वत्र पावन आणि पवित्र आहे. परंतु हरिद्वार, काशी, प्रयाग ही तीर्थक्षेत्र अधिक पावन आहेत. तशी स्थिती भगवद्गीतेची आहे. गीता आरंभापासून शेवटपर्यंत पवित्र आहे. परंतु काही अध्येशद्तीर्थक्षेत्र झाली आहेत. बारावा अध्याय तसाच आहे. बाराव्या अध्यायात भक्तियोग सांगितला आहे. वास्तविक नवव्या अध्यायात राजविद्याराजगुह्ययोग सांगितला आहे. तरी बारावा अध्याय भक्तियोग सांगितला आहे. कारण सामान्य माणसालाही भगवंत प्राप्त होईल असा मार्ग यात सांगितला आहे. अर्जुनाला विश्वरुप दर्शन झाले. परंतु सामान्य, प्रापंचिक माणसाला तो कसा भेटेल ? देव म्हणतात, मी दोनावर दोन हात ठेवून, कटीवर हात ठेवून मी तुझी वाट पाहत आहे. तू प्रेमाने बघ, आवडेल त्या मार्गाने माझ्याकडे ये, तु चार पावले पुढे आलास की मी दहा पावले पुढे येईन. 'भिऊ नकोस मी तुझ्या पाठीशी आहे. फक्त माझे स्मरण कर ! बाराव्या अध्यायाला प्रारंभ करताना माऊलींनी केलेले गुरुचे वर्णन भावोत्कट आहे.

**जय जय वो शुद्धे । उदार प्रसिद्धे ।**
**अनवरत आनंदे । वर्षतये ।। ।।– ज्ञानेश्वरी**

काही ओव्या तर सिद्ध मंत्र आहेत, सर्प दश झाल्यावर विष उतरवण्यासाठी एक ओवी म्हणतात.

**विषयव्याळे मिठी । दिधळलिया नुठी ताटी ।**
**ते तुझीये गुरुकृपादृष्टि । निर्विष होय ।।**– ज्ञानेश्वरी

भक्ती मार्गातील लोकाना हा अध्याय अत्यंत जवळचा वाटतो. अर्जुनाने देवाला प्रश्न विचारला आहे. काही सगुण भक्ती करतात तर काही निर्गुणाची उपासना करतात. देवा तुला कोणता भक्त प्रिय आहे ? अर्जुनाचा प्रश्न ऐकून देवाला आश्चर्य वाटले. आईला दोन मुले असावीत आणि तिला विचारावे तुझे आवडते मुल कोणते ? नेमके तसेच झाले. ज्ञान मार्गाने जाणारे ज्ञानी भक्त हे योगी असतात. तर कर्ममार्गाने जाणारे ते भगवंताशी एकरुप होतात. ज्ञानीभक्त, देव आणि भक्त यात द्वैत ठेवत नाहीत. पण भगवंताशी एकरुप होऊन सुख भोगतात. तर काही वेगळे राहून सुख भोगतात. काही सगुणाचे तर काही निर्गुणाचे उपासक असतात, दोन्ही प्रकारच्या भक्ती मार्गाने गेले तरी एकाच ठिकाणी पोहचणार. सर्व भक्तांना मी सांभाळतो. ज्ञानी भक्त इंद्रियांचे दमन करुन माझ्यापर्यंत येतात. तर दुसरे भक्त इंद्रियासहित माझ्या पर्यंत येतात. कायिक, वाचिक आणि मानसिक माझ्या ठिकाणी ठेवून सर्व कर्मे मला अर्पण करतात. मग त्यांच्या संसाराची चिंता माझ्यावर असते. त्यांची कामे मी करतो. रोहिदासाची चर्म रंगवितो. सावताबरोबर खुरपू लागतो. जनाबाईला दळू–काडू लागतो. कबीराचे शेले विणतो. सोयराबाईचे बाळंतपण करतो. असे भक्त संसार सागरातून सहज तरुन जातात.

म्हणून अर्जुना तू एक गोष्ट लक्षात ठेव, मी सर्व करतो ते भगवंतासाठीच ! सर्व कर्मे मला अर्पण कर. असे केले तर कर्म ही भक्ती होते. जे कर्म करशील त्याचे फळ तेथेच टाकून दे. वक्ष जसे फळ टाकून मोकळा होतो. नंतर भगवंताने भक्ताची लक्षणे सांगितली आहेत. अभ्यासापेक्षा ज्ञान गहन आहे. ज्ञानाहून ध्यान व ध्यानापेक्षा त्याग व त्यापेक्षा शांती सुख मोठे आहे. शांती विण कसे सुख. . आपण प्रार्थना म्हटल्यावर शांती, शांती, शांती असे तीन वेळा म्हणतो कारण शांती कायिक, वाचिक व मानसिक मिळावी. अर्जुना, भक्ताच्या ठिकाणी समभाव असतो.

**गायीची तृषा हरु । व्याप्रा विष होऊनी**
**मारु । तैसे नेणेचि गा करु । तोय जैसे ।।** – ज्ञानेश्वरी

असा भक्त कुणाचा द्वेष करीत नाही. आपणच विश्वात भरुन राहातो. हे विश्वाची माझे घर' ही वृत्ती त्याची होते. पृथ्वी क्षमाशील असते. तशी त्याची धारणा असते. दिवा घरच्यांना प्रकाश देतो तसा दारच्यांना सुद्धा प्रकाश देतो. झाड लावणाऱ्याला सावली देते तशी तोडणाऱ्यालाही सावली देते. संत तुकाराम महाराज म्हणतात,

**’चंदनाचे हात । पायही चंदन ।**
**परिसा नाही हिन । कोणी अंग ।**
**दिपा नाही पाटी पोटी अंधकार ।**
**सर्वांगी साखर अवघी गोड ।**
**तुका म्हणे तैसा सज्जना पासून ।**
**पाहता अवगुण मिळेचिना ।** – संत तुकाराम

त्याचे मन आणि बुद्धी सर्वकाळ माझ्या ठायी असते. तो माझा लाडका भक्त असतो. तोच योग आणि तोच मुक्त असतो. फार काय, तो माझी वल्लभा आणि मी त्याचा कात ! एव्हढे माझे प्रेम ! येथे राधा–कृष्णाची मधुरा भक्ती आठवते. त्याचे आणखी एक लक्षण म्हणजे त्याच्यापासून कुणाला त्रास नाही. तो स्थितप्रज्ञ असतो. भक्तांचे वर्णन करता करता देव डोलू लागले कारण वक्ता भगवंत आणि श्रोता अर्जुन ! भगवंताला राहवत नाही ते पुन्हा म्हणतात. माझा भक्त निरपेक्ष, सदा आनंदी असतो. माझे भक्त गंगेप्रमाणे पवित्र असतात. गंगेत स्नान केल्याने पापक्षालन होते. तसे माझ्या भक्तांच्या संगतीत राहिलेले उद्धरुन जातात.

आपणा सारिखे करिती तात्काळ माझा भक्त आंतर–बाह्य निर्मळ असतो. तो कलंक विरहित चंद्र, तापहिन सूर्य असतो. मी ब्रह्म आहे या भावनेने तो जीवन जगत असतो. माऊलींच्या प्रतिभेला बहर आला आहे. अर्जुना अशा भक्ताला मुकुट म्हणून मी मस्तकावर धारण करतो इतकेच नव्हे तर मी त्या भक्तापुढे नतमस्तक होतो. शंकर माझा उत्तम भक्त आहे. माझ्या चरणापासून निघालेली गंगा मस्तकावर धारण केली आहे. मोक्ष हा चौथा पुरुषार्थ, भक्ती मार्गाने भक्ताला तो प्राप्त होतो. अर्जुनाला त्याच्या प्रश्नाचे उत्तर मिळाले. सगुण भक्तीची वाट निर्गुणापर्यंत पोहचते. सगुण–निर्गुण हा भेद संपून जातो. असे भक्त भगवंताचे तिर्थक्षेत्र होतात व त्याची महती गाणारे भगवंताचे लाडके होतात. आपणही भगवंताचे लाडके होऊ या !

।।।। शुभभवतु ।।

**क्रमश:**

**ह.भ.प. किसन महाराज चौधरी**
**मोबा. ९७६६८३३७७४**

**विश्व हिंदू परिषद व हिंदुबोधच्या कार्यास हार्दिक शुभेच्छा**
**चैतन्य बारसोडे, चिंचवड**



**हिंदूबोधला मन:पूर्वक शुभेच्छा!**





**संपर्क**
**८/४, पूर्णानगर, आरटीओ ऑफिसचे**
**मागे चिखली रोड, चिंचवड,**
www.eknathpawar.in /
erpeknath@yahoo.co.in

**एकनाथ पवार**
**सत्तारूढ पक्षनेता पिं.चि.**
**संचालक : स्मार्ट सिटी पिंपरी–चिंचवड**

**कार्यालय**
**सुवर्णयुग सोसायटी शॉप नं. ५,**
**कृष्णानगर, चिंचवड पुणे,**
**मो. : ९९२२०२०७७७**
eknath.bjp@gmail.com

**विश्व हिंदू परिषद व हिंदुबोधच्या कार्यास हार्दिक शुभेच्छा**
**श्री अनिल पांडुरंगजी आढी**



# भारतातील मुस्लीम दंगलींचा भस्मासूर

(संदर्भ : CWBA : Compiled by Vasant Moom, DR. BABASAHEB AMBEDKAR WRITINGS AND SPEECHES, Vol. 8, Govt. of Maharashtra, 2014 )

- **प्रमुख हिंदूंच्या हत्या**

खिलाफत चळवळीतून धर्मांध मुस्लिमांनी प्रचंड ऊर्जा मिळविली होती. अर्थात ही ऊर्जा जिहादचीच होती. ही अत्यंत खतरनाक वस्तुस्थिती आहे की, शुद्धी चळवळीत भाग घेतल्यामुळे किंवा लिखाण करून मुसलमानांच्या संवेदनक्षम धार्मिक भावना दुखावण्याचा अपराध (!) केला, अशा असंख्य प्रमुख हिंदूंची काही माथेफिरू मुसलमानांनी हत्या केली. माथेफिरूच्या हल्ल्यास सर्व प्रथम बळी पडले ते म्हणजे स्वामी श्रद्धानंद! २३ डिसेंबर १९२६ या दिवशी ते अंथरूणास खिळून असताना अब्दुल रशीदने त्यांची गोळ्या घालून हत्या केली. त्यानंतर ६ एप्रिल १९२९ या दिवशी इलामदीनने दिल्ली येथील आर्य समाजाचे प्रमुख लाला नानकचंद यांची हत्या केली. 'रंगीला रसूल' चे लेखक राजपाल आपल्या दुकानात बसले असता त्यांचा भोसकून खून केला. वास्तविक धार्मिक प्रक्षोभ निर्माण करण्याचे काम प्रथम मुस्लिमांनी केले होते. 'सीता का छिनाल' या मुस्लिमांनी लिहिलेल्या पुस्तकाची प्रतिक्रिया म्हणूण राजपाल यांनी 'रंगीला रसूल' हे पुस्तक लिहिले होते.

सप्टेंबर १९३४ मध्ये अब्दुल कयामने नत्थुरामल शर्माचा खून केला. सिंधच्या न्यायालयीन आयुक्तांच्या न्यायालयात स्वतः दाखल केलेल्या याचिकेच्या सुनावणीची प्रतीक्षा करीत असताना शर्मा यांचा खून करण्यात आला. हिंदू महासभेचे सचिव खन्ना यांच्यावर १९३८ साली अहमदाबाद येथील हिंदू महासभेच्या अधिवेशनानंतर प्राणघातक हल्ला केला होता. सुदैवाने ते मृत्यूच्या दाढेतून परत आले.

- **हिंदूंच्या खुन्यांकडे पाहण्याची म. गांधींची दृष्टी**

या हत्याकांडाचा प्रमुख मुसलमानांनी कधीही निषेध केला नाही. या उलट, या खुन्यांची 'धार्मिक हुतात्मा' म्हणून प्रशंसा केली व त्यांना दया दाखवावी या मागण्यासाठी आंदोलने करण्यात आली. अशा प्रवृत्तीचे उदाहरण हवे असल्यास, लाहोरचे बॅरिस्टर बरकत अली यांनी अब्दुल कयामच्या याचिकेवरील केलेला युक्तिवाद पहावा. बरकत अली म्हणाले की, नत्थुरामलच्या खुनाबद्दल कयाम हा दोषी नाही. कारण त्याने केलेली कृती कुराणाच्या कायद्यानुसार समर्थनीय आहे.

- **डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे भाष्य**

यावरील डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे भाष्य मोठे मननीय आहे. ते म्हणतात, मुसलमानांनी या निर्घृण खूनांचा निषेध केला नाही. इतकेच नव्हे तर, श्री. गांधींनीही या खूनसत्राचा निषेध करण्याचे आवाहन, प्रमुख मुसलमान नेत्यांना केले नाही. त्यांनी या प्रकरणी पूर्णपणे मौन पाळले. मुसलमानांच्या चुकांवर पांघरूण घालण्याच्या या प्रवृत्तीमुळे ऐक्याच्या हेतूला धोका निर्माण होऊ लागला.

- **मोपला शौर्याने लढले. श्री. गांधी**

१९२०-२१ दरम्यान मोपलांनी हिंदूंविरुद्ध केलेल्या जिहादाविषयी बोलताना श्री. गांधीजी म्हणाले, आपल्या धर्मासाठी, धर्माच्या पद्धतीने मोपला शौर्याने लढले. मला विश्वास वाटतो की, एक संस्था म्हणून हिंदूंनी मोपला मूर्खपणा शांतपणे स्वीकारला असेल व सुसंस्कृत मोपलांच्या कृत्याबद्दल प्रामाणिकपणे खेद होत असेल.

- **दंगलींचा इतिहास**

आता १९२६ पासून पुढे झालेल्या दंगलींचा इतिहास बघूयात. सन १९२६-२७ मध्ये जातीय दंगलींचा कालावधी चालूच होता. एप्रिल १९२६ नंतर प्रत्येक महिन्यात सार्वजनिक ठिकाणी कमी-जास्त प्रमाणात दोन्ही समाजातील कट्टर धर्माभिमान्यात चकमकी होत गेल्या. फक्त २ महिने दंगल या शब्दाच्या कायदेशीर अर्थाने दंगली झाल्या नव्हत्या. या असंख्य दंगलीच्या परिस्थितीचा अभ्यास केल्यानंतर असे दिसून आले की, अत्यंत किरकोळ व दोघांमधील क्षुद्र वादावादीतून उदा.

दंगली होण्याचे तातडीचे कारण म्हणजे, काही धार्मिक सण साजरे करणे, मुस्लिमांच्या मशिदीजवळून हिंदूंची सवाद्य मिरवणूक जाणे होय.

एप्रिल व मे १९२६ मध्ये कलकत्त्यात झालेल्या २ दंगली धरुन १ एप्रिल १९२७ ला संपणाया वर्षातील १२ महिन्यात दंगलीचे ४० प्रकार घडले. त्यात १९७ जण ठार व १,५९८ जण कमी जास्त प्रमाणात जखमी झाले. दंगलीचा सर्वाधिक फटका बंगालला बसला. परंतु अनेक प्रसंगी त्या वर्षात मुंबई इलाखा व सिंध प्रांतात हिंदू–मुस्लिम यांच्यातील संबंध तणावपूर्ण झालेले होते. कलकत्ता अशांत राहिला. १ जून १९२७ला किरकोळ बाचाबाचीतून दंगल उसळून ४० जण जखमी झाले. त्यानंतर १५ जुलै पर्यंत राजरोस दंगली चालू राहिल्या होत्या. १५ जुलै हा हिंदू धर्मातील महत्वाचा धार्मिक सणाचा दिवस होता. या सणादिवशी मशिदीजवळून सवाद्य मिरवणूक निघाल्याने दंगल होऊन १४ ठार व ११६ जण जखमी झाले. थोडी शांतता प्रस्थापित झाल्यावर १९ ते २२ जुलैला नव्याने दंगली उफाळल्या. २३, २४ व २५ तारखेला व्यक्तिगत हल्ले व भोसकाभोसकीच्या घटना घडल्या. या संपूर्ण दंगलीच्या काळात २८ जण ठार व २२६ जण जखमी झाले. १५ सप्टेंबर व १६ ऑक्टोबरला कलकत्ता येथे पुन्हा दंगली उसळल्या. १६ ऑक्टोबरला झालेल्या दंगलीचा वणवा शेजारच्या हावडा शहरात पसरला.

सन १९२७–२८ मध्ये एप्रिल १९२७ ते सप्टेंबर १९२७ या ६ महिन्याच्या काळात २५ दंगली झाल्या. त्यापैकी १० दंगली संयुक्त प्रांतात, ६ मुंबई इलाख्यात आणि पंजाब, मध्य प्रांत, बंगाल, बिहार व ओरिसात प्रत्येकी २ व दिल्लीत एका ठिकाणी दंगल झाली. या दंगलीत मृत्युमुखी पडलेल्यांची संख्या सुमारे १०३ झाली व १०८४ जण जखमी झाले.

या वर्षात सर्वात भीषण स्वरूपाची दंगल ४ व ७ मे १९२७ या दिवशी लाहोर येथे झाली. दंगल होण्यापूर्वी दोन्ही जमातीत कमालीचे तणावाचे वातावरण होते. आणि एक मुस्लिम व २ शीखांच्यात बाचाबाची झाल्याने दंगलीचा भडका उडाला. विजेच्या वेगाने दंगलीचा वणवा पसरला. त्यात मृतांची संख्या २७ झाली व २७२ जण जखमी झाले.

जूनच्या मध्यास बिहार व ओरिसात किरकोळ प्रकार घडले. परंतु जुलै महिन्यात किमान ८ दंगली झाल्या. त्यापैकी पंजाबमधील मुल्तान येथील दंगलीचे स्वरूप भीषण होते. ही घटना मोहरमच्या वार्षिक उत्सवाच्या वेळी घडली. या दंगलीत १३ जण ठार व २४ जण जखमी झाले. परंतु ऑगस्ट महिन्यात यापेक्षाही दंगलीचे भीषण दृश्य पहावयास मिळाले. त्या महिन्यात दंगलीचे एकूण ९ प्रकार घडले.

बिहारमधील बेतिया गावात व ओरियामध्ये धार्मिक मिरवणुकीतून निर्माण झालेल्या वादातून दंगलीची ठिणगी पडली. त्यात ११ जण ठार व शंभराहून अधिकजण जखमी झाले. संयुक्त प्रांतातील बरेली येथे मशिदीसमोरून मिरवणूक गेल्याने दंगल उफाळली. त्यात १४ जण ठार व १६५ जण जखमी झाले.

नागपूर येथे ४ सप्टेंबर १९२७ या दिवशी दंगल झाली. १९२७च्या सप्टेंबरमधेच अजून एक दंगल लाहोर येथे झाली. या दंगलीत १९ जण ठार झाले व १२३ जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आले.

३१ मार्च १९२९ ला संपलेल्या वर्षातील १२ महिन्यात १२ दंगली झाल्या. जरी दंगलींची संख्या तुलनेत कमी असली तरी, मुंबईत झालेल्या दंगलीत मृत्युमुखी पडलेल्यांची संख्या २०४ होती व सुमारे १००० जण जखमी झाले होते. यावरून दंगलीची उग्रता लक्षात येऊ शकते. यापैकी मुंबईत १५ दिवसात झालेल्या दंगलीत १४९ ठार व ७३९ जखमी झाले होते.

कलकत्त्यापासून जवळच असलेल्या खरगपूर येथे दंगलीच्या दोन घटना घडल्या. पहिली घटना जूनच्या अखेरीस मोहरमच्या दिवशी घडली, व दुसरी घटना १ सप्टेंबर १९२८ या दिवशी गोहत्या प्रकरणावरून घडली. पहिल्या दंगलीत १५ जण ठार व २१ जण जखमी झाले तर दुसऱ्या दंगलीत ९ जण ठार व ३५ जण जखमी झाले. तथापि १९२८ च्या फेब्रुवारीच्या मध्यास मुंबईत झालेल्या दंगलीची उग्रता इतकी भीषण होती की, या दोन्ही दंगली त्यापुढे किरकोळ म्हणाव्या लागतील या दंगलीत १४९ जण ठार व किमान ७०० पेक्षा अधिक जखमी झाले होते.

१९२९–३० या वर्षात सरकारने फक्त महत्वाच्या २ दंगलींची नोंद केली, आणि त्यापैकी अशांत मुंबईची परिस्थिती खरोखर चिंताजनक होती. २३ एप्रिल या दिवशी भडकलेल्या दंगलीचा वणवा मे महिन्याच्या मध्यापर्यंत शांत झाला नव्हता. त्यात ३५ जण ठार व सुमारे २०० जखमी झाले होते.

- **मिठाचा सत्याग्रहानंतरच्या दंगली**

१९३०–३१ या वर्षात सविनय कायदेभंगाच्या चळवळीने (मिठाचा सत्याग्रह) जोर धरला होता. मुस्लिमांचा यात बिलकूल

सहभाग नसे. सर्वात उग्र स्वरूपाची दंगल ४ आणि ११ ऑगस्ट १९३०च्या दरम्यान सिंध प्रांतातील सक्कर येथे झाली. त्याची झळ सुमारे १०० खेड्यांना बसली. १२ ते १५ जुलै दरम्यान मेमनसिंग जिल्ह्याच्या (बंगाल) किसनगंज उपविभागात झालेली दंगलही मोठ्या प्रमाणात होती. त्याखेरीज ३ ऑगस्टला बलिया (उत्तर प्रांत), ६ सप्टेंबरला नागपूर, ६ व ७ सप्टेंबरला मुंबई येथे लहानमोठ्या प्रमाणात जातीय दंगली झाल्या.

मिर्झापूर जिल्ह्यात १९३१च्या फेब्रुवारीच्या १४ व १६ तारखेला जोरदार दंगली झाल्या. १७ तारखेला आग्रा येथे दंगल झाली व ही दंगल २० तारखेपर्यंत चालू होती. २८ तारखेला बंगालमधील धनबाद येथे जातीय दंगल झाली व ३० तारखेला अमृतसर येथे दंगल झाली.

२३ मार्च १९३१ला भगतसिंगला फाशी दिली गेली. त्याच्या निषेधार्थ कानपूरमध्ये मुस्लीम दुकानदारांना हरताळ पाळण्यास काँग्रेस कार्यकर्त्यांनी सक्तीने भाग पाडल्याने ही दंगल उसळली. २४ मार्चला हिंदूंच्या दुकानांची लुटालूट सुरू झाली. २५ मार्चला जाळपोळी सुरू झाल्या. दुकाने, मंदिरे आगीत बेचिराख करण्यात आली. जाळपोळ, लुटालूट, खून आदी प्रकार वणव्यासारखे पसरत गेले. सुमारे ५०० कुटुंबांनी स्वत:च्या घरादाराचा त्याग करून शेजारच्या खेड्यात आश्रय घेतला. दंगलीचा सर्वाधिक त्रास झालेल्यांमध्ये डॉ. रामचंद्रन हे होते. त्यांच्या कुटुंबातील सर्वांची, पत्नी, वयोवृद्ध आईवडील यांची हत्या करून प्रेते गटारात फेकून देण्यात आली होती. याच कत्तलीत गणेश शंकर विद्यार्थी हा प्राण गमावून बसला. कानपूर दंगल चौकशी समितीने आपल्या अहवालात नमूद केले की, दंगलीत अभूतपूर्व असा हिंसाचार घडला. विशिष्ट प्रकारचा अत्याचार अनपेक्षितपणे संपूर्ण शहरात व शहराबाहेर वाढत गेला. दंगल पूर्णपणे नियंत्रणाखाली येण्यापूर्वी ३ दिवस आधी शहरात खून, जाळपोळ, लुटालूटीचे प्रकार चालू होते. त्यानंतर दंगल हळूहळू शांत झाली. मनुष्यवस्ती व वित्तहानी मोठ्या प्रमाणावर होती. मृतांची संख्या ३०० अधिकृतपणे सांगितली जात असली तरी, ही संख्या ४०० ते ५०० च्या घरात असावी. बहुसंख्य मंदिरांची व मशिदींची विटंबना झाली किंवा ती जाळण्यात आली किंवा उध्वस्त केली गेली.

परंतु १९३३–३४ या वर्षात देशाच्या कानाकोपयातून दंगलीच्या ज्वाळा भडकत होत्या. होळीच्या वेळी उत्तर भारतातील बनारस व कानपूर येथे, पंजाबातील लाहोरला आणि पेशावरला दंगली उसळल्या. बकरीईदच्या दिवशी गोहत्या झाल्यामुळे उत्तर प्रांतातील अयोध्या येथे भीषण दंगल उसळली. तसेच बिहारमधील भागलपूर व ओरिसा तसेच मद्रास इलाख्यातील कन्नोर येथेही बकरीईदच्या दिवशी गोहत्या झाल्याने दंगली उसळल्या. संयुक्त प्रांतातील गाजीपूर जिल्ह्यात झालेल्या भीषण दंगलीत अनेक जण ठार झाले. एप्रिल व मे महिन्यात बिहार, ओरिसा, बंगाल, सिंध प्रांतात तसेच दिल्लीत हिंदू–मुस्लिम यांच्यात दंगली झाल्या. त्यापैकी काही दंगलीची कारणे अगदी क्षुल्लक होती. उदा. दिल्लीत मुस्लिम दुकानदार रस्त्याने जाणाऱ्या हिंदूच्या अंगावर थुंकला.

आग्रा येथे काही हिंदूंच्या घरी धार्मिक सोहळ्यामुळे जो आवाज येत होता, त्यामुळे शेजारच्या मशिदीत नमाजात व्यत्यय येतो, असे सांगून अशा प्रकारच्या आवाजाला मुस्लिमांनी आक्षेप घेतला. हा वाद मिटण्यापूर्वी २० जुलै १९३३ला दंगल झाली आणि २ सप्टेंबरला पुन्हा दंगल झाली. त्यात ४ जण ठार व ८० पेक्षा अधिक जखमी झाले.

१९३४–३५ या वर्षात सर्वात मोठी दंगल २९ जून १९३४ या दिवशी लाहोर येथे झाली. शहीदगंज गुरुद्वाराच्या आवारात मशीद उभारल्याने मुस्लिम आणि शीख यांच्यात ही दंगल उसळली. बराच काळ अशांततेचे वातावरण पसरलेले होते. मुस्लिमांनी तीव्र निषेध केला असतानाही, जेव्हा शीखांनी मशिदीचे बांधकाम पाडण्यास प्रारंभ केला आणि परस्परातील द्वेष भावना अधिक बळावली. या जागेचा खटला दीर्घकाळ चालू होता व ती जागा शिखांच्या मालकीची असल्याचा न्यायालयाने निर्णय देऊन, या जागेवर शीखांच्या हक्काचे शिक्कामोर्तब केले गेले.

सरकारने मुस्लिमांना दुसऱ्या ठिकाणी मशीद बांधून देण्याचे आश्वासन दिले तरी, त्याचा काहीही परिणाम झाला नाही. २० आणि २१ जुलै या दिवशी लष्करी जवानांना किमान ८ वेळा गोळीबार करावा लागला. एकूण गोळीबारात १२ जण ठार झाले.

नत्थुरामल या हिंदूचा खून करणाऱ्या अब्दुल कयाम या मुस्लिमाला १९ मार्च १९३५ या दिवशी फाशी दिल्यानंतर कराची येथे गंभीर घटना घडल्या. फाशीनंतर अब्दुल कयामच्या मृतदेहाचे शहराबाहेर दफन करण्यासाठी त्याच्या नातेवाईकांच्या ताब्यात देण्यासाठी जिल्हा दंडाधिकारयांनी पोलिसांच्या मदतीने मृतदेह आणला. जमावाला रोखण्यासाठी गोळीबार करणे भाग पडले. त्यात ४७ जण ठार झाले तर १३४ जखमी झाले. पोलिसांची जादा कुमक आल्याने अधिक अनर्थ टळला.

२५ ऑगस्ट १९३५ या दिवशी सिकंदराबाद येथे जातीय दंगल उसळली.

जातीय दंगलीचे एकूण ४ प्रकार घडले. १४ एप्रिल १९३६ या दिवशी आग्रा जिल्ह्यातील फिरोझाबाद येथे भीषण दंगल झाली. एका मिरवणूकीतील संतप्त मुस्लिमांनी डॉ. जीवराम यांच्या घराला व त्याच्या शेजारच्या राधाकृष्णाच्या मंदिरास आग लावली. डॉ. जीवराम यांच्या घरातील नातेवाईक व ३ मुलांसह ११ हिंदूंना जिवंत जाळण्यात आले.

२४ एप्रिल १९३६ या दिवशी मुंबई इलाख्यातील पुणे शहरात हिंदू–मुस्लिम यांच्यात दुसरी दंगल झाली. २७ एप्रिल या दिवशी मुंगेर जिल्ह्यातील जमालपूर येथे हिंदू–मुस्लिम दंगल झाली. या वर्षातील हिंदू–मुस्लिमांमधील चौथी दंगल १५ ऑक्टोबर ३६ या दिवशी मुंबई शहरात झाली.

२७ मार्च १९३७ या दिवशी होळीच्या मिरवणुकीवरून पानीपत येथे हिंदू–मुस्लिम यांच्यात दंगल झाली. त्यात १४ जण ठार झाले. १ मे १९३७ ला मद्रासला झालेल्या जातीय दंगलीत ५० जण जखमी झाले. मे महिन्यात प्रामुख्याने मध्य प्रांत व पंजाबात अधिक प्रमाणात दंगली झाल्या. सिंध प्रांतातील शिकारपूरला प्रचंड खळबळ उडाली. १८ जूनला अमृतसर येथे मुस्लिम– शीख यांच्यात दंगल झाली. त्यामुळे कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी ब्रिटिश फौजांना पाचारण करावे लागले.

१९३८ या वर्षी २ जातीय दंगली झाल्या. त्यापैकी एक २६ मार्च या दिवशी अलाहाबाद येथे व दुसरी एप्रिल महिन्यात मुंबई येथे दंगल झाली.

१९३९ या वर्षात हिंदू–मुस्लिम यांच्यात ६ दंगली झाल्या. २१ जानेवारीला असनसोल येथे झालेल्या दंगलीत १ जण ठार व १८ जण जखमी झाले. त्यानंतर कानपूर येथे ११ फेब्रुवारीस दंगल होऊन त्यात ४२ जण ठार, २०० जण जखमी झाले. या प्रकरणी ८०० जणांना अटक करण्यात आली. ४ मार्चला बनारस येथे व त्यानंतर ५ मार्चला कलकत्त्याजवळ कासीपोर येथे दंगली झाल्या. १९ जूनला रथयात्रेच्या मिरवणूकीवरून कानपूर येथे पुन्हा दंगल उसळली.

सिंध प्रांतातील सक्कर येथे २० नोव्हेंबर १९३९ ला भीषण दंगल झाली. ही दंगल म्हणजे मुस्लिमांनी ताबा मिळविण्यासाठी केलेल्या आंदोलनाच कळस होता. इतकेच नव्हे तर सरकारची मालमत्ता म्हणून सरकारच्या ताब्यात असलेली मंजिलबाग इमारतीचा जबरदस्तीने ताबा घेण्याचा मुस्लिमांनी प्रयत्न केला. व त्याचे स्थलांतर करण्यास हिंदूंनी जोरदार हरकत घेतली. या प्रकरणी चौकशी करण्यासाठी मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती इ. वेस्टन यांची नियुक्ती करण्यात आली. खून आणि जखमींची त्यांनी दिलेली आकडेवारी पुढीलप्रमाणे.

- **फक्त मुंबईतील दंगलीतील आढावा**


संपूर्ण इलाखा बाजूला ठेवला व फक्त मुंबई शहराचा जरी विचार केला तरी. तो शहरातील काळाकुट्ट अहवाल होता यात शंका नाही. १८९३ या वर्षी हिंदू–मुस्लिम यांच्यात पहिली दंगल झाली. त्यामुळे दीर्घकाळची जातीय शांतता भंग पावली. १९२९ पर्यंत हीच परिस्थिती होती. परंतु त्यानंतरच्या प्रत्येक वर्षाची कथा घाबरवून टाकणारी होती. फेब्रुवारी १९२९ ते एप्रिल १९३८ या ९ वर्षाच्या काळात किमान १० जातीय दंगली झाल्या. १९२९ साली २ जातीय दंगली झाल्या. पहिल्या दंगलीत १४९ ठार व ७३९ जण जखमी झाले होते. ही दंगल ३६ दिवस चालू होती. १९३० साली २ दंगली झाल्या. या दंगलीत मृत्युमुखी पडलेल्यांची आकडेवारी उपलब्ध नाही. १९३२ या वर्षी पुन्हा २ दंगली झाल्या. पहिली दंगल लहान स्वरूपाची होती. दुसया दंगलीत २१७ जण ठार व २७१३ जण जखमी झाले होते. ही दंगल ४९ दिवस चालू होती. १९३३ या वर्षी एक दंगल झाली. त्याचा तपशील उपलब्ध नाही. १९३६ साली एक दंगल झाली त्यात ९४ ठार व ६३२ जण जखमी झाले. ही दंगल ६५ दिवस चालू होती. १९३७ च्या दंगलीत ११ जण ठार व ८५ जखमी झाले. ही दंगल २१ दिवस चालू होती १९३८ या वर्षी झालेली दंगल फक्त अडीच तास चालली, परंतु एवढ्या अल्पवेळेत १२ जण ठार व किमान १०० जण जखमी झाले. फेब्रुवारी १९२९ ते एप्रिल १९३८ या ९ वर्ष २ महिने काळात एकट्या मुंबई शहरात हिंदू–मुस्लिमांच्यात २१० दिवस दंगल चालू होती. त्यात एकूण ५५० जण ठार व ४५०० जण जखमी झाले. या दंगलीत जाळपोळ, लुटालूट याद्वारे झालेली मालमत्तेची हानी येथे विचारातच घेतली नाही.

या सर्व दंगलींवर भाष्य करताना डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणतात,

१९२० ते १९४० या काळात हिंदू–मुस्लिम यांचे संबंध कसे होते, हे स्पष्ट करणारा असा हा अहवाल आहे. हिंदू–मुस्लिम ऐक्यासाठी श्री. गांधींनी केलेले अविश्रांत परिश्रम एका बाजूला ठेवून हा अहवाल वाचताना मनाला अत्यंत वेदना होतात, क्लेश होतात. भारतातील हिंदू–मुस्लिम यांच्यातील यादवी युद्धाचा हा २० वर्षाचा इतिहास आहे, असे म्हटल्यास अतिशयोक्ती ठरणार नाही.

**लेखांकन : डॉ. गिरीश आफळे**

**संपर्क : ९४२२०१४४५४**



# भारताने आपला आंतरराष्ट्रीय दर्जा कसा वाढवला

असं कधी वाटले नव्हते कि दोन युरोपीयन देशांत युद्ध होईल आणि अमेरिकन पत्रकार त्यांच्या राष्ट्राध्यक्षांना भारताच्या भूमिकेवर प्रश्न विचारतील भारताशी तुमचे बोलणे होत आहे का ? भारत काय करू शकतो ह्यावर ? असे प्रश्न अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षाना विचारले जाऊ शकतात असे कोणालाच वाटले नव्हते, कारण एका आंतरराष्ट्रीय विवादात भारताला इतके महत्व मिळू शकते.

खूप वर्षा आधी जगात कधी आंतरराष्ट्रीय विवाद होतो किंवा आंतरराष्ट्रीय घडामोडी घडत मग ते कसेही असोत दोन देशात युद्ध असो दहशतवादी कार्यवाया असोत कसल्याही प्रकारचा विवाद असो, मग त्या विवादावरून अमेरिका मध्ये बैठका होतात त्यात पॉलिसी मेकर्स, पॉलिटिशियन किंवा दुसऱ्या बाजूला फ्रांस, जर्मनी, युके, फर्स्ट वर्ल्ड कंट्री ज्यांना बोलले जातात ते त्या विवादावर बसून बैठका घेतात एकमेकांच्या माहितीची देवाण घेवाण होते त्यावेस भारताचा दूर दूर संबंध नसायचा,

पण आता परिस्थिती फार बदललेली दिसत आहे, जगात रशिया आणि युक्रेन मध्ये युद्ध सुरु आहे. जे देश भारताचे शेजारील सुद्धा नाहीत. ते युरोपण देश आहेत, आज संपूर्ण जग ह्या युद्ध संपविण्यासाठी शांती स्थापित करण्यासाठी भारताकडे बघत आहे.

एकेकाळी भारताचा काहीही रोल नसायचा आंतराष्ट्रीय घडामोडीवर, जगाच्या जिओ पॉलिटिक मध्ये काही देणे घेणे नसायचे काही देश जे इंटरनॅशनल पॉलिसी बनवायचे अमेरिका, कॅनडा, जपान, युरोपियन देश भारताला काहीच समजायचे नाही. त्यांच्या प्लॅन मध्ये भारत कधीच भागीदार होत नसे, कधी भारताला विचारात सुद्धा घेत नसे.

जेव्हा पाकिस्तान किंवा पाकिस्तान स्पाँनसेर्ड आतंकवादी वर बोलणे होत होते त्यावेळी फक्त भारताचा विचार होत असे. त्यावर एकच कारण होते आझादी झाल्यापासून भारताच्या ज्या पॉलिसी ठरवल्या गेल्यात आणि ज्यांनी देश चालवायला घेतला त्यांच्या मते एखाद्या देशाला योग्य पद्धतीने चालवायचे असेल तर किंवा दुसऱ्या देशाशी चांगले संबंध तयार करायचे असतील तर मिलिटरी , नॅशनल इंटेलिजन्स ह्यावर जास्त खर्च न करता किंवा खर्च कमीत कमी असो तेव्हढे चांगले, त्यांना वाटले असावे आपण जर गांधीवादी विचारधारेवर म्हणजे कोणी जर आपल्याला एका गालावर फटका मारला तर दुसरा गाल पुढे करणार तर पूर्ण जगा सोबत आपले संबंध चांगले राहतील, पण तसे झाले नाही

ह्याचा च फायदा चीन ने उचलला उदाहरण घायचे झाले तर १९५० मध्ये अमेरिकेने भारताला पर्मनंट सीट ऑफर केली होती युनाइटेड नॅशन मध्ये पण नेहरूजीनी संसद मध्ये बोललेले नॉट ऍट द कॉस्ट ऑफ चायना पण अमेरिकन देशाची इच्छा होती कि काम्युनिस्ट जगात पसरता कामा नये म्हणून त्यांना कोणत्याही किमतीत हे थांबवायचे होते आणि जर चीन ला कोणत्याही परिस्थितीत हि सीट मिळाली तर त्याचा तो दुरुपयोग करेल म्हणून त्यांनी सीट भारतास ऑफर केली. पण चीन ने काय केले आपल्याला आपण तर हिंदी चिनी भाई भाई करत राहिलो आणि त्यांनी आपल्यावर आक्रमण केले असे आपले व्हिसीओनोरी नेते होते जे हे पण पाहू नाही शकले कि पुढे चीन काय कुऱ्यापत्या करू शकतो आपल्याशी युद्ध करू शकतो, आपली हजारो किलोमीटर जमीन जप्त करू शकतो किंवा हिसकावू शकतो.

सरदार वल्लभभाई बघू शकले पण बाकी कोणी ह्या गोष्टीचा विचार त्यावेळी करू शकले नाही, पटेल ह्यांनी अनेकदा नेहरूजींना सांगितले पण नेहरूजींनी त्यांच एकूण नाही घेतले

ह्या ज्या आपल्या पॉलिसीस होत्या ज्यात आपण नॉन एलिमेन्ट मोमेन्ट मध्ये सहभाग घेतला जर आपण ह्या गोष्टी नीट मुळात जाऊन पाहिल्यात तर समजेल नॉन अलाइड म्हणजे आम्ही कोणासोबत नाहीत पण आपण USSR सोबत

होतो पहिल्या दिवसापासून होतो खरंतर आपण नॉन अलाइड मध्ये गेलो तेफक्त णड्ड्ठ ला सांगत होतो आम्ही वेस्ट सोबत नाही जाणार फक्त तुमच्याच सोबत असू, नेहरूजींनी नॉन अलाइड मोमेन्ट चालवले पण आपण सोविएत सोबतच होतो तो जे बोलेल आपण तेच करत होतो, सोविएत युनियन सोबत आपली मैत्री तर होतीच त्यांनी अनेकदा आपल्याला मदत केली पण त्याबदल्यात आपण हि मोठी किंमत चुकवलेली आहे. आणि ती आजपर्यंत किंमत मोजावी लागत आहे

एकेकाळी आपल्या देशात जेव्हा व्ही के क्रिष्णा म्यलान रक्षा मंत्री होते, जो असा माणूस कम्युनिस्ट प्रेमात एवढा आंधळा होता.चीनच्या आक्रमणाच्या एकदिवस आधी त्याला भरवसा सुद्धा नव्हता कि चीन युद्ध करू शकतो भारताशी मिलिटरी इंटेलिजन्स माहिती देत होत्या कि सैन्य जवळ येत आहे तरी मंत्री ना विश्वास होत नव्हता आणि जेव्हा चिनी सैन्य ने आक्रमण केले तेव्हा हि मंत्री बोलले भारतीय सैन्यानेच त्यांना चिडवले असावे किंवा आपलीच चुकी असेल असे तर आपले रक्षा मंत्री होते जे चीन प्रेमाने आंधळे होते अनेकदा ते प्रोपगेंडा करीत असे USSR कडून हत्यार घावी वेस्ट कडून न घेता मग ते विमान USSR वेस्ट पेक्षा जास्त किमतीत का असे ना मग कोणतीही अटी असो ह्याचा परिणाम असा झाला आज २०२२ मध्ये हि आपण मिलिटरी इंपोर्टस आहेत हार्ड वेअर साठी ५०% अवलंबून आहे रशिया वर, या सगळ्यावर एकाच प्रश्न आहे ईस्ट वेस्ट कोणावर हि अवलंबून न राहता आपण सेल्फ डिपेंडेंट का नाही झालो मागच्या ७० वर्षात आता वेळ बदलली आहे पाहिल्यावेळेस आपण दुसऱ्या देशांना हत्यार जे भारतात बनलेले आहेत ते एक्स्पोर्ट करणार आहोत , हे ऐकल्यावर बरे वाटले सुरवात छोटी आहे पण एक पाऊल आहे. जर हीच सुरवात आधी केली असती तर कारण ७०वर्ष ७ दशक गेली त्यावेळी सुरवात केली असती तर आज आपण आत्मनिर्भर असतो १ दिवसापासून खाजगीकरण ला पॉवर दिली असती तर खाजगी कंपन्यांना सूट मिळाली असती तर आज भारतीय खाजगी कंपन्या संरक्षण क्षेत्रात जगात प्रथम क्रमांकावर असत्या त्यामुळे देशाचीही प्रगती झाली असती द्यायला हवी होती सूट मॅड इन इंडिया मुळे भारताला उत्तम दर्जा असलेले शस्त्र शिवाय स्वस्त आणि भरघोस रोजगार हि मिळाला असता युवकांना एकेकाळी KGB चे एजन्ट आपल्या देशात खूप प्रमाणात पसरलेले होते, म्हणून त्यावेळी देशाची पॉलिसी बनविताना अनेक मुद्दे बनवलेत नाहीत देशाला आत्मनिर्भर वगरे असे मुद्दे घायला हवे होते त्यामुळे त्याकाळी पश्चिमी देश भारताला जास्त महत्व देत नसे ज्या देशात १९९३ झाले तरी आपण चूप होतो त्यानंतर २००८ झाले मुंबई मध्ये ट्रेन ब्लास्ट झालेत आपण काहीच नाही केलं, अन जेव्हा पार्लमेंट अटॅक झाला त्यावेस इगझ सरकार होती आपण प्रतियोत्तर म्हणून बॉर्डर वर उत्तर दिले पण उत्तर गंभीर स्वरूपात नव्हते अटलजींकडे सत्ता होती पण ते काही करू शक्ले नाही कारण बहुमत नव्हते, कारगिल मध्ये आपण उत्तर दिले, अमेरिकेमध्ये सप्टेंबर ११ झाले पण अमेरिकन त्यास कसे प्रतिउत्तर दिलेत

पण मागच्या पाच वर्षात भारतानेही हे हल्ले गंभीर घेण्यास सुरवात केली आणि हल्ल्यावर प्रतिकार केले नेस्तनाबूत केले दुश्मन वेडा झाला पण भारत आता नवीन भारताची सुरवात झाली आता हा घर मे घुसेगा भी ठोकेगा भी पंतप्रधान मोदीजींच्या नेतृत्वात उरी हल्ला  झालें तर आपण सर्जिकल स्ट्राईक केली, पुलवामा हल्ला झाला आपण एअर स्ट्राईक केली , गलवान मध्ये आपण चीन ला ताकद दाखवली आपले काही जवान वीर गतीस प्राप्त झाले, पण चीन चेही अनेक सैन्य मृत झाले, पण आपण चीन ला पुढे नाही येऊ दिले तिथेच त्यांना थांबविले आणि मुद्दा थांबला आणि ह्यातून काय संदेश गेला तर भारताने चीन शी टक्कर घेतली, चीन ला जे करायचे होते ते नाही करू शकला माघारी फिरावं लागलं आणि ह्यातून पूर्ण जगात वेगळा संदेश गेला ह्यावर वेस्ट देशाची कव्हरेज केले आहे गलवान घाटी ह्यातून भारताची प्रतिमा बदलली वेस्ट देशांना कळले आता भारत कडाडू शकतो सिंहासारखा पहिले तशी प्रतिमा नव्हती नाही गरजते नही बरसते एक उदाहरण आहे इस्राईल एक छोटासा देश आहे पण सर्व घाबरतात ज्याची लोकसंख्या  १ करोड हि नाही आणि सर्व बाजूनी शत्रू आहेत कोणी जर हल्ला केला तर त्याचें प्रतिउत्तर गंभीर असते

डे ओपरेशन नाईट ऑपरेशन आणि सर्वात प्रसिद्ध कोवर्ड ऑपरेशन करतो त्यामुळे दुश्मन ची पळती भुई होते, आणि तशीच भारताची इमेज आता बदलायला सुरवात झाली आहे, पण काही लोकांना हे दुखत आहे कारण युक्रेन जर्मनी सारखे देश मदतीची साथ मागतात तेव्हा देशाची जगात वाहवाही होते, हे बदल आता सुरु झालेत जेव्हा आपण काही वर्षांपूर्वी फॉरेन पॉलिसी बदलल्या एक अग्रेशन आणले त्यात डिप्लोमॅटिकली

डील करण्यास सुरवात केली, भारताने फर्म डिसिजन घ्यायला सुरवात केली जी ह्या पूर्वी आपण घेत नव्हतो, अमेरिका बोललीआम्ही सेक्शन लावू ४०० रशिया कडून घेतल्यास, भारतत्यावर प्रतिक्रिया दिली आम्हांला सुरक्षेच्या दृष्टीकोनातून योग्य आहे आम्ही घेऊ , आपण इराण कडून तेल घेत आहोत अमेरिका नाही लावू शकत सेक्शन कारण ज्यावेस तुम्ही असो वा देश जेव्हा योग्य डिसिजन घेतात तेव्हा त्यास काउंटर करणं फार कठीण असतं

मला असं कधी वाटले नव्हते कि दोन युरोपन देशांत युद्ध होईल आणि अमेरिकन पत्रकार त्यांच्या राष्ट्राध्यक्षांना भारताच्या भूमिकेवर प्रश्न विचारतील भारताशी तुमचे बोलणे होत आहे का ? भारत काय करू शकतो ह्यावर ? असे प्रश्न अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षाना विचारले जाऊ शकतात असे कोणालाच वाटले नव्हते, कारण एका आंतरराष्ट्रीय विवादात भारताला इतके महत्व दिले जाऊ शकते

कदाचित शेवटी रशिया वरती अमेरिका सर्व देश सेक्शन प्रतिबंध लावतील त्याचा थोडाफार भारतावर परिणाम होऊ शकतो भारताने योग्यरितीने परिस्थिती हाताळली आपल्या नागरिकांना युक्रेन मधून परत आणण्यासाठी मिशन गंगा रन केले आणि जवाबदारी ४ मंत्र्यांना दिली खूप महत्वपूर्ण आहे कारण इतर देश आपले नागरिक आणण्यात असक्षम आहेत आणि त्या त्या देशात त्यांचे पत्रकार त्या त्या सरकार ला सांगत आहेत बघा भारत आपले नागरिक कोणत्याही परिस्थितीत परत आणतात. गर्व आहे भारतीय असल्याचा.


**लेखांकन : तन्मय आबाजी गांगुर्डे**

**संपर्क : ८३७८०११०६५**

**विश्व हिंदू परिषद व हिंदुबोधच्या कार्यास हार्दिक शुभेच्छा विनोद बन्सल, निगडी प्राधिकरण**





**विश्व हिंदू परिषद व हिंदुबोधच्या कार्यास हार्दिक शुभेच्छा - विवेक मेहेंदळे, पुणे**



# विज्ञान म्हणजे काय?
# अज्ञान मान्य करते ते विज्ञान

चूक शोधा, चूक  मान्य करा, चूक दुरुस्त करा आणि प्रगती साधा असं विज्ञान नावाची युक्ती आपल्याला सांगते. चूक आणि अज्ञान मान्य करणं ही ज्ञानाची पहिली पायरी आहे.

मेंडेलीफची आवर्तसारिणी  (Periodic Table) नावाचा, चौकोन चौकोन असलेला, एक मोठ्ठाच्या मोठ्ठा तक्ता, तुम्ही रसायनशास्त्राच्या प्रयोगशाळेत पहिला  असेल. तो असा दिसतो.




साऱ्या मूलद्रव्यांची  क्रमवार आणि शिस्तशीर मांडणी या तक्त्यात  केली आहे. आज आपल्याला सारी मूलद्रव्ये माहीत आहेत. सारे चौकोन आता भरलेले आहेत.

पण जेंव्हा मेंडेलीफ नावाच्या शास्त्रज्ञाने, हा तक्ता पहिल्यांदा तयार केला, तेंव्हा (१८६९) काही मोजकीच मूलद्रव्ये ठाऊक होती. त्याने केलेला पहिलावहिला तक्ता असा दिसत होता.

यात काही चौकोन चक्क रिकामे दिसत आहेत. रिकामे चौकोन हीच तर त्याच्या यशाची गुरुकिल्ली. त्याच्या पूर्वीही अनेक जणांनी असा तक्ता करायचा  प्रयत्न केला  होता. ठाऊक होती ती सारी मूलद्रव्ये, सगळ्या  चौकोनात  भरून, शिस्तीत बसवण्याचा प्रयत्न केला होता.  पण मेंडेलीफ यशस्वी ठरला. याचे  कारण, त्याने सगळे चौकोन भरलेच  पाहिजेत, हा अट्टाहास सोडून दिला.

प्रत्येक चौकोन म्हणजे काही विशिष्ठ गुणधर्म अशी याची रचना आहे. काही चौकोनात आपल्या गुणधर्माने  फिट्ट बसतील, अशी मूलद्रव्ये त्या काळी माहीतच नव्हती. अशा अज्ञात  मूलद्रव्यांच्या, संभाव्य जागा, त्याने रिकाम्या ठेवल्या आणि तक्ता जुळून आला.  या रिकाम्या जागा म्हणजे अज्ञान मान्य असण्याच्या खुणा.

ह्याच्याही पूर्वी, जेंव्हा युरोपीय प्रवासी प्रथम दूरदेशी जहाजे हाकू लागले तेंव्हा त्यांनी त्या किनारपट्टीचे नकाशे बनवले होते. किनारपट्टी लगतचा प्रदेश त्यांना चांगलाच माहिती होता.  पण थोडे आत गेल्यास काय आहे, हे अजिबात माहीत नव्हते. मग त्यांच्या  नकाशात किनारपट्टीच्या प्रदेशातील सर्व बारकावे असत पण आतल्या भागात भुतेखेते, चित्रविचित्र प्राणी, पक्षी, राक्षस अशी काल्पनिक चित्रे काढून ती जागा भरवलेली असे. पुढे काही शतकांनंतर काढलेल्या नकाशात मात्र अज्ञात जागा कोरी ठेवलेली आढळते. अज्ञानाचा शोध, हा माणसाला लागलेला एक मोठा शोध आहे.  प्रामाणिकपणाची ही मोठ्ठीच्या मोठी झेप म्हणायची! असा प्रामाणिकपणा आपल्याला विज्ञान नावाच्या युक्तीकडे घेऊन जातो.

जे माहीत नाही ते माहीत नाही म्हणायला विज्ञानाला शरम वाटत नाही. उदाहरणार्थ पृथ्वीवर पहिला  सजीव कसा  निर्माण झाला या प्रश्नाचं उत्तर आपल्याला माहीत नाही.  ह्या   विषयी आपल्याला नेमकं काही सांगता येत नाही. 'पृथ्वीवर पहिला सजीव कसा  निर्माण झाला?',  असं विचारलंत तर तुमच्या विज्ञानाच्या शिक्षिका तुम्हाला काही  पान-गुची गोष्ट (पहा ह्या लेखमालेतील लेखांक १) सांगणार नाहीत. त्या कदाचित म्हणतील, 'ह्या प्रश्नाचं नेमकं उतर माहीत नाही बाई! मोठेपणी तूच शोधून काढ! ...आणि मला म्हातारीला घरी येऊन सांग!!'

| I | II | III | IV | V | VI | VII | VIII | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| H 1.01 | | | | | | | | | |
| Li 6.94 | Be 9.01 | B 10.8 | C 12.0 | N 14.0 | O 16.0 | F 19.0 | | | |
| Na 23.0 | Mg 24.3 | Al 27.0 | Si 28.1 | P 31.0 | S 32.1 | Cl 35.5 | | | |
| K 39.1 | Ca 40.1 | | Ti 47.9 | V 50.9 | Cr 52.0 | Mn 54.9 | Fe 55.9 | Co 58.9 | Ni 58.7 |
| Cu 63.5 | Zn 65.4 | | | As 74.9 | Se 79.0 | Br 79.9 | | | |
| Rb 85.5 | Sr 87.6 | Y 88.9 | Zr 91.2 | Nb 92.9 | Mo 95.9 | | Ru 101 | Rh 103 | Pd 106 |
| Ag 108 | Cd 112 | In 115 | Sn 119 | Sb 122 | Te 128 | I 127 | | | |
| Ce 133 | Ba 137 | La 139 | | Ta 181 | W 184 | | Os 194 | Ir 192 | Pt 195 |
| Au 197 | Hg 201 | Ti 204 | Pb 207 | Bi 209 | | | | | |
| | | | Th 232 | | U 238 | | | | |

पण इंटरनेटवर शोधलंत तर पहिला जीव आला कुठून हे सांगणाऱ्या, जगभरातल्या सात–आठ डझन कथा सहज सापडतील. कित्येक कथांत आकाशातल्या कोणा शक्तिने हे केल्याचं सांगितलं आहे. कुठल्याशा कथेत अंड्यातून पहिला जीव निपजला, असं सांगितलं आहे. बॅबीलोनीयाच्या (आजचा इराक देश) कथेत मुम्मु–टियामत आणि आपसू या आदि (म्हणजे मूळ) आईबाबांपासून जीवसृष्टी उत्पन्न झाल्याचं सांगितलं आहे. सारे जीव पृथ्वीच्या पोटातून वर आले असंही सांगणाऱ्या कथा आहेत.

पण असल्या कोणत्याच कथेत आजवर काहीही तथ्य आढळलेलं नाही. म्हणजे विज्ञानालाही काही सांगता येत नाही आणि या कथांतही काही दम नाही.

आता तुमच्या मनांत येईल की जर का विज्ञानालाही काही माहीत नाही तर मग एखादी कथा खरी मानून चालायला काय हरकत आहे?

हरकत आहे तर. हरकत अशी आहे, की एखाद्या प्रश्नाचं उत्तर एकदा सापडलं असं तुम्ही समजलात, की आपोआपच पुढील शोध थांबतो. समजा सर्व सजीव सृष्टी पृथ्वीच्या पोटातून वर आली आहे असं आपण समजून चाललो, तर प्रत्यक्षात सजीव सृष्टी कशी उत्पन्न झाली हे कशाला कोण शोधत बसेल?

दुसरा मुद्दा असा की असं एखादं खोटं आणि चुकीचं कारण आपण मान्य केलं की पुढचे सारे आडाखे, अंदाज, इतर संबंधित प्रश्नांची उत्तरेही चुकत जातात. उदाहरणार्थ एखादा आळशी मुलगा गणितात नापास झाला आहे. त्याला शून्य मार्क आहेत. समजा तो म्हणाला, 'उत्तरपत्रिकेवरचा हा लाल भोपळा जमिनीतून येऊन तिथे बसलाय' किंवा 'एका अंड्यातून हे शून्याचे अंडे बाहेर आलं आणि माझ्या बोकांडी बसलं.' तर तुम्ही काय म्हणाल?

जो पर्यंत आपल्या आळशीपणामुळे, अभ्यास न केल्यामुळे, शून्य मार्क पडल्याचं तो मान्य करत नाही, शून्य मार्कांमागचं खरंखुरं कारण शोधून काढत नाही, तोपर्यंत त्याची प्रगती होईल का?

म्हणूनच एखाद्या प्रश्नाचं खरं उत्तर माहीत नसेल तर, माहीत नाही असं मान्य करावं. चुकीचे, खोटे कारण कधीही चिकटवू नये. विज्ञान नावाची युक्ती आपल्याला असं सांगत असते.

**पूर्वप्रसिद्धी किशोर मासिक एप्रिल २०२१**

**लेखांकन : डॉ. शंतनु अभ्यंकर, वाई**

**संपर्क : ९८२२०१०३४९**

**P. V. TAHARABADKAR** : Proprietor

**GAYATRI ENTERPRISES**

MANUFACTURERS OF QUALITY RUBBER PRODUCTS.

1322/23, Kudalwadi, Chikhali, Tal. Haveli,
Dist. Pune - 411 062. TEL : (0) 020 - 65328614
TELEFAX : 020 - 65328614 M : 9850008005
Email : gayatrienterprises91@gmail.com

**हिंदुबोधला मन:पुर्वक शुभेच्छा !**

**अथर्व नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, सातारा**

१६२, मंगळवार पेठ, सातारा

श्री विनोद बळवंत गोडबोले — अध्यक्ष

श्री नितीन पंडीतराव नारकर — उपाध्यक्ष

श्री वासुदेव गोविंद करंबेळकर — सचिव

सर्व संचालक मंडळ

अथर्व नागरी सह पतसंस्था मर्या. सातारा



# जाऊ संतांचिया गावा
# संत नामदेव महाराज

**नाचू किर्तनाचे रंगी । ज्ञानदीप लावू जगी।।**

महाराष्ट्रातल्या संत पंचकातील महत्त्वाचं नांव म्हणजे संत नामदेव महाराज. वारकरी संप्रदायातील आद्य कीर्तनकार म्हणून त्यांना ओळखलं जातं. नाम हाच देव असं म्हणत त्यांनी आयुष्यभर राम कृष्ण हरी हा मंत्र जपला. पांडुरंगाची भक्ती केली. वारकरी संप्रदाय भारतभर पोहोचवला. विशेषतः पुंडलिक वरदा हरि विठ्ठल हा घोष भारतभर घुमविला. उत्तर भारतात हा विशेष गाजला. महाराष्ट्रात तर नामदेव महाराज प्रसिद्ध होते पण त्याचबरोबर पंजाब, राजस्थान, उत्तर प्रदेश, गुजरात, मध्य प्रदेश, हिमाचल प्रदेश या राज्यातही संत नामदेवांना मानणारा वारकरी संप्रदाय तयार झाला. भाषाभेद, वर्णभेद असा कोणताही भेद त्यांना मान्य नव्हता. महाराष्ट्रा बाहेर वारकरी संप्रदायाची पताका फडकवणारे एकमेव संत. असं नामदेव महाराजांचे वर्णन करता येईल.

नामदेव महाराजांचा जन्म नरसी-बामणी येथे झाला. दामा शेठ व गोणाई यांच्या पोटी हे संत रत्न जन्माल आलं. कार्तिक शुद्ध एकादशी या दिवशी सन ११९२ रोजी त्यांचा जन्म झाला. त्यांनीच आपल्या अभंगात याचा उल्लेख केला आहे.

**माझे जन्म पत्र बाबाजी ब्राह्मणे।**
**लिहिले खूण सारू ऐका।।१ ।।**
**अधिक ब्याण्णव गणित अकराशेत।**
**उगवता आदित्य रोहिणीसी।।२।।**
**शुक्ल एकादशी कार्तिकी रविवार ।**
**प्रभव संवत्सर शालिवाहन ठाके ।। ३।।**
**प्रसवली माता मज मळमुत्री।**
**तेव्हा जिव्हेवरी लिहिले देवे।।४।।**

नामदेव महाराजांचे वडील वारकरी होते. सहाजिकच बालपणापासून त्यांचेवर भक्तीचे संस्कार होत गेले. भक्तिरसात वाढलेल्या नामदेवांनी नामच देव आहे हे तत्व आयुष्यभर पाळलं. नामदेवांचा स्वभाव अतिशय लाडिक, प्रेमळ आणि हट्टी होता. देवाजवळ प्रेमळपणा चा हट्ट म्हणून त्यांना पांडुरंगाचा प्रेम भांडारी म्हणत. सगळे हट्ट, मागणं, आर्जव हे सगळं ते विठठलापाशी करीत. सुखदुःखात त्यांना देवच दिसे . जे घडते ते त्याच्याच इच्छेने. हे सत्य त्यांनी मान्य केले होते. लहानपणी नामदेवांच्या आईने त्यांना पांडुरंगाला नैवेद्य दाखवायला सांगितला. त्यांना खूप आनंद झाला. त्यांचे हृदय विठ्ठल भक्तीने भरलेले होते. त्याच आनंदात त्यांनी नैवेद्य दाखवला. त्यांना माहीत नव्हते, देव खात नसतो. ते समोर बसून राहिले. बराच वेळ गेला. देव खाईना. नामदेव महाराज रडकुंडीला आले. विनवणी करू लागले. देवाखा ना ! मी नैवेद्य घेऊन आलो, हे तुम्हाला आवडले नाही का? देवा, मायबापा, रागावलात का माझ्यावर ? तुम्ही जेवला नाहीत तर वडील मला मारतील हो! खाना देवा ! अतिठाय प्रेमळ स्वरात रडत रडत ते विनवू लागले.

**केशवा, माधवा, गोविंदा गोपाळा।**
**जेवी तू कृपाळा पांडुरंगा।।**
**अच्युता, वामना, दठरथ नंदना।**
**जेवी तू गा कृष्णा पांडुरंगा।।**
**कृष्णा, विष्णू ,हरी, मधुसूदन मुरारी ।**
**जेवी तू नरहरी पांडुरंगा ।।**

एवढा आग्रह केला. हट्ट केला. पण देव जेवीनात. शेवटी ते रडू लागले. देवाला त्यांची दया आली. काकुळतीने, भक्तीने, श्रद्धेने, देवाची मनापासून आळवणी केली की देव प्रसन्न होतो. समोर उभा राहतो. इथेही नामदेवांच्या भक्तीने, हट्टाने देव प्रसन्न झाले आणि त्यांनी नैवेद्य ग्रहण केला. नामदेवांना अतिशय आनंद झाला. नाचायलाच लागले. त्यांनी आईला सर्व सांगितले. पण देवाने नैवेद्य खाल्ला हे आईला पटेना. नामदेव खोटं बोलतात असं समजून त्यांना खूप राग आला. त्यांनी मारही दिला . वडील दामाशेटजी आले. त्यांना हे कळले. त्यांचा ही विश्वास बसेना. खरं-खोटं करण्यासाठी त्यांनी दुसऱ्या दिवशी पुन्हा नैवेद्य दाखवायला सांगितले .आता नामदेवरायांची परीक्षा होती. त्यांनी नैवेद्य दाखवला आणि जेवणाचा आग्रह

करू लागले .देवा ,जेवा ना !नाहीतर मी खोटं बोलतो म्हणून आई–वडील मला पुन्हा मारतील .तुमच्या लाडक्या नाम्याला मारल्यावर तुम्हाला बरे वाटेल का? मग जेवा ना !का माझा अंत पाहता

**नको देवराया अंत आता पाहू ।**

**प्राण हा सर्वथा जाऊ पाहे ।।**

आई–वडील हे सर्व चोरून पहात होते. आता नामदेवराय ऐकतच नाही हे पाहिल्यावर देव नैवेद्य खायला तयार झाले.

**देव म्हणे नाम्या बसावे दारात।**

**लवकरी जेवितो पाहे आता ।।**

असं म्हणून देवांनी नामदेवांना बाहेर जायला सांगितले आणि नेवेद्य ग्रहण केला आणि शेवटी नामदेवराय आईवडीलांच्या परीक्षेत पास झाले. हाच कळवळा, विनवणी त्यांनी आयुष्यभर लोकांसाठी, समाजासाठी, त्यांच्या उद्धारासाठी वापरला. नामदेवराय मोठे होत गेले तसे त्यांचा भक्तिरस ही वाढत गेला. त्यांना कीर्तना शिवाय कशातच विरंगुळा वाटला नाही. आम्हा

**कीर्तन कुळा वाढी । आणिक नाही उदीम जाडी ।।**

असे ते म्हणत . निष्ठेने, श्रद्धेने जीवन जगत होते. नामदेव महाराजांनी कीर्तनाच्या माध्यमातून विठ्ठलाच्या नाम गजरात दक्षिणेची संस्कृती उत्तरेत रुजवली. समाज मने एकत्र गुंफली. संकुचित कल्पनांचा निरास करून समता, मानवता या विशाल तत्त्वांचा प्रसार केला. उत्तरेत, पंजाबात आजही नामदेवांचे अभंग म्हटले जातात. त्यांच्या हिंदी रचना गायल्या जातात. ठोखांच्या गुरुद्धारात बाबा नामदेवजी की मुख बानी आळवली जाते. जनसेवा हीच ईश्वर सेवा आहे. हे त्यांचे ठाम मत होते.

**सर्वाभूती विठ्ठल आहे साचे ।**

**हे तव वेदींचे वचन जाण।।**

**मार्ग हाचि सोपा गेले मुनिजन ।**

**जनी जनार्दन हाचि भाव** ।

वारकरी संप्रदायाचं हेच वैशिष्ट्य आहे की, जात पात, पंथ,धर्म, भाषा या भेदांच्या पलीकडे जाऊन ते प्रत्येक प्राणीमात्रात ईश्वर पाहतात ।।लहान–मोठा कोणीही असो, त्यांच्या पाया पडतात. कारण तो पांडुरंगच त्यांना तिथे दिसतो. प्रत्येकाला माऊली म्हणतात. पंढरीची वारी सार्थ करतात. ब्रह्म ज्ञान प्राप्त झाल्यानंतर नामदेव एका ठिकाणी पाक सिद्धी करत होते. नामदेवांनी केलेल्या स्वयंपाकातून कुत्र्याने एक भाकरी पळवली. तेव्हा नामदेव महाराज त्याच्या मागे धावू लागले. आणि म्हणू लागले, अरे थांब. नुसती भाकरी खाऊ नकोस. पोट दुखेल. मी तुपाची वाटी आणली आहे . थांब, मला तूप वाढू दे. कुत्रा पुढे आणि नामदेव मागे असं चाललं होतं. नामदेव महाराज किती प्रेमळ आणि प्राणीमात्रांविषयी किती दया होती हेच दिसतं.

**हाती घेऊन तुपाची वाटी ।**

**नामा लागे श्वानापाठी।।**

**उभा उभा रे जगजेठी।।**

**कोरडी रोटी तू का खासी ।।**

ज्ञानेश्वर महाराज आणि नामदेव महाराज हे समकालीन संत होते. त्यामुळे चारही भावंडांशी नामदेवरायांचा जिव्हाळ्याचा संबंध होता किंबहुना चारही भावंडांचे ते आधार होते. या काळात समाज जीवन हे धर्माधिष्ठित होते. धार्मिक रूढींचा जबरदस्त पगडा होता. कर्मकांड फोफावले होते. त्याचा अतिरेक झाला होता मंत्रा पेक्षा तंत्राला महत्व आलं होतं अंधश्रद्धा वाढल्या होत्या. नामदेवरायांनी हे सारं पाहिलं. त्यांचे मन अस्वस्थ झालं. त्यांनी समाजाला भक्तिमार्गाला लावलं.

**मंत्र यंत्र दीक्षा सांगतील लक्ष।**

**परी राम प्रत्यक्ष न करी कोण्ही ।।**

पांडुरंगाच्या नामस्मरणाने मनुष्य शुद्ध होतो. हा विश्वास त्यांनी समाजाला दिला. अन्य काही करू नका. नाम हाच देव आहे, तेव्हा नामस्मरण करा. त्यांनी अनिष्ट रुढींवर कठोर प्रहार केले. जातीभेदावर टीका केली. सर्व प्राणिमात्र,मनुष्य जाती एकच आहे. हे पटवून दिले. हाच संदेश संत ज्ञानेश्वरांपासून तुकाराम महाराजां पर्यंत सर्वच संतांनी दिला. जातीभेद त्यांना मान्य नव्हता. केवळ भाषणातून, प्रवचनातून हे सांगून उपयोग नाही. तर ते आचरणात आले पाहिजे. असा संतांचा आग्रह होता. हेच प्रयोग संत नामदेवरायांनी केले. त्यांचे शिष्य संत चोखामेळा त्या काळातले तथाकथित शुद्र. पण त्यांनाही नामदेव महाराजांनी वर उचलले. त्यांच्या रचना जनमानसात रुजविल्या.

**ऊस डोंगा परी रस नोहे डोंगा ।**

**काय भुललासी वरलिया रंगा।।**

**चोखा डोंगा परी भाव नोहे डोंगा ।**

**कायभुललासी वरलिया रंगा।।**

ही त्यांची रचना आहे. गुरुकपेचा हात त्यांच्या डोक्यावर होता. समानतेची समरसतेचे ची पुढची पावले टाकण्याची हिंमत नामदेव महाराजांनी मध्ये होती. ते धेर्य होतं. एका अर्थाने ते क्रांतिकारी कीर्तनकार होते. संत ज्ञानदेवां बरोबर नामदेव महाराज यात्रा करून परत आले . नामदेवांनी विठ्ठलाच्या आज्ञेवरून 'मावंदं 'घातलं. तेव्हा विठ्ठलाने स्वतः पंढरीतील ब्राह्मणांना भोजनाला बोलावून आणलं.

**नामयाचे उच्छिष्ट स्वीकारिले देवे।**

**कवतुक अवघे पाहती द्विज।।**

या कथेतून एक वस्तुपाठच मिळालेला दिसतो. पंढरपूर ते पंजाब पेशावरपर्यंत त्यांनी यात्रा केली. लोकशाही खऱ्या अर्थाने रुजविली. अनेक जातीत अनेक शिष्य त्यांनी मिळविले.

**सोवळे ओवळे उंचनीच वर्ण।**

**नाही येथे गुणदोष काही ।।**

हे त्यांनी संप्रदायामध्ये रुजविले . दलितांना, स्त्रियांना समाजामध्ये प्रतिष्ठा मिळवून दिली. लहानथोर, उच्च-नीच हे भेद संपवून टाकले . एवढेच काय संत चोखामेळा चे चरित्र त्यांनी लिहिले. चोखोबांच्या निर्वाणानंतर मंगळवेढ्याहून त्यांच्या अस्थी आणून विठ्ठलाच्या महाद्वारात त्यांनी त्यावर समाधी बांधली. ही एका गुरूने शिष्याची बांधलेली समाधी. स्वत: नामदेवांनी विठ्ठलाच्या महाद्वारी पायरीचा पाषाण होण्यात स्वतःच्या जीवनाची कृतार्थता मानली. मंदिराची पहिली पायरी निवडली. आजही नामदेव पायरी ला नमस्कार केल्याशिवाय मंडळी मंदिरात जात नाहीत.

**नामा म्हणे आम्ही पायरीचे चिरे।**

**संतपात्र हिरे वर देती ।।**

केवढा मोठेपणा ! केवढी नम्रता !!

संत नामदेवांच्या किर्तन भक्तीने, नामस्मरणाच्या सोप्या साधनाने परमार्थाची वाटचाल सुलभ झाली. भक्तांच्या भेटीसाठी पांडुरंग विटेवर उभा असलेला दिसला. सावळे परब्रह्म समोर दिसल्यावर भक्तांच्या आनंदाला पारावार राहिला नाही. विटेवरच्या विठ्ठलाला संत नामदेवांनी सर्वसामान्य जनतेच्या हवाली केले . तो पांडुरंग मंदिरात न राहाता जनसामान्यांच्या घरात वावरू लागला. सर्व वर्णियांच्या घरातून एकच विठ्ठल नांदू लागल्याने समाजात एकता प्रस्थापित झाली. त्यांना भावनिक आधार मिळाला.नामदेवरायांचे गुरु खेचर स्वामी होते. त्यांचा नामदेवांनी अनुग्रह घेतला होता.संत नामदेवांनी चमत्कार न करता समाज जागृती केली. शुद्र देवदेवतांचा निरास करून विठ्ठलाच्या एकेश्वरवादाची प्राणप्रतिष्ठा केली. शैव-वैष्णव भेद नष्ट केला. पराकोटीचा कलह संपवून टाकला. फक्त एकच विठल !

नामा म्हणे शिवविष्णू मूर्ती एक ।....

**भजन करा रे हरि हरा नारायणा शिवशंकरा।।**

**माझे बोलणे अवधारा । भेद न करादोघांचा।।**

असं अभंगातून सांगितलं.

उत्तर भारतात भ्रमण करताना हिंदी अभंगवाणीतून निर्गुण भक्ती संप्रदायाचे प्रवर्तन केले. त्यांच्यापासूनच हिंदी संत परंपरेचा आणि हिंदी भक्ती काव्याचा शुभारंभ झाला. संत नामदेवांच्या हिंदी अभंगातूनच प्रेरणा मिळाल्याने गुरू नानक देव वाणीतून आणि कबीर वाणीतून हे दिसून येते. दक्षिण भारतात महाराष्ट्रात संत जनाबाई, संत चोखामेळा, परिसा भागवत हे त्यांचे शिष्य होते. तर उत्तर भारतात बोहरदास, विष्णुस्वामी, जाल्हण लध्धा, केसो कलंदर असे शिष्य निर्माण झाले. महाराष्ट्रात संत नामदेवांचा हरिपाठ घरोघरी म्हटला जातो. अगदी मंत्रपुष्पांजलीतही.....

**घालीन लोटांगण वंदीन चरण।**

**डोळ्याने पाहीन रूप तुझे।।**

**प्रेमे आलंगीन आनंदे पूजिन ।**

**भावे ओवाळीन म्हणे नामा।।**

या ओळी नामदेवरायांच्या आहेत .पांडुरंगा जवळ त्यांनी पसायदान मागितले.

**अकल्प आयुष्य व्हावे तया कुळा।**

**माझिया सकळा हरीच्या दासा ।।**

**कल्पनेची बाधा नको कवणे काळी ।**

**ही संत मंडळी सुखी असो।।**

**अहंकाराचा वारा न लागो राजसा।**

**माझिया विष्णुदासा भाविकांसी ।। नामा म्हणे**


**तया असावे कल्याण। ज्या मुखी निधान पांडुरंग ।।**

**लेखांकन : गोविंद केशव जेस्ते, चिंचवड, पुणे**

**संपर्क : ९९६०६९६०९८**



# तब आप क्या कर रहे थे..?




द कश्मीर फाईल्स की जबरदस्त सफलता के कारण तमाम वामपंथी और इस्लामिस्ट्स बौखला गए हैं. आज तक खड़ा किया सारा विमर्श उन्हे बिखरता हुआ नजर आ रहा हैं. इसलिए राष्ट्रवाद के इस नए तूफान को भ्रमित करने, वे सोशल मीडिया के तमाम मंचों पर यह प्रश्न उठा रहे हैं, तब आप क्या कर रहे थे..? दिल्ली में सरकार आपकी थी. राज्यपाल जगमोहन आपके थे. फिर भी यह नरसंहार क्यूँ हुआ.? क्या किया आपने तब ?


'उल्टा चोर कोतवाल को डांटे' इस मुहावरे का इससे अच्छा प्रयोग नहीं हो सकता. १९८४ में आठवी लोकसभा के चुनाव में काँग्रेस को राक्षसी बहुमत मिला था. कुल ५१४ में से ४०४ सीट्स. भाजपा के मात्र २ सांसद चुन कर आए थे. किन्तु परिस्थिति तेजी से बदली. १९८९ के चुनाव मे, उन्ही राजीव गांधी के नेतृत्व में काँग्रेस बहुमत का आंकड़ा भी नहीं छूं सकी. उन्हे मिली १९७ सीटें. नवगठित 'जनता दल' के १४३ सदस्य चुनकर आए. रामजन्मभूमि आंदोलन के कारण पहली बार, भाजपा का आंकड़ा २ से बढ़कर ८५ तक पहुंचा था. मार्क्सवादी कम्युनिस्ट पार्टी को ३३ सीटें मिली थी. अतः जनता दल की सरकार बनी, जिसे भाजपा और कम्युनिस्ट पार्टी ने बाहर से समर्थन दिया. विश्वनाथ प्रताप सिंह प्रधानमंत्री बने.

इधर कश्मीर की परिस्थिति क्या थी.? नेहरू के चहेते, शेख अब्दुल्ला के बेटे फारुख अब्दुल्ला मुख्यमंत्री थे. कश्मीर से ही चुने गए मुफ़्ती मोहम्मद सईद देश के गृहमंत्री थे. १९८७ के विधानसभा चुनाव में ७६ में से फारुख अब्दुल्ला की नेशनल कॉन्फ्रेंस को ४० और काँग्रेस को २६ सीटें मिली थी. जम्मू क्षेत्र से भाजपा के मात्र २ विधायक चुन कर आए थे. इस चुनाव के बाद, सन १९८८ से ही, कश्मीर घाटी में पाकिस्तानीयों की घुसपैठ बढ़ गई थी. हिंदुओं को घाटी से भगाने का आंदोलन प्रारंभ हो गया था. यासीन मलिक (जिसे फिल्म में 'बिट्टा' के रूप में दिखाया हैं), यह आतंकवादी गुट, 'जम्मू – कश्मीर लिबरेशन फ्रंट' (गघडऋ) का नेता था. अनेक आतंकवादी गुटों के साथ, वह खुले आम केंद्र शासन को चुनौती देता था. चुन – चुन कर घाटी के हिन्दू नेताओं को मारता था. १९८६ के काश्मीर दंगों में इसकी बड़ी भूमिका थी. १४ सितंबर १९८९ को 'टीका लाल टपलू' की दिन दहाड़े, खुले आम हत्या कर के दहशत फैलाने का काम प्रारंभ हो गया था. टीका लाल टपलू यह राष्ट्रीय स्वयंसेवक संघ के निष्ठावान और समर्पित स्वयंसेवक थे. कश्मीरी पंडित उन्हे अतीव आदर से देखते थे.

१९८९ में कश्मीर में हो रही इन हत्याओं के दौर में दिल्ली में वी. पी. सिंह की सरकार थी, जिसमे मुफ़्ती मोहम्मद सईद गृहमंत्री थे और इश्कबाजी में डुबे हुए फारुख अब्दुल्ला मुख्यमंत्री..! इसी बीच ८ दिसंबर १९८९ को, गृहमंत्री मुफ़्ती साहब की लड़की, रूबिया सईद का आतंकवादी अपहरण कर लेते हैं. उसके बदले कश्मीर के जेल में बंद पांच खूंखार आतंकवादियों को रिहा करने की मांग रखी जाती हैं. अपहरण की ज़िम्मेदारी जेकेएलएफ और उसका नेता यासीन मलिक लेते हैं. पांच दिन यह नाटक चलता हैं. पांच दिनों के बाद रूबिया सईद को सुरक्षित लौटाया जाता हैं और वहां पांच खूंखार आतंकवादी रिहा किए जाते हैं..!

इस पूरे प्रकरण में, ना तो जेकेएलएफ़ का कोई नेता

गिरफ्तार होता हैं, ना ही यासीन मलिक को गिरफ्तार किया जाता हैं. गिरफ्तारी छोड़िए, पुंछताछ के लिए भी नहीं बुलाया जाता... १९८९ के दिसंबर और १९९० के जनवरी महीने में पूरा कश्मीर आतंकवादियों के हवाले कर दिया गया हैं. जैसा कश्मीर फाईल्स में दिखाया गया हैं, बिलकुल वैसा ही कश्मीर का माहौल हैं. रोज रात को मशाल जुलूस निकाल रहे हैं जिसमे हिंदुओं को, उनकी औरतों को कश्मीर में छोड़कर, भाग जाने के लिए कहा जा रहा हैं. ४ जनवरी १९९० को श्रीनगर से प्रकाशित होने वाले दैनिक 'आफताब' ने एक बड़ा सा विज्ञापन प्रकाशित किया, जिसमे हिजबूल मुजाहिदीन ने सारे हिन्दू – सीख समुदाय को घाटी छोड़ के जाने के लिए कहा गया था. पूरे घाटी में पाकिस्तानी करेंसी का प्रयोग हो रहा था.



कश्मीर में हो रहे हिंदुओं के हत्याकांड पर जब भाजपा ने आवाज उठाना चालू किया, चिल्लाना शुरू किया, तब फारुख अब्दुल्ला को हटाकर राष्ट्रपति शासन लगाया गया. यह दिन था, १९ जनवरी १९९०. आतंकवादियों को यह पहले से पता चल गया था, की १९ जनवरी को राज्यपाल का शासन लगेगा. इसलिए १८ जनवरी की रात और १९ जनवरी को पूरे दिन भर कश्मीर घाटी में हिंदुओं के खून की होली खेली गई. इसी दिन राज्यपाल के रूप में जिस व्यक्ति को दिल्ली ने भेजा, वह थे – जगमोहन !

इस समय तक जगमोहन का और भाजपा का, दूर – दूर तक कोई संबंध नहीं था. जगमोहन काँग्रेस के आदमी थे. विशेषतः गांधी परिवार के खास. आपातकाल (१९७५ – १९७७) में संजय गांधी की आज्ञा से तुर्कमान गेट और अन्य स्थानों के अतिक्रमण तोड़ने वाले प्रशासक. संजय गांधी के कारण ही वे 'नाम' समिट के समय गोवा के और एशियाड के समय दिल्ली के उप–राज्यपाल बने. इन आयोजनों की सफलता के कारण वे इंदिरा गांधी और बाद में राजीव गांधी के चहेते बने. वे कुशल प्रशासक थे.

जगमोहन ने कश्मीर के हिंदुओं की जो स्थिति देखी, उससे वो अंदर तक हिल गए. उन दिनों पर उन्होने पुस्तक लिखी हैं – My Frozen Turbulence in Kashmir'. कश्मीर के राज्यपाल के नाते उनका कार्यकाल मात्र पांच महीनों का ही रहा. जब वे वहां मुस्लिम आतंकवादियों पर कहर बरसाने लगे, तो उन्हे गृहमंत्री मुफ़्ती मोहम्मद सईद ने राज्यपाल पद से हटा दिया. इस के बाद जगमोहन ने भाजपा में शामिल होने का निर्णय लिया.

कश्मीर की इन तत्कालीन घटनाओं पर सबसे ज्यादा आवाज उठाई तो राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ने. उस समय नए बनने जा रहे 'पुनुन कश्मीर' (हमारा कश्मीर) के शीर्ष नेताओं को, जिसमे 'अग्निशेखर जी' प्रमुख थे, संघ ने देश भर, विभिन्न स्थानों पर लोगों से, पत्रकारों से मिलवाया. कश्मीर की स्थिति को लोगों तक लेकर जाने के पूरे प्रयास किए. दुर्भाग्य से उन दिनों संघ को उतना नहीं सुना जाता था, जितना आज सुना जाता हैं !

इसलिए कोई अगर यह कहे की 'उस समय आप क्या कर रहे थे?' तो उनसे पूछिए

- शेख अब्दुल्ला, फारुख अबुल्ला और ओमर अब्दुल्ला की खासमखास काँग्रेस पार्टी क्या कर रही थी ?
- जितने वामपंथी यह सवाल उठा रहे हैं, उनसे पूछना हैं, वे क्या कर रहे थे? वी. पी. सिंह सरकार को उनका भी तो समर्थन था.
- देश के तमाम बुध्दीजीवी मुस्लिम नेताओं ने इस घटना पर क्या कहा? किसी एक मुसलमान नेता ने भी इस घटना का विरोध किया?
- फारुख अब्दुल्ला परिवार की खास समर्थक काँग्रेस सरकार दस साल तक दिल्ली में राज करती रही. उस ने एक बार, एक बार भी इस समस्या का हल ढूँढने की कोशिश की?
- और सिनेमा जगत.... दुनिया भर के प्रश्नों पर सिनेमा बनाने वाले हमारे बॉलीवुड के निर्माता, कश्मीर के इस सच को इतने वर्षों तक क्यूँ नहीं पर्दे पर लाये?

**लेखांकन : प्रशांत पोळ**

**संपर्क : ९४२५१५५५५१**

# राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, प्रतिनिधी सभा पत्रकार परिषद

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, पश्चिम महाराष्ट्र प्रांत ३०९ शनिवार पेठ, मोतीबाग पुणे ३० स्वाधीनतेपासून संपूर्ण स्वातंत्र्याकडे जाताना स्वावलंबी भारतात रोजगाराच्या संधी वाढणे आवश्यकपुणे – दि. १८ मार्च – स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त स्वातंत्र्य मिळविण्यासाठी राष्ट्रीय शिक्षण, स्वदेशी उद्योग, पत्रकारिता, साहित्य, कला आदि माध्यमांतून लाखो भारतीयांनी तसेच महिलांनी योगदान दिले आहे. ते समाजापर्यंत पोहोचविण्याबरोबरच भारत सशक्त स्वावलंबी करण्याचा संकल्प रा.स्व. संघाने केला आहे. त्यासाठी सर्व सज्जनशक्ती एकवटून विविध संस्था संघटनांना सोबत घेण्याचे कार्य संपूर्ण देशभर रा.स्व. संघ करीत आहे, अशी माहिती रा.स्व. संघाचे पश्चिम महाराष्ट्र प्रांत संघचालक नानासाहेब जाधव यांनी पत्रकार परिषदेत दिली.




**प्रतिनिधी सभा विषयक पत्रकार परिषदेला संबोधित करताना रा. स्व. संघ पश्चिम महाराष्ट्र प्रांत संघचालक नानासाहेब जाधव, प्रांत कार्यवाह डॉ. प्रवीण दबडघाव, पुणे महानगर कार्यवाह महेश करपे अणि विश्व संवाद केंद्र अध्यक्ष अभय कुलकर्णी**

नुकतीच कर्णावती (अहमदाबाद) येथे रा.स्व. संघाची अखिल भारतीय प्रतिनिधी सभा झाली त्याची माहिती देण्यासाठी आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. पत्रकार परिषदेस प्रांत कार्यवाह डॉ. प्रवीण दबडघाव आणि पुणे महानगर कार्यवाह महेश करपे उपस्थित होते. =९प्रांत संघचालक नानासाहेब जाधव पुढे म्हणाले की , कोरोनाचा प्रादुर्भाव ओसरत असतानाच संघाचेही काम २०२० च्या तुलनेत जवळपास ९८ % ठिकाणी पूर्ववत सुरु झाले आहे. शाखांपैकी ६१ % शाखा विद्यार्थ्यांच्या तर ३९ % शाखा तरुण व्यावसायिकांच्या आहेत. दरवर्षी एक ते सव्वा लाख तरुण गेळप ठड्ड च्या माध्यमातून संघाशी जोडले जातात.

या वर्षीचे वैशिष्ट्य म्हणून भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त (स्वराज्य ७५) स्वातंत्र्य लढ्यातील आध्यात्मिक, सांस्कृतिक, कला, साहित्य, शिक्षण, उद्योग, पत्रकारिता, आदिवासी, महिला, शेतकरी, कामगार अशा सर्वच घटकांचा सक्रीय सहभाग हा समाजापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न केला जात आहे. तोच सामाजिक राष्ट्रीय एकात्मता आणि स्वत्वाचा भाव सर्वदूर सुदृढ करण्याचे प्रयत्न रा.स्व. संघ करीत आहे. या सोबतच स्वावलंबी भारताचे ध्येय साध्य करण्यासाठी पर्यावरणानुकुल, श्रमप्रधान, ग्रामीण आणि लघु उद्योगावर आधारित आधुनिक तंत्रांसह पारंपारिक कलांचा विकास करावा लागेल. त्यासोबतच सूक्ष्म वित्त संस्था, कुटीरोद्योग, बचत गट आदिंना विचारात घेऊन मनुष्यबळ कौशल्य प्रशिक्षण आणि संशोधनास चालना देणारे अर्थ व्यवस्थेचे भारतीय प्रतिमान (MODEL) सिद्ध करावे लागेल. असा प्रस्ताव नुकत्याच झालेल्या अखिल भारतीय प्रतिनिधी सभेत पारित करण्यात आला. अशी माहिती त्यांनी दिली.




## विश्व हिंदू परिषद, प. महाराष्ट्र पांत बैठक, रांजणगाव

## दि. १९ व २० मार्च २०२२


e-commerce सेवा
आता आपल्या बँकेच्या RuPay डेबिट कार्डचा उपयोग
तिकीट बुकींग, ऑनलाईन - शॉपींग व पेमेंट आणि
POS मशिनवर सहज करता येईल.
Solapur Janata Sahakari Bank Ltd.
Multi-State Scheduled Coop Bank
SJSB
5000 0000 0000 0000
VALID FROM 05/16
VALID UPTO 05/19
RuPay
DEBIT
For use only in India
महाराष्ट्र व
कर्नाटक राज्यात
41 शाखा
कार्यरत
BSNL
Connecting India
!dea
महापारेषण
प्रकाश वाईकर
कार्यकारी अधिकारी
गजानन धरणे
अध्यक्ष
व संचालक मंडळ
बरदराज बंग
उपअध्यक्ष
SJSB
सोलापूर जनता सहकारी बँक लि.
Solapur Janata Sahakari Bank Ltd.
मल्टी-स्टेट शेड्युल्ड को ऑप. बँक
Multi-State Scheduled Coop.Bank
मुख्य कार्यालय Head Office
'गगनभरारी' शिवस्मारक संकुल, गोल्डफिंच पेठ, 'Gaganbharari' Shivsmarak Sankul, Goldfinch Peth, सोलापूर Solapur 413 007 फोन क्र. Ph. No. : 0217- 274 1100 ते to 06
Visit us : www. sjsbbank.com

Registered

वार्षिक वर्गणी रू. २००/- फक्त

Date of Publication : 26/03/2022 and
Date of Posting : 28/03/2022 at PSO, GPO, Pune 411 001

RNI NO. MAHMAR/2001/05879
Postal Registration No. PCW/077/2021-2023
Licence to post Without Prepayment No. WPP-114

# हिंदुबोध

सप्रेम नमस्कार,

विश्व हिंदू परिषदेचे प्रांत स्तरावर निघणारे एकमेव मासिक म्हणजे हिंदूबोध. मार्च २०२० नंतर अंक प्रक्रिया बंदच होती परंतू, फेब्रुवारी २०२१ पासून नवीन स्वरुपात अंक निघणे सुरु झाले आहे. आपण हिंदुबोधचे वाचक व हितचिंतक आहात म्हणुन आपणांस हे आवाहान!

नवीन स्वरुपाचा अंक आता ४४ पानांचा काढायचा मानस असुन मासिक मुल्य ₹ २०/- आहे. वार्षिक वर्गणी ₹ २००/- व त्रैवार्षिक वर्गणी ₹ ५००/- रहाणार आहे. खालील दिलेल्या बँक खात्यावर पैसे पाठवू शकता. तसेच दर महिन्याचा आपला अंक वेळेत व व्यवस्थित पोस्टाने पोहोचण्यासाठी आपले पूर्ण नांव/पत्ता/मोबाईल क्रमांक अशी माहिती पाठीमागील मोबाईल क्रमांका वर मेसेज पाठवावा. अंक दर महिन्याचे दि. १ ते ५ पर्यंत आपणास पोस्टाने मिळण्याची व्यवस्था करणार आहोत. आपण वार्षिक वर्गणी जर रू. १००/- पाठवली असेल तर उर्वरित रक्कम त्वरीत पाठवावी, ही विनंती. आजीवन व पंचवार्षिक योजना बंद केली आहे.

आपण आपले नातेवाईक, मित्र यांचे नावे मुल्य भरुन त्यांना अंक भेट स्वरूपात देवू शकता. तसेच अंकासाठी नविन सभासद व जाहिरात मिळवून ही योगदान देवू शकता, ही नम्र विनंती. आपल्या योगदानाची अपेक्षा आहे. कळावे. धन्यवाद!

**रविकांत कळंबकर संपादक, हिंदुबोध**

## • हिंदुबोध जाहिरात दरपत्रक •

(शहरी व ग्रामिण भागात पोहोचणारे मासिक) पाने ४४ (रंगीत पानांसह)

| | | |
|---|---|---|
| रंगीत पूर्ण पान ₹ १.५ लाख | साधे पूर्ण पान ₹ १ लाख | साधे अर्धे पान ₹ ५०,०००/- |
| साधे १/४ पान ₹ २५,०००/- | साधे १/८ पान ₹ १२,०००/- | साधे १/१६ पान ₹ ६,०००/- |

सौजन्य पृष्ठ (तळटीप शुभेच्छा) ₹ १०००/-

तळटीप व जाहिरात दारांचा मजकूर एक वर्ष छापला जाणार असुन या सर्वांना एक वर्ष हिंदुबोध अंक विनामुल्य मिळेल.

| | | |
|---|---|---|
| हिंदुबोध अंक मुल्य ₹ २०/- | वार्षिक वर्गणी ₹ २००/- | त्रैवार्षिक वर्गणी ₹ ५००/- |

संपर्क : श्री. महेंद्र देवी (CA) : ९८५००३५५९० कार्यालय व्यवस्थापक : श्री. मिलींद देवळे : ९०४९३९६३६३

## • हिंदुबोधची वर्गणी •

जनता सहकारी बँक लि. शनिवार-नारायण पेठ शाखा, पुणे - ४११ ०३०.
खाते क्रमांक : **015220100024473** IFSC Code : **JSBP0000015**

**कार्यालयीन पत्ता : संपादक, हिंदुबोध**

विश्व हिंदू परिषद, महाराष्ट्र प्रदेश (पश्चिम) १३६०, शुक्रवार पेठ, भारत भवन, पुणे-४११ ००२.
दूरध्वनी : ९०४९३९६३६३, दूरभाष : (०२०) २४४७१७०१ **Email :** hindubodh.pmp@gmail.com

**हिंदुबोध**
द्वारा : रविकांत कळंबकर, ९८२२२६१६६२
विश्व हिंदू परिषद, १३६० शुक्रवार पेठ, नातूबाग,
भारत भवन, पुणे - ४११ ००२.
दूरध्वनी : २४४७१७०१